संशोधक

संपादक

॥ श्री. श्री. भा. भट ॥ ॥ श्री. द. रा. भट ॥
॥ डॉ. प्र. न. देशपांडे ॥ ॥ डॉ. मु. ब. शहा ॥

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे
संशोधन मंडळ, धुळे.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती
मंडळाने पुरस्कृत केलेले

संशोधक

वर्ष ५१ वे : अंक दुसरा व तिसरा

जून आणि सप्टेंबर १९८३

मूल्य १० रुपये

वार्षिक वर्गणी १५ रुपये

साहित्य व इतिहासातील
संशोधनाला वाहिलेले दर्जेदार
त्रैमासिक

अंतरंग

दि राजवाडे मंडळ पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सुवर्णमहोत्सव समारंभातील

काही संस्मरणीय क्षण



(१) महोत्सवाचे उद्घाटन करीत असताना उद्योगपती श्री. काशीनाथजी अग्रवाल समवेत चेअरमन बाबासाहेब मुंदडे व मॅनेजर श्री. अग्रवाल (२) कै. भा. वा. भट यांच्या तैलचित्राचे अनावरण आ. रोहिदास पाटील यांच्या शुभहस्ते. (३) स्मरणिकेचे प्रकाशन करीत असताना श्री. दादासाहेब रावल.

१

संपादकीय

राजवाडे संशोधन मंडळाच्या संग्रही सुमारे ५००० हस्तलिखिते आणि १८,००० कागदपत्रे आहेत. हस्तलिखितांमध्ये सुमारे १०० हस्तलिखिते अद्याप अप्रसिद्ध असून त्यांतील काही हस्तलिखिते ऐतिहासिक साधने म्हणून अतिशय महत्त्वाची आहेत. ‘संशोधक’ त्रैमासिकातून महत्त्वाच्या अप्रसिद्ध साधनांचे प्रकाशन करण्याची योजना आम्ही आखत आहोत. सुवर्णमहोत्सवी अंकात प्रसिद्ध करण्यात आलेली ‘१०९ कलमी बखर’ व वेडिया नागेशाचा ‘भावार्थ’ हा ग्रंथ अशाच अप्रसिद्ध साधनांपैकी महत्त्वपूर्ण ग्रंथ होत. ही दोन्ही साधने स्वतंत्रपणे पुस्तकरूपाने मंडळातर्फे लवकरच प्रकाशित होत आहेत. मार्च १९८३ च्या अंकात ‘पुष्पांजली’ हा अद्याप पावेतो अप्रकाशित असलेला ग्रंथ आम्ही प्रकाशित केला. मंडळाच्या संग्रही असलेल्या १८,००० कागदपत्रांपैकी शेकडो कागद अद्यापही अप्रकाशित आहेत. त्यांतील महत्त्वाचे निवडक कागद प्रसिद्ध करण्याचा मंडळाचा मानस असून या अंकापासून हा उपक्रम आम्ही हाती घेतला आहे.

‘संशोधका’च्या सुवर्णमहोत्सवी अंकाचे चोखंदळ वाचकवर्गाने मनापासून स्वागत केले. केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशातील वेगवेगळ्या भागातून जाणकारांच्या उत्तम अभिप्रायांचा व कौतुकाच्या पत्रांचा अक्षरशः वर्षाव झाला. डॉ. रा. चिं. ढेरे, श्री. दाजी पणशीकर, डॉ. अ. रा. कुलकर्णी, श्री. म. श्री. दीक्षित, डॉ. यु. म. पठाण, श्री. वि. त्र्यं. शेटे, श्री. शरद जोशी, डॉ. अशोक कामत, डॉ. रामेश्वरलाल

खंडेलवाल, प्रा. मा. य. वैद्य, श्री. वा. श. सोनार, प्रा. पुरुषोत्तम पाटील, श्री. वा. ल. मंजुळ, श्री. रत्नाप्पा कुंभार, पूज्य शिवाजीराव भावे इत्यादी वेगवेगळ्या क्षेत्रांतील श्रेष्ठ व्यक्तींनी प्रत्यक्ष भेटून किंवा पत्राने अंकाबद्दलची आपली मते प्रगट केली. आम्ही या सर्वांचेच मनापासून आभारी आहोत. 'संशोधक' त्रैमासिकाचे रूप अधिक आकर्षक व दर्जेदार करण्याच्या दृष्टीने आम्हाला या सर्व सुहृदांच्या सूचनांचा व सहकार्याचा लाभ होणार आहे.

१९८० च्या नोव्हेंबरमध्ये मंडळाने महाराष्ट्र इतिहास परिषदेचे अधिवेशन आयोजित केले होते. ह्या अधिवेशनात महाराष्ट्रातील मान्यवर अभ्यासकांनी वेगवेगळ्या विभागांतून आपापले निबंध वाचले होते. त्यांपैकी काही निवडक निबंध आम्ही प्रस्तुत अंकापासून प्रकाशित करण्याचे ठरविले आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणच्या दक्षिण पश्चिमी मंडळाचे अधीक्षक श्री. अमरेन्द्र नाथ यांचा 'रायगड किल्ल्यावरील शिवाजीमहाराजांच्या सिंहासनाबाबत पुरातत्त्वीय दृष्टिकोणातून इंग्रजीमध्ये लिहिलेला लेख' या अंकात आम्ही प्रसिद्ध करीत असून वाचकांना तो नावीन्यपूर्ण वाटेल. डॉ. प्र. न. देशपांडे यांचा 'इनामगावची देवता' हा लेख नव्या संशोधनाला चालना देणारा ठरावा. ह्याच अंकात मंडळाच्या संग्रही असलेल्या कागदपत्रांपैकी अष्टप्रधानांच्या कार्याचा व इतर बाबींचा तपशील देणारा तक्ता उत्तर पेशवेकाळातील जरी असला तरी त्यातील तपशील मराठेशाहीतील प्रधान मंडळाची व्यवस्था समजावून घेण्यास अतिशय उपयुक्त आहे. सूची प्रकल्पावर संशोधन-सहायक म्हणून काम करीत असलेल्या सौ. विजया देशपांडे व कु. सुनंदा अहिरे यांनी ह्या तक्त्याविषयी लेख तयार केलेला आहे.

'संशोधका'चे अंक संदर्भग्रंथासारखे उपयुक्त ठरावेत यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोतच. हे कार्य अधिक सुकर होण्यासाठी वर्गणीदार मोठ्या प्रमाणात वाढले पाहिजेत, सरकारकडून अनुदानाचा ओघ अधिक वाढला पाहिजे आणि त्याचबरोबर जाणकारांनी आमच्या प्रयत्नाला सक्रिय हातभार लावला पाहिजे.

—संपादक

२

इनामगावची देवता

डॉ. प्र. न. देशपांडे

पुणे जिल्ह्यातील इनामगाव येथे १९६९ व १९७० मध्ये डेक्कन कॉलेज पोस्ट-ग्रॅज्युएट अँड रिसर्च इन्स्टिटयूट, पुणे ह्या संस्थेच्या पुरातत्त्व विभागाने उत्खनन केले. ह्या उत्खननात ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचे अवशेष सापडले. इनामगाव येथील उत्खननाच्या संदर्भात डॉ. ह. धी. सांकलिया लिहितात, 'इनामगावचे ताम्रपाषाणकालीन क्षेत्र बरेच मोठे विस्तृत स्वरूपाचे आहे आणि तेथील भूपृष्ठावरच ताम्रपाषाणकालीन अवशेष प्राप्त होतात. किरणोत्सर्ग–१४ या कालमापनपद्धतीच्या निष्कर्षावरून तेथील वरच्या थरातील काळाची निश्चिती खि. स. पूर्व ७०० ठरते आणि त्यानंतर मात्र ह्या वसाहतीवर कोणी वस्ती केलेली नाही. याचाच अर्थ अडीच हजार वर्षांपूर्वी ताम्रपाषाणयुगीन मानव आठशे वर्षे वस्ती करून राहिला[१].

उत्खननातील अवशेष

इनामगाव येथील उत्खननात वरच्या थरात गोल आकाराच्या घरांचे अवशेष सापडले. ह्या घरांतून तांबड्या रंगाच्या मातीच्या भांड्यांचे अवशेष मिळाले. ताम्र-पाषाण संस्कृतीचे एक खास वैशिष्ट्य येथे दृष्टोत्पत्तीस पडले. ते म्हणजे मृत व्यक्तीला राहत्या घरामध्येच पुरण्याची प्रथा ह्या संस्कृतीमध्ये अस्तित्वात होती.[२] गोल आकाराच्या घरांच्या खालील वस्तीच्या अवशेषामध्ये चौरसाकृती घरांचे अवशेष मिळाले. ही घरे आकाराने मोठी असून घराची जमीन चांगल्या प्रकारे बनवलेली असे. शिवाय एका घराकडून दुसऱ्या घराकडे जाण्याचे रस्तेही तयार केलेले होते. त्याच्या

आधारे डॉ. सांकलिया लिहितात, ' इनामगावचे त्या काळातील रहिवासी हे सर्वांत वरच्या थरातील रहिवाशांपेक्षा अधिक समृद्ध दिसून येतात. '[३]

मातृका

चौरसाकृती घरांचे अवशेष काळजीपूर्वक पाहात असताना उत्खननतज्ज्ञ डॉ. मधुकर ढवळीकर आणि डॉ. झैनुद्दिन अन्सारी ह्यांना एका घरात जमिनीत मुद्दाम तयार केलेला एक खड्डा दिसून आला. तेव्हा त्यांनी त्या भागाचे काळजीपूर्वक उत्खनन केले असता एक मातीची पेटी मिळाली. मातीच्या पेटीवर स्त्रीची मातीची मूर्ती ठेवलेली होती. ह्या मूर्तीशेजारी मातीचा एक बैल व अर्धगोलाकृती कडेही पडलेले होते.

मातीची पेटी लंबचौकोनाकृती असून ती १२ सें. मी. लांब, ५ सें. मी. रुंद आणि ६ सें. मी. उंच आहे. पेटीचे झाकणही मातीचे असून त्याच्या दोन्ही बाजूची टोके आकाराने उंच व अंतर्गोल असल्यामुळे ते पेटीला व्यवस्थित व घट्ट बसविलेले आढळले. मातीच्या पेटीत आणखी एक स्त्रीची मूर्ती आढळली.

ह्या दोन्ही मूर्तीच्या संदर्भात डॉ. सांकलिया लिहितात, ' आतील मूर्ती व पेटीच्या वर आढळून आलेली मूर्ती यांत एक महत्त्वाचा फरक दिसून आला. वरची मूर्ती ही शिरविरहित, केवळ धडच असलेली आढळून आली. तसेच ती मुद्दाम शिरविरहित बनविलेली असावी असे वाटते. पेटीच्या वरील व आतील मूर्तीची उंची पाच सेंटिमीटर इतकी असून, इतर परिमाणे एकसारखीच वाटतात. शरीराच्या बनावटीमध्ये उन्नत उरोजाशिवाय इतर भागांच्या बनावटीला काहीही प्राधान्य दिलेले दिसून येत नाही. तोंडाचा आकार पिंडीप्रमाणे लंबगोल आहे. हात आणि पाय हे आकाराने लहान केलेले आहेत. '[४]

वरील दोन्ही मूर्ती देवीच्या असून त्यांची पूजाअर्चा होत असावी असा निष्कर्ष डॉ. सांकलिया ह्यांनी काढलेला आहे. ज्या ठिकाणी ही पेटी मिळाली ते ठिकाण त्या घरातील देवघर असले पाहिजे असे अनुमानही डॉ. सांकलियांनी काढलेले आहे.[५] त्यांच्या मतानुसार ही देवता म्हणजे महाराष्ट्राची आदिमाता असली पाहिजे.[६]

इनामगावच्या आदिमातेच्या मूर्तीच्या संदर्भात डॉ. शां. भा. देव लिहितात, ' (इनामगाव येथे) मातीच्या डबीत सापडलेल्या मातृदेवतेच्या मूर्तीशिवाय दुसरी एक मस्तकविरहित मूर्ती मिळाली. बैलाला व मूर्तीला भोक पाडलेली तिसरी मूर्ती काडीच्या साहाय्याने वृषभवाहनावर बसविण्यासाठी बनविली गेली असली पाहिजे. इ. स. पूर्व १३०० च्या सुमारास वाहनयुक्त देवतांची पूजा महाराष्ट्रात केली जात असावी असे यावरून म्हणता येते. '[७]

डॉ. सांकलिया आणि डॉ. देव यांच्या मतानुसार ताम्रपाषाणयुगात म्हणजे इ. स. पूर्व १३०० च्या सुमारास मातृदेवतेची उपासना महाराष्ट्रात रूढ होती इनामगावच्या

उत्खननात सापडलेल्या उपरिनिर्दिष्ट मूर्तींचे स्वरूप लक्षात घेता अथर्ववेदात वर्णन केलेल्या 'कृत्या' ह्या अघोरी देवतेशी मला काही साम्य आढळले. अर्थात तेवढ्या-वरून इनामगावच्या मूर्ती म्हणजे कृत्या ह्या अघोरी देवतेच्या प्रतिकृती आहेत असे अनुमान काढणे योग्य ठरणार नाही. तथापि अधिक संशोधनासाठी दोन्ही देवतांच्या इनामगावच्या व अथर्व वेदातील कृत्यांच्या-साम्य असलेल्या घटकांच्या अभ्यास-कांनी विचार करावा ह्या हेतूने प्रस्तुत लेखात 'कृत्या' ह्या देवतेची काही वैशिष्ट्ये मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

अथर्ववेदातील कृत्या

अथर्ववेदातील कृत्या ही अघोरी विद्येची देवता असून तिची वर्णने ५, ८, १०, १२, १४ आणि १९ ह्या कांडांतून आलेली आहेत. कृत्या प्रयोगाविषयी पं. श्री. दा. सातवळेकर लिहितात, 'कृत्या प्रयोग, ज्यामुळे कोणास मारून टाकण्यात येते, त्याला म्हणतात. कोणाच्या घरात, शेतात, खाण्यापिण्याच्या वस्तूत, कपड्यात अथवा कोण्या अन्य ठिकाणी काही मारक वस्तू ठेवण्यात येते. तिच्या परिणामाने तो मरतो. त्या प्रयोगास कृत्याप्रयोग अथवा मारक प्रयोग म्हणतात.

'एका कानाची, डोळ्याची अथवा एका नाकपुडीची मूर्ती करून, ती खूप सुशोभित करतात. जो कोणी हा मूर्तीस स्पर्श करतो तो मरतो. मूर्तीशिवाय दुसरी सुद्धा काही वस्तू करण्यात येते. हिच्यामुळे मारण करता येते.

'या प्रयोगात काय करावयाचे असते, त्याचा विधी काय आहे, त्याची आज कोणास माहिती नाही. त्याविषयी आज काही ग्रंथही उपलब्ध नाही. त्यामुळे या प्रयोगाविषयी आम्ही जास्त काही सांगू शकत नाही.'[८]

भारतामध्ये प्राचीन कालापासून प्रचलित असलेल्या अघोरी विद्यांचा, जारणमारण मंत्रतंत्रांचा आणि तत्संबंधी देवतांचा चिकित्सक पद्धतीचे अभ्यास करण्याचा प्रयत्न अद्यापपावेतो विशेषत्वाने झालेला नाही. त्यामुळे अथर्ववेदातील कृत्याच्या प्रयोगाचे शास्त्र गूढ स्वरूपाचे वाटते. कृत्याच्या प्रयोगासंबंधी सविस्तर तपशील अथर्ववेदाच्या पाचव्या आणि सहाव्या कांडामध्ये आलेला आहे.

कृत्या तयार करून ती मातीच्या भांड्यात-पेटीत ठेवतात असा उल्लेख पाचव्या कांडाच्या ३१ व्या सूक्ताच्या पहिल्या श्लोकात आलेला आहे.[९] कृत्याची प्रतिकृती शेतात, स्मशानात किंवा घराच्या स्वयंपाकघरात (गार्हपत्ये अग्नौ अभिचेरुः) पुरलेली असते असे दहाव्या कांडाच्या पहिल्या सूक्तातील १८ व्या श्लोकात सूचित केलेले आहे.[१०] इनामगावची देवता ज्या परिस्थितीत सापडली ते लक्षात घेतल्यास उपरिनिर्दिष्ट वर्णनाशी साम्य आढळते.

अथर्ववेदातील दहाव्या कांडाच्या पहिल्या सूक्तात कृत्येचा घातक प्रयोग असफल

करण्याविषयी मार्गदर्शन केलेले आहे. विसाव्या आणि एकोणिसाव्या श्लोकांचा मराठी अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

'...उत्तम लोखंडाच्या तरवारी आमच्या घरात आहेत. हे कृत्ये ! तुझे सांधे आम्ही जाणतो की ते किती आणि कोणत्या प्रकारचे आहेत. ऊठ आणि येथून दूर पळून जा हे अज्ञात मारण-प्रयोग ! येथे तू कसली इच्छा करतोस...

हे कृत्ये ! तुझे डोके आणि पाय मी कापून टाकतो. तू येथून पळून जा. इन्द्र आणि अग्नी आमचे रक्षण करो, ज्याप्रमाणे संततीचे रक्षण माता करते.'[११]

इनामगावच्या उत्खननात सापडलेल्या मूर्तींपैकी एक मूर्ती पेटीवर आढळली. ही मूर्ती शिरविरहित असून पाय नसलेली आहे. अथर्ववेदातील शिर व पाय कापून टाकण्याचा उल्लेख या दृष्टीने मननीय वाटतो.[१२]

कृत्या आणि तिच्या प्रयोगाविषयीचा इतर तपशील येथे देण्याचे प्रयोजन नाही. इनामगावच्या मूर्तीमध्ये आणि ह्या अघोरी विद्येच्या देवतेमध्ये काही साम्यस्थळे आढळली, तेवढीच या ठिकाणी मांडण्याचा यत्न केला आहे. प्रारंभीच सांगितल्याप्रमाणे केवळ साम्यस्थळावरून इनामगावची देवता कृत्या असली पाहिजे असा निष्कर्ष काढणे सयुक्तिक नाही. अधिक संशोधनाची नितान्त आवश्यकता आहे. इनामगावच्या ताम्रपाषाण संस्कृतीचा कालखंड आणि अथर्ववेदाच्या रचनेचा कालखंड स्थूलमानाने एकच आहे ही गोष्टही येथे लक्षात घेण्यासारखी आहे.

संदर्भ

(१) महाराष्ट्र : अश्मयुग ते लोहयुग,
डॉ. ह. धी. सांकलिया, पृष्ठ २२

(२) तत्रैव, पृ. २७

(३) तत्रैव, पृ. २८

(४) महाराष्ट्रातील पुरातत्त्व–संपा. डॉ. सांकलिया व डॉ. माटे, पृ. ३७

(५) तत्रैव, पृष्ठ ३८

(६) महाराष्ट्र : अश्मयुग ते लोहयुग, पृ. २७

(७) पुरातत्त्व विद्या – डॉ. शां. भा. देव, पृ. १३१


(८) अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद, भाग ५
पं. श्री. दा. सातवळेकर, पृ. १७९

(९) — यां ते चक्रुरामे पात्रे.....

अथर्ववेद–५. ३१. १



संदर्भ : ' इनामगावची देवता '   मातीच्या पेटीतील स्त्रीमूर्ती



संदर्भ : ' इनामगावची देवता '   शिरविरहित मूर्ती

(१०) यां ते बर्हिषि यां श्मशाने क्षेत्रे
कृत्यां वलंग वा निचख्नुः
अग्नौ वा त्वा गार्हपत्येऽभिचेरुः
पाकं सन्तं धीरवरा अनागसम्

अथर्ववेद– १०. १. १८

(११) अथर्ववेद १०. १. २०–२१

(१२) ग्रीवास्ते कृत्ये पादौ चापि कर्त्स्यामि निर्द्रव ॥

अथर्ववेद–१०. १. २१

३

नद्यांची शारदीय क्षीणता

श्री. देवीसिंह चौहान, मुंबई

भर्तृहरीची तीन शतके प्रसिद्ध आहेत. हा विद्वान् इ. ५–६ व्या शतकातील मानला जातो. त्याच्या नीतिशतकात खालील श्लोक आहे :

मणिः शाणोल्लीढः समरविजयी हेतिनिहतो
मदक्षीणो नागः शरदि सरितः श्यानपुलिनाः ।
कलाशेषश्चन्द्रः सुरतमृदिता बालवनिता
तनिम्ना शोभन्ते गलितविभवाश्चार्थिषु नृपाः ॥

वामन पण्डिताचे समश्लोकी मराठी भाषान्तर असे आहे.[1]

शाणोल्लेख जया असा मणि, रणीं जो वीर घायाळला
संभोगें शिणली अशी नववधू, हस्ती न मस्तावला ।
ज्यांची स्वच्छ शरद्दतूंत पुलिनें त्या निम्नगा, चंद्रही
बीजेचा, प्रभु पात्रदतधन जो, ही शोभती क्षीणही ॥

वामन पण्डिताचे हे श्लोक मराठी भाषेला भूषणभूत असले तरी, मूळ श्लोकातील 'तनिम्ना' 'क्षीणता' हा शब्द किंवा त्याचा समानार्थ शब्द पण्डिताने आपल्या या श्लोकात योजिलेला नाही, एवढेच सांगून, पुढे चलू. भर्तृहरीच्या मूळ श्लोकात एखाद्या गोष्टीला आलेली क्षीणता, कृशता कशी शोभून दिसते, याचे वर्णन आहे.

---

१. शतकत्रय : अ. दा. घोसपूरकर, पुणे, १९५४, क्रमांक १. ४४.

मणि, योद्धा, हत्ती, शरदृऋतूतील नदी, बीजेचा चन्द्र, संभोगानंतरची नवयुवती आणि खजिना रिकामा झालेला राजा यांची विशिष्ट क्षीणता शोभून दिसते. या सात गोष्टींच्या वर्णनात तनिमा, क्षीणता, कृशता हा साधारण घटक आहे. 'तनिम्ना शोभन्ते,' क्षीणतेमुळे ही शोभतात असा मूळ श्लोकाचा आशय आहे. वामन पण्डितांनी हा क्षीणता शब्द, वा तसा अर्थ गाळलेला आहे.

मल्लिनाथाने रघुवंशावरील आपल्या टीकेत पाचव्या सर्गाच्या १६ व्या श्लोकावरील विवरणात, वरील भर्तृहरीच्या श्लोकाचा अगदी मार्मिक उपयोग (जणू हाच आशय त्याला अभिप्रेत होता) केलेला आहे. [२]

असो. प्रस्तुत या श्लोकातील शरद् ऋतूतील नद्यांची क्षीणता आपणास पाहावयाची आहे. शुरद् ऋतूचा काळ निश्चित आहे. मोनिअर वुइलिअम्सच्या संस्कृत कोशानुसार हा काळ आश्विन कार्तिक महिन्यांचा आहे. उत्तर भारतात हा काळ भाद्रपद आश्विनांचा मानण्यात येतो. दक्षिणापथात मात्र आश्विन-कार्तिकाची परम्परा अखण्डित आहे. या ऋतूत भारतातील नद्यांच्या जलप्रवाहाची अवस्था काय असते, जलप्रवाह अतिसमृद्ध कधी असतात व अतिक्षीण कधी बनतात, ही गोष्ट येथे विचारणीय आहे. जलप्रवाहाची सर्वसामान्य कल्पना निश्चित करताना, नद्यांना येणारे पूर बाजूला ठेवावे लागतील. कारण पूर येणे ही तात्कालिक बाब आहे. तो नदीच्या प्रवहणाचा स्थायिभाव नव्हे. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन भारतातील सर्वसाधारण नद्यांची प्रवाहक्षीणता व प्रवाहाधिक्य कधी असतात याचा विचार व्हावा. सिंधु, ब्रह्मपुत्रा, काही प्रमाणात गंगा आदी नद्यांचा अपवाद सोडल्यास, भारतातील नद्यांचा प्रवाह शरद् ऋतूत अधिकतम असतो. संस्कृत साहित्यातील शरद्-उदाशय आणि शरद्ध्रद–शरद् ह्रद म्हणजे "शरदृऋतूतील डबकी, तळी" हे शब्द याच सत्याची आठवण करून देणारे आहेत. तो पुढे मार्गशीर्ष-पौषात कमी कमी होत जातो. माघ मासातही, कमी होत असलेला जलप्रवाह साधारणतः बरा असतो. फाल्गुनात ऊन्ह कडक होते. नद्यांचे पाणी कमी कमी होत जाते. चैत्र वैशाखात जलप्रवाह क्षीण होण्याची प्रक्रिया चालूच असते. ज्येष्ठ मासात उन्हाळा कडक. नद्या बहुधा सुकून जातात. महाराष्ट्रात गोदावरी ही सर्वश्रेष्ठ नदी. तिला या महिन्यात खांडवे पडतात. असलाच तर प्रवाह क्षीणतम झालेला असतो. कृष्णाही याला अपवाद नव्हे. इतर नद्या केव्हाच सुकून गेलेल्या असतात. हीच अवस्था भारतातील इतर नद्यांची दिसून येते. म्हणून शरद् ऋतूत नद्या क्षीणप्रवाह असतात हे कथन भारतातील नद्यांना लागू पडत नाही. वस्तुस्थितीचा विचार न करता केलेले हे विधान होईल.

मग शरद् ऋतूत क्षीणतम प्रवाह असलेल्या नद्या भारतात आहेत का? याचे

---

२. रघुवंशम् : निर्णयसागर, मुंबई, १९४८.

उत्तर, सिंधु, ब्रह्मपुत्रा, काही प्रमाणात गंगा, घागरा इत्यादी नद्यांच्या बाबतीत, होय असे, द्यावे लागते. कारण त्या हिमनद्या आहेत. पावसाळ्यातल्यापेक्षा उन्हाळ्यात या नद्यांचा प्रवाह अधिक समृद्ध असतो. भर्तृहरीने वर्णिलेले भौगोलिक सत्य सामान्यपणे भारतात दिसून येत नाही. वामन पंडित हा महाराष्ट्र भूमीतील कवी. ज्ञानेश्वराने गीतेवर भावार्थदीपिका लिहिली, आता आपण यथार्थदीपिका लिहू असे म्हणणारा. परंतु त्यांच्यातही, वरील श्लोकातील, शरद् ऋतूत नद्यांना प्रवाहक्षीणता येते, याची, यथार्थता लक्षात आली नाही. अर्थविवरणाची संजीवनी घेऊन निघालेल्या मल्लिनाथाने यावर काही प्रकाश टाकलेला नाही. त्याने शतकत्रय काव्यावर टीका लिहिलेली नाही, हे खरे. असो.

भर्तृहरि हा भारतीय विद्वान् आहे. तो पाणिनि, यास्क आदीसारखा, प्राचीन भारतात समाविष्ट असलेल्या, पण उत्तरकालात वेगळा असलेल्या, सिंधु नदीच्या पश्चिमेकडील अफगाणिस्थान देशाचा तो रहिवाशी नव्हे. त्याला शरद् ऋतूत नद्या प्रवाहक्षीण असतात या भौगोलिक सत्याचा प्रत्यय येण्याची सुतराम् शक्यता नाही. शरद् ऋतूत नद्या प्रवाहक्षीणतम असतात, हे सत्य कोठे तरी पूर्वसूरीने नोंदविलेले असावे. त्याचा केवळ अनुवाद भर्तृहरीने केलेला आहे. त्याची ही नोंद आत्मप्रत्ययी नव्हे, ती असूही शकत नाही कारण असे की बहुसंख्य भारतीय नद्यांच्या बाबतीत हे घडतच नाही.

नद्यांच्या शारदीय प्रवाहक्षीणतेच्या नोंदीचा मागोवा घेण्याचा मी प्रयत्न केला. मला पूर्वसूरींचा असा आधार मिळाला नाही. असो. भारतातील नद्यांचे हंगामातील प्रवहणमान कसे असते हे पाहण्याचा प्रयत्न केल्यास आपणाला शरद् ऋतूतील प्रवहणाचा अंदाज येऊ शकतो. या कामी दक्षिणापथातील नद्यांपैकी केवळ नर्मदा नदीची चांगली माहिती मिळू शकली.[३] भारतीय नद्यांची नर्मदादेखील या कामी प्रतिनिधी बनू शकते. या नदीची प्रवहण माहिती पृ. १५७ वर देण्यात आलेली आहे. नर्मदेची माहिती, गोदावरी, कृष्णा, कावेरी, आदी नद्यांच्या बाबतीतही मार्गदर्शक आहे. तसेच ती उत्तरवाहिनी गंगेच्या उपनद्यांच्या बाबतीतही उपयोगी आहे. चंबल, सोन, महानदी व गोदावरीची उपनदी वैनगंगा यांच्या बाबतीतही उपयुक्त आहे. नर्मदेतून दरवर्षी ३,३६६ कोटी घन मीटर पाणी वाहून जाते. या नदीवर चार ठिकाणी नोंद केलेली आढळते. त्यांपैकी गर्देश्वर मुखाच्या बाजूचे असल्याने तेथील प्रवहणक्षमता पाहिल्यास एकंदर प्रश्नांची उकल होते. गर्देश्वर येथे जुलै ते आक्टोबर या चार महिन्यांच्या काळात ३,५४० कोटी घनमीटर पाणी वाहून जाते. नोव्हेंबर ते जून या आठ महिन्यांतील जलप्रवहण ३२७ कोटी घनमीटर

---

३. रिवर्स ऑफ इण्डिया : एस. डी. मिश्रा, दिल्ली, १९७०

आहे. म्हणजे पावसाळा व शरद् ऋतूत एकूण जलप्रवहणाच्या ९१·५४ टक्के वाहून जाते व पुढील आठ महिन्यांतील हा आकडा ८·४६ टक्क्याचा आहे. गोदावरी १,४६५ किलो मीटर वाहते तर कृष्णा १४०० किलो मीटरचा प्रवास करते. गोदावरीचे प्रस्रवणक्षेत्र ३,१३,३८९ चौ. किलो मीटर असून कृष्णेचे २,५९,००० चौ. किमी चे आहे. दोन्ही नद्या केवळ मुखाजवळ काही थोड्या अंतरात नौकानयनास, होड्यासाठी, उपयुक्त आहेत. शरद् ऋतूत याही दोन्ही नद्यांचे जलप्रवहण, नर्मदेप्रमाणेच इतर आठ महिन्यांतल्यापेक्षा अतिशय अधिक असले पाहिजे. नर्मदा ही या दोन नद्यांची प्रतिनिधी आहे. याचा स्पष्ट अर्थ असा की, शरद् ऋतूत नदीला प्रवहणक्षीणता असते, हे नर्मदा, गोदावरी व कृष्णा या तीन प्रमुख नद्यांच्या बाबतीत खरे नाही. हाच अनुभव इतर किरकोळ नद्यांच्या बाबतीत येतो.

भारतात खऱ्या हिमनद्या चार-पाचच आहेत. या नद्यांत प्रथम क्रमांकाला सिंधु नदी येते. ती साधारणतः अक्षांश ३२° व रेखांश ८२° च्या प्रदेशात ५,१८२ मीटर उंचीवर उगम पावते.[४] हा कैलास पर्वताचा उत्तरीय प्रदेश आहे. येथे सिंधु वायव्यवाहिनी आहे. ती नंगा पर्वत शिखराच्या (२६,६६० फूट) उत्तरेकडून वाहात जाऊन ३६° अक्षांश व ७४° रेखांश प्रदेशातून दक्षिणवाहिनी बनते.[५] गिलगित व हुंजा या हिमनद्या तिला उत्तरेकडून येऊन मिळतात. सर्व काराकोरम हिमपर्वतराजीचे दक्षिणेकडील प्रस्रवण तिच्या प्रवाहात सामील होते. काश्मीरातील नंगा पर्वत (२६,६६० फूट), के–२ पर्वतशिखर (२३,२५० फूट), अलिंग कांगरी (२३,९९० फूट), कैलास (२०,३०० फूट), बुदोक सजुम (२०,००० फूट) व लिओ पोरग्यूल (२२,३०० फूट) या हिमालयीन पर्वतशिखरांचे उत्तरदिशीय प्रस्रवण सिंधु नदीत मिसळते. हा भारतीय प्रदेशातील मिळालेला या महानदीचा करभार होय. सिंधु नदीचे प्रस्रवणक्षेत्र ११,७८,४४० चौ. किमी आहे. त्यापैकी ४,५३,२५० चौ. किमी म्हणजे ३८·४६ टक्के क्षेत्र हिमालय, काराकोरम आणि हिंदुकुश या हिमपर्वतीय प्रदेशाचे आहे. याचा परिणाम असा आहे की, सिंधूच्या जलप्रवहणात, कोणत्या मोसमात विशेष फरक नाही. हा फरक केवळ उन्हाळ्यात दिसून येतो. प्रवहणाच्या वार्षिक सरासरीच्या दुप्पट पाणी मे महिन्यात वाहते. या नदीत डिसेंबर मध्यापासून फेब्रुवारी मध्यापर्यंत जलप्रवहण कमीत कमी असते (पृ. १०), मार्च महिन्याच्या मध्यापासून पाण्याची पातळी वाढू लागते. अधिकाधिक वाढ १५ जुलै ते १५ ऑगस्ट या महिन्यात असते. एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्यांत एकूण जलप्रवहणाच्या ८५ टक्के वाहून जाते; बाकीच्या ६ महिन्यांत

---

४. तत्रैव, पृ. १७

५. रिडर्स डायजेस्टचा ' जगाचा ॲटलास ', लंडन १९६९, पृ. ६८ व ६९

केवळ १५ टक्के वाहते. सतलज या हिमनदीचे प्रमाणही वरीलप्रमाणेच आहे. (मि. पृ. १५१, परिशिष्ट ३)

अफगाणिस्तानातील सिंधु नदीच्या पाण्यातील हविर्भाग काही कमी नव्हे. काबूल शहराच्या पश्चिमोत्तरेच्या २०० एक मैलांपासून पाणी सिंधूत येते. काबूलपासून (३४°३०′, ६८°४५′ सामान्यपणे) साधारणतः मित्तक शिखरापर्यंत (सामान्यपणे ३७°, ७५°) ६५० मैल लांब पसरलेल्या हिंदुकुश पर्वतराजीचे पूर्वेकडील पाणी सिंधु नदीत येते. हा सर्व प्रदेश शरद् ऋतूत हिमाच्छादितच असतो. हिंदुकुश पर्वतराजीची उंची १२००० फुटांपासून ईशान्येकडे २०-२१ हजार फुटांपर्यंत वाढत गेलेली आहे. काबूलच्या उत्तरेस असलेल्या कोहे अजेंजर (३५° ६०° प्रदेश) पर्वताची उंची १३,०१८ फुटाची आहे. उत्तरेतील एक हिंदुकुश पर्वतशिखर मिहमानयूल (३७°–१६′, ७४° ४३′) १६००० फूट उंचीचे आहे. हिंदुकुश पर्वतरांगेत तिरिच मीर (२५, ४६० फूट) आदि ४–५ हिमाच्छादित शिखरांचे मोठे पर्वत आहेत. या सर्व बर्फाळ प्रदेशाचे पाणी सिंधूत मिसळते.

हीच अवस्था ब्रह्मपुत्रा नदीची आहे. मानस सरोवरातून किंवा त्याच्या जवळून तीन नद्या पूर्वेकडे ब्रह्मपुत्रा, पश्चिमेकडे सतलज व दक्षिणेकडे घागरा, वाहतात. बर्फाळ प्रदेशातल्या प्रस्रवणाचा अधिकाधिक लाभ होत असलेली ब्रह्मपुत्रा होय. ती साधारणतः ३०° ३०′, ८२° १०′ प्रदेशातून पूर्ववाहिनी आहे. तिचे उगमस्थान १६,८९२ फूट उंचीवर आहे. ती भारताच्या अतिपूर्वेकडील नमचा बरवा (२५,४४७ फूट) या गिरिशिखराला प्रदक्षिणा करून दक्षिणवाहिनी बनते. हा या नदीचा १८०० कि. मी. चा प्रवास आहे. या लांबीपैकी तिबेटातील ब्रह्मपुत्रा ६४० कि. मी. भागात नौकानयनास उपयुक्त आहे. ११,९७२ फूट उंचीवर नौकानयनास उपयोगी असलेली हीच जगातील एकमेव नदी होय.

हिमालयीन पर्वतराजींच्या प्रस्रवणाचे उत्तरेकडील पाणी या नदीत मिसळते. ब्रह्मपुत्रेच्या वामतटीय क्यो या उपनदीवर ल्हासा नगर वसलेले आहे. लांबीच्या दृष्टीने जगातील नद्यांत सिंधु १८ व्या व ब्रह्मपुत्रा २३ व्या क्रमांकावर येतात.

अफगाणिस्तानात

भारतातील सिंधु नदीप्रमाणेच काबूल नदीला उत्तरेकडून मिळणाऱ्या नद्यांची अवस्था आहे. उत्तरेकडून काबूलला मिळणाऱ्या नद्यांत, पश्चिमेकडून पूर्वेकडे, पंजशीर, अलिंगर, कुनार आणि स्वात या नद्यांचा समावेश आहे. पंजशीर उगम पावते हिंदुकुश पर्वतात. त्या हिंदुकुश पर्वतभागाची समुद्रसपाटीपासून उंची साधारणतः १३००० फुटांची आहे. शिखरे अधिक उंचीची असतात. या नदीच्या लगतच्या प्रदेशावर

अजेंजर पर्वत[६] १३,०१८ फूट असून, अर्जो शिखराची उंची १३,९२२ फूट आहे. शेजारच्या बगलान पर्वताची उंची १५,९२२ फूट आहे. अक्षय हिमरेषा अफगाणिस्तानात साधारणतः १५ हजार फुटांची आहे. या मर्यादेला फार्सी भाषेत यख-ई कुहना म्हणतात. पंजशीर नदी ही छोटी व कमी उंचीवरून उगम पावलेली आहे. तरी ही नदी बऱ्याच प्रमाणात बर्फावर पोसली जाणारी आहे. दुसरी नदी, आलिंगर असून अलिशान ही तिची दक्षिणतटीय उपनदी आहे. ही नदी अजेंजर पर्वतातून उगम पावते. त्याची उंची १३,०१८ फूट असून शेजारी. हिंदुकुश व अखताश नावांची शिखरे आहेत. याच शिखरसमूहातून उत्तरेस मुंजान नदी वाहते. हे आमूदर्याचे खोरे आहे. काबूल नदीची सर्वाधिक महत्त्वाची कुनार नदी. वस्तुतः पाण्याच्या मोजमापाने ती काबूलपेक्षाही महत्त्वपूर्ण आहे. चित्राल संस्थानाच्या परिसरात तिला चित्रालही म्हणतात. कुनार काबूलपेक्षाही अधिक लांब आहे. ही नदी थेट अफगाणिस्तानच्या जणू उत्तर सीमेवरून निघते. या भागात तिला यरखिम असे नाव आहे. ती लुंखो या हिंदुकुश पर्वताच्या शिखराच्या पूर्वेकडून वाहते. या शिखराची (३६° ४५′, ७२° १५′) उंची २२,६४० फूट आहे. दक्षिणवाहिनी अशी ही कुनार सद इस्त्रग शिखराचे पाणी गोळा करीत दक्षिणेस पुढे सरकते. या शिखराची उंची २४,१७० फूट आहे. पुढे ती तिरिच मीर या नावाची दोन शिखरे उजवीकडे सोडून, पाण्याचा करभार स्वीकारीत पुढे जाते. एका तिरिच मीर शिखराची उंची २५,२६० फूट असून दुसऱ्याची काहीशी कमी आहे. ही हिमशिखरेच आहेत. कुनार नदीच्या बश्गुल आणि प्रसुन अथवा पेच या दक्षिणतटीय उपनद्या हिमनद्याच आहेत. पेच ही काफिरिस्तानातील हिमपर्वतसंचाचे पाणी घेऊन पुढे जाते. कुनारची एक वामतटीय उपनदी उत्तरवाहिनी असून ती एका शाह या शिखरापासून (१८,७५० फूट) उगम पावते. याच शिखराच्या पूर्व बाजूने उगम पावून दक्षिणवाहिनी स्वात (ऋग्वेदातली सुवास्तु) नौशेरा नगराजवळ काबूलमध्ये विलीन होते. या स्वातची उजवीकडून मिळणारी उपनदी पंजकोरा नामे असून, तीही स्वातप्रमाणे त्याच शिखरप्रदेशातून उगम पावते, अफगाणिस्तानच्या ईशान्येस असलेल्या वखान (सं. वक्षु, वंक्षु) प्रदेशाचे टोक ३७° ७५′ आहे. वखानचा प्रदेश वर्षातून ९ महिने बर्फाखाली असतो. आमू (वखान नदी) नदीचा दक्षिणेकडील प्रदेश अधिक उंच असल्याने कुनार, गिलगित आणि हुंजा या नद्या वखानच्या उगमाजवळून निघतात.

हिंदुकुश पर्वतरांगेने उत्तर अफगाणिस्तानचे दोन भाग होतात. पूर्वेकडील भागच शिखरमय व बर्फाळ आहे. या सर्व प्रदेशाचा पाणलोट सिंधु नदीचा आहे.

---

६. पोलिटिकल अद हिस्तारिकल गाझेतिअर ऑफ अफगाणिस्तान : लुद्विग अदामेव, ग्राज-आस्त्रिया, १९७२, खण्ड १

या भागात सिंधूला दक्षिणतटीय उपनद्या नाहीतच. याला उत्तरेकडील गिलगित नदीचा अपवाद आहे. हिंदुकुशच्या पूर्व पाणलोटाची सर्व जलसंपत्ती काबूलमार्गे सिंधूत येते. एवंच या सर्व नद्या हिमनद्या होत. काबूल नदीविषयी विशेष माहिती मिळत नाही. परंतु काबूल नदीचा व तिच्या वरील उपनद्यांचा प्रवाह शरद् ऋतूत कमीत कमी असतो, याची शंका नसावी. सिंधु आणि सतलजविषयी मागे जे सांगितले ते संपूर्णतया काबूल नदीलाही लागू पडते. काबूलही शरद् ऋतूत क्षीण झालेली असते. नदीच्या रोडावण्याने भारतात लोकांना दुःख होते. सिंधु व काबूलची क्षीणता सुखकारी आहे कारण दोन-तीन महिन्यांत या नद्यांना भरपूर पाणीच येते असे नाही तर पूर व महापूरही येतात. म्हणून भर्तृहरीच्या कविमनाला ही क्षीणता शोभून दिसणारी वाटली.

उजबेकिस्तान, ताजिकिस्तान

आमूदर्या अफगाण सीमेपर्यंत पश्चिमवाहिनी आहे. आमूच्या उत्तरेकडील सर्व प्रदेशही, दक्षिणेकडील भागाप्रमाणे, पर्वतीय आहे. हा पर्वतीय ताजिकिस्तानातला गोर्नो बदख्शान म्हणून ओळखला जातो. हाच खरा पामीर प्रदेश आहे. पश्तो भाषेत या पामीरचे वर्णन बाम-ई दुनिया, 'पृथ्वीचे छत' असे केले जाते. हिंदुकुशसारखाच हा प्रदेश बर्फमय असतो. याच प्रदेशातून मध्य आशियाची सर्वाधिक मोठी नदी, आमू, प्रस्रवण करते. गोर्नो बदख्शान प्रदेशात तिचा उगम होतो. हा पामीर प्रदेश होय. याची सरासरी समुद्रसपाटीपासून उंची ५००० ते ५,५०० मीटर आहे. सर्वोच्च पर्वतशिखर 'साम्यवाद' नामे ७,४९५ मीटर (२४,५९० फूट) उंच आहे. दुसरे 'लेनिन' शिखर ७,१३४ मीटर उंचीचे आहे. 'विजय' – पोबेदा हे शिखर ७,४३९ मीटर उंच आहे. काही शिखरे ६०००–७००० मीटर उंचीची आहेत. या उंच पर्वतसमूहामुळे आमूदर्याचा उगम अक्षय बर्फ व मोठमोठे हिमपर्वत यांत झालेला आहे. या प्रदेशात हजारांवरून अधिक हिमशिखरे आहेत. त्यांतील फचंको नामे हिमपर्वत ७० कि. मी. लांब, मध्य आशियात सर्वात मोठा आहे.[७] या प्रदेशाची हिमरेषा सामान्यपणे ४२०० ते ५२०० मीटरवर नांदते.[८] या हिमप्रदेशाचे क्षेत्रफळ ८००० चौ. कि. मी. आहे. (१ मीटर= ३.२८) या दोन्ही पुस्तकांत उजबेकिस्तान देशाची भूमी, हवामान इत्यादींची चर्चा आहे. या देशाला नद्या अनिवार्य आहेत. याच्या पाण्याने शेतीसाठी जलसिंचन होते.

---

७. उजबेकिस्तान : एल्. एन्. बाबुश्किन, मास्को, १९७३, पृ. २६.

८. सोवियत रशिया, भौगोलिक सर्वेक्षण (इंग्रजी) : कालेस्निक व पावलेंको, मास्को, १९७६, पृ. १०१-२

त्यामुळे वाळवंटात सुपीक प्रदेश निर्माण झालेले आहेत. उजबेकिस्तान व ताजिकिस्तान देशातील नद्यांना बर्फाचे भरपूर पाणी मिळते. वसंत ऋतू जसजसा प्रौढ होत जाईल तसतसे नद्यांचे पाणी वाढत जाते. पर्वत जितका उंच तितके त्याच्या शिखरावरचे हवामान शीत असते. पर्वताचा पायथा व कटिप्रदेश, वप्रभाग यातील बर्फ अगोदर वितळत जाते. वितळण्याची प्रक्रिया सर्व पर्वतभागात सारखी नसते. म्हणून ही प्रक्रिया बराच काळ चालू राहते. म्हणून नद्यांना आवश्यक असा पाणीपुरवठा क्रमाक्रमाने दीर्घकाळपर्यंत होत राहतो.

ज्या नद्या कमी उंच पर्वतांपासून उगम पावतात व ज्यांना बर्फाच्या पाण्याची प्राप्ती कमी व मर्यादित असते, अशा नद्या उन्हाळ्यात कोरड्या पडतात.[९] अशा नद्यांना 'सइस' नद्या असे म्हणतात. 'सइस' शब्द शरद् शब्दाचे तद्भव रूप असावे. सइस नद्यांच्या प्रदेशातील पाण्याअभावी जीवन असह्य बनते. शरद् ऋतूत मिळणारे पाणी टिकवावे कसे, हे तेथील लोकजीवनातील मोठे कोडे आहे. म्हणून लोक शरद् ऋतूत मिळणारे पाणी जतन करण्याचा कसोशीने प्रयत्न करतात. सपाट भागात जमिनीत खड्डे करून त्यात जमलेले गोडे पाणी सुरक्षित ठेवण्यात येते. त्या कृत्रिम विहिरीच होत. अशा जलसंचयाला 'सर्दोबा' असे म्हणतात. सर्दोबा शब्द शरद् आणि अप, ईराणी आब 'पाणी' यांचा समास आहे. सपाट प्रदेशात असे सर्दोबा ठिकठिकाणी आढळतात. आमूदर्याच्या मुखप्रदेशात असा एक 'चिलगुंबज' नावाचा सर्दोबा १९व्या शतकात बांधलेला आहे. त्याच्यावर पक्के गुंबद बांधलेले असून ते वर्तुळाकार आहे. त्याचा व्यास १५ मीटर आहे. पक्क्या विटांनी बांधलेल्या सर्दोबाचा खालचा अर्धा भाग भूपृष्ठाच्या आत आहे. ही गोड्या पाण्याची प्रचंड विहीर आजही आहे. शरद् ऋतूतील पाणी संग्रहित करण्यासाठी जमिनीत बांधलेल्या नाल्यातून पाणी येते. उन्हाळ्यात लोकांना ते जीवनदायी आहे. जमिनीत खड्डे करून पाणी संग्रहित करण्याच्या युक्तीस 'हकी' म्हणतात. या हकींना वरती छत नसते. उन्हाळ्यातील कडक उन्हाने, बाष्पीभवनाने हकीतील पाणी उडून जाते. जुलै-ऑगस्ट महिन्यात क्वचितच हकीत पाणी सापडते.

सपाट भाग व पर्वतांच्या वनप्रदेशात केवळ पावसाच्या पाण्यावर होणाऱ्या शेतीस 'बोगारी शेती' असे म्हणतात. मराठी माणसाची ही जिरायत शेती. कृत्रिम जलसिंचन येथे नसते. बोगारी शब्दात संस्कृत भग शब्द संनिहित आहे. र हा प्रत्यय आहे. म्हणजे ही देवाची शेती, केवळ पावसाच्या पाण्यावर होणारी. बहुश्रुत वाचकाला संस्कृत साहित्यातील देवमातृक कृषि संज्ञेची येथे आठवण होईल. कृत्रिम, मनुष्यनिर्मित नदीच्या जलसिंचनाने होणाऱ्या शेतीस नदीमातृक किंवा अदेवमातृक कृषि

९. बाबुरिकन, पृ. २३.२

म्हटले जाई. आपल्या किरातार्जुनीय काव्याच्या आरंभीच, दुर्योधनाच्या राज्यातील शेतकऱ्यांची, अदेवमातृक अर्थात नदीमातृक जलसिंचित शेतीमुळे, कशी सुबत्ता होती याची, भारवीने (शक ५५६ पूर्व) आपल्या अर्थगौरव विशेषाची चुणूक, खालील श्लोकात दाखविली आहे.

सुख्येन लभ्या दधतः कृषीवलैरकृष्टपच्या इन सस्यसम्पदः ।
वितन्वति क्षेममदेवमातृकाः चिराय तस्मिन् कुरवः चकासति १.१७

असो. शरद् ऋतूत कोणत्या नद्या क्षीण होतात याचा हा विवेचनप्रपंच केलेला आहे.

वरील चर्चेवरून काही गोष्टी पुढे येतात. आशिया खंडाच्या मध्यातील हिंदुकुश, पामीर, काराकोरम व हिमालय या बृहत् पर्वतश्रेणीमुळे, वायव्येकडील उजबेकिस्तान व दक्षिणेकडील अफगाणिस्तान व भारत यांच्या जीवनपरंपरेवर कसा परिणाम झालेला आहे, हे आपण पाहिले. यातील एकच वैशिष्ट्य आपण तपासले. या पर्वत-श्रेणीतल्या नद्या उन्हाळ्यात भरपूर पाण्याचा साठा या देशांना पुरवितात. त्यांचा प्रवाह शरद् ऋतूतच क्षीण होतो. उन्हाळ्याच्या बर्फवितळीमुळे त्या भरपूर पाणी वाहून नेतात. या देशातील ज्या नद्या हिमनद्या नाहीत त्यांचा अधिकतम प्रवाह क्षीणतम होतो. नाहीसाही होतो.

उजबेकिस्तान, अफगाणिस्तान व भारत हे भारत-युरोपीय गणांचे इ. पूर्व २००० वर्षांपासून वसतिस्थान होते. पहिल्या देशात इराणी व भारतीय समाईकपणे राहात होते. भारतीय आर्यगणांनी अफगाणिस्तानात शतकानुशतके वास्तव्य करून भारतात अतिक्रमण केले. म्हणून या आर्यगणांचे सांस्कृतिक अवशेष या तिन्ही देशांत सापडतात. मग शब्दाचा तिन्ही देशांत आजही होत असलेला वापर, ही त्याची खूण आहे. हिमनद्यांना उन्हाळ्यात भरपूर पाणी असले तरी इतर ठिकाणी पाण्यावाचून जीवन कसे असह्य असते, याची प्रचिती या देशातून येते.

मुंबई, भाद्रपद २८, १९०२

४

कान्हेरी येथील बौद्ध भिक्षूंची स्मारकगुंफा

डॉ. सौ. शोभना गोखले, डेक्कन कॉलेज, पुणे ६

कान्हेरीचे प्राचीन शिलालेखातील नाव 'कृष्णगिरी' किंवा 'कृष्णशैल' असे आहे. मुंबईच्या बोरिवली या उपनगरापासून हे ठिकाण आग्नेयीस दहा कि. मी. अंतरावर आहे. कान्हेरीचा परिसर वनराजींनी सुशोभित केलेला असून तिथे जवळ-जवळ एकशेआठ बौद्ध गुंफा आहेत. सोपारा, कल्याण, चौल या प्राचीन व्यापारी केंद्रापासून ते नजिकच आहे. या ठिकाणी बौद्ध भिक्षूंना राहण्यास गुंफा, पाण्याची टाकी, भोजनशाला, व्याख्यानशाला या गोष्टी तर आहेतच, परंतु विशेष म्हणजे येथे एक विस्तीर्ण स्मशानगुंफा आहे.

कृष्णगिरी पर्वताच्या आग्नेयेस, मुख्य चैत्यापासून दीड कि. मी. अंतरावर ही स्मशानगुंफा असून तेथे जाण्यास डोंगरावर पायऱ्या खोदल्या आहेत. या स्मशान-गुंफेचा दर्शनी भाग पावसाळ्यातील वाऱ्याच्या माराने ढासळलेला आहे.

ही स्मशानगुंफा १८० मी. लांब आहे. या स्मशानगुंफेचा पृष्ठभाग विटांचे स्तूप आणि विटांच्या भुकटीने आच्छादिलेला आहे. या ठिकाणी जवळजवळ शंभराच्यावर विटांच्या स्तूपांचे पाये आहेत. त्या स्तूपांचे व्यास १·८० मी., १·५८ मी., व १·३५ मी. आहेत. स्तूपांचे आकार गोलाकार आहेत. या ठिकाणी दगडाच्या हर्मिका इतस्ततः विखुरलेल्या आहेत. स्मशानगुंफेच्या उत्तरेकडे एकतृतीयांश भागामध्ये षोडश कोनाकृती दगड आणि विटांचा स्तूप आहे. त्याचा व्यास ६·६ मी. आहे. या स्तूपाच्या मागील भिंतीमध्ये तीन खोल्या आहेत. खोल्यांमध्ये भग्नावस्थेतील शिल्पे

आहेत. गुंफेचा दगड चांगल्या प्रतीचा नसल्यामुळे ही शिल्पे अतिशय वाईट अवस्थेत आहेत. या खोल्यांतून गिलावा आणि रंगकामाचे अवशेष आहेत.

१८५३ साली या ठिकाणी असलेल्या षोडश कोनाच्या स्तूपाचे वेस्ट यांनी उत्खनन केले.[१] या स्तूपाभोवती, सिंह, वाघ, हरिणे, यांची चित्रे असलेले दगड निघाले. याशिवाय कीर्तिमुख आणि बुद्धाचे पुतळेही आहेत. स्तूपाभोवतालच्या शिलापट्टिकांवर एका पट्टिकेवर ध्यानस्थ बुद्ध दोन्ही बाजूंस चवरीधारी, मध्ये लहानसा खांब, दुसऱ्या शिलापट्टिकेवर व्याख्यानमुद्रेत बुद्ध दर्शविलेला आहे. यातील खांब एलिफंटा येथील खांबासदृश आहेत, हेही वेस्ट यांनी आपल्या अहवालामध्ये नमूद करून ठेवले आहे, हे या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे.

फर्ग्युसन,[२] बर्जेस,[३-४] भगवानलाल[१] इंद्रजी, ह्यांनी या स्मारकगुंफेचा अभ्यास केला. कान्हेरी येथील श्रेष्ठ भिक्षूंच्या स्मृत्यर्थ हे विटांचे स्तूप उभारले असतील याबद्दल कोणाचेही दुमत नव्हते. परंतु कान्हेरी येथील सांस्कृतिक जीवनामध्ये या भिक्षूंच्या कार्याचा काय वाटा होता? कान्हेरी येथील वास्तुशिल्प इतिहासामध्ये विटांचे स्तूप केव्हा उभारले? ही पद्धत केव्हा नष्ट झाली? इत्यादी गोष्टी पुरेशा ऐतिहासिक पुराव्याअभावी समजू शकल्या नाहीत.

१९७५ मध्ये मी कान्हेरीस गेले असता या स्मारकगुंफेच्या समोरील दरीमध्ये मला काही कातीव दगड आढळले. कान्हेरी येथील अधीक्षक श्री. व. म. वाणी यांच्या साह्याने मी या दरीमध्ये नवीन शिलालेखांसाठी शोध घेतला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आम्हास या ठिकाणी जवळजवळ २० लेखांच्या शिलापट्टिका सापडल्या. या शिलापट्टिकांचा आकार सामान्यपणे २५ सें. मी. × १० सें. मी. असा आहे. या शिलालेखांवर बौद्ध भिक्षूंच्या स्मृत्यर्थ स्तूप उभारला अशी स्पष्ट नोंद असून लेखामध्ये त्याचे नाव आणि त्याचे गुणविशेष यांचाही उल्लेख आहे. हे स्तूप म्हणजे स्मारकगुंफेतील विटांचे स्तूप होत याबद्दल शंका उरली नाही. या लेखांची लिपी पाचव्या-सहाव्या शतकातील पेटिका शीर्षक ब्राह्मी लिपी असून, भाषा प्राकृत आहे. अजंठा आणि घटोत्कच गुंफेतील लेखाच्या अक्षरपद्धतीशी त्यांचे साम्य आहे. कान्हेरी येथील महत्त्वाचे काही लेख खालीलप्रमाणे आहेत :

शिलालेख १ ओळ १. थेराणं आय्य विजय

ओळ २. सेणाणं तेविजाणं अरहन्ताणं थूभं

सनातन धर्मामध्ये तीन वेदांमध्ये पारंगत असलेल्या ब्राह्मणास '**त्रिवेदी**' म्हणतात. बौद्ध परंपरेनुसार तीन तऱ्हेचे ज्ञान मिळालेल्यास '**तेविजु**' म्हणतात. '**अंगुत्तर-निकाय**'[६] या ग्रंथात तीन तऱ्हेचे ज्ञान खालीलप्रमाणे सांगितले आहे.

१. पुब्बेनिवास – मागील तीन जन्म जाणणे.

२. दिब्बचक्खु – दिव्यदृष्टी.

३. आसवखयञाण – दुःखक्षयाचे ज्ञान.

कान्हेरी येथील विजय भिक्षू हा ' तेविज ' होता.

शिलालेख २ : – ओळ १. (थे) राणं

ओळ २. (अर्) हन्ताणं झायिणं थूभं

या लेखावरून असे दिसते की हा ' स्थविर ' ' झायि ' होता. बौद्ध तत्त्वज्ञानामध्ये ' ध्यान ' याचा विवक्षित अर्थ आहे. एका विशिष्ट मानसिक अवस्थेतील धर्माची अनुभूती हा त्याचा अर्थ आहे. त्यास पंचांगिक ध्यान म्हटले आहे. १ वितर्क. २ विचार. ३ प्रीती. ४ सुख आणि ५ एकाग्रता. भिक्षूचे नाव या शिलालेखात फुटलेले असले तरी त्याचे गुणविशेष आपणास कळतात.

शिलालेख ३. ओळ १. थेराणं आय्य महाणं अर

ओळ २. हन्ताणं छलभिञाणं पटि

ओळ ३. संभिदपात्ताणं थूभं

या लेखात भिक्षूस आय्य, महान्, अर्हत् या उपाधी आहेतच. याशिवाय त्यास **' षड्भिज्ञान '** आणि **' पटिसंभिदा '** प्राप्त झाल्या होत्या. षड्भिज्ञान हे सहा प्रकारचे आहे : १. इद्धि–सिद्धि २. दिब्बसोतम्—दिव्यश्रुती ३. परचित्त-विजानना—दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणे ४. पुब्बेनिवास–पूर्वीचे जन्म जाणणे ५. दिब्बचक्खु —दिव्यदृष्टी ६. आसव-खयञाण—दुःखपरिहाराचे ज्ञान.

कान्हेरी येथील भिक्षूस उपरिनिर्दिष्ट षड्भिज्ञान होते. धम्मपदामध्ये म्हटले आहे की हे षड्भिज्ञान प्राप्त झालेल्या भिक्षूस पुन्हा जन्म नसतो.

पुब्बेनिवासं यो वेदि सग्गावयं च पस्सति ।
अथो जातिखयं पत्तो अभिञा वोसितो मुनी ॥

धम्मपद, ७·२६·४१·४२३

वरील लेखातील भिक्षूस षड्भिज्ञानाखेरीज **' पटिसंभिदा '** प्राप्त झालेली होती. बौद्ध वाङ्मयामध्ये चार तऱ्हेच्या पटिसंभिदा सांगितलेल्या आहेत : **१. अत्थपटिसंभिदा**—ग्रंथातील अर्थ सांगणे **२. धम्मपटिसंभिदा**—ग्रंथातील विवरण करणे. **३. निरुतिपटिसंभिदा**—ग्रंथावर विवेचक टीका करणे. **४. पटिभाणपटिसंभिदा**—प्रतिभेने ग्रंथाचा अर्थ सांगणे.

ह्या चार गुणांनी लोकांच्या हृदयाचा ठाव घेता येतो, असे बौद्ध वाङ्मयात म्हटले आहे. कान्हेरीच्या भिक्षूस **' षड्भिज्ञान '** आणि **' पटिसंभिदा '** प्राप्त झाल्या होत्या.

शिलालेख ४. ओळ १ थेराणं भदन्त दामा

ओळ २ णं अणागामिणं थूभं

बौद्ध तत्त्वज्ञानानुसार अर्हत्पद प्राप्त करण्यास चार अवस्थांतून जावे लागते त्या चार अवस्था खालीलप्रमाणे :

१. सोतापन्न—अष्टांग—मार्ग चोखाळणारा भिक्षू.

२. सकदागामी—एकच जन्म घेणारा भिक्षू.

३. अणागामी–मनुष्यरूपाने पुनर्जन्म न घेणारा भिक्षू.

४. अर्हत् – पुनर्जन्मातून मुक्त झालेला भिक्षू.

भदन्त दामा हा ' **अणागामिन्** ' होता.

शिलालेख ५ : ओळ १.........णं धि

ओळ २. (मू) लाणं अरहन्ता (णं)

ओळ ३. ....थूभं

प्रस्तुत शिलालेख हा त्रुटित असला तरी ' **धि-मूल** ' हा महत्त्वाचा शब्द सुस्थितीत आहे. धम्मसंगणि या ग्रंथावरील अट्ठसालिनी[८] या टीकेमध्ये भिक्षूंचे गुण-विशेष सांगितले आहेत.

चित्तचेतसिकानं धारणवसेन अविच्छेदनो वा पवतनवसेन कुसलसंतानं धारेति-वीधिती । धिनिच्चेसा अविट्ठितकारिता ।

जो भिक्षू आपल्या कार्यापासून च्युत होत नाही, आपले काम टाळत नाही, ज्याचा आपल्या भावनांवर पूर्ण ताबा आहे, जो स्थिर-चरित्र आहे त्यास ' **धितिमूल** '[९] म्हणावे.

शिलालेख ६ : ओळ १ थेराणं आय्य णायेणं

ओळ २ अरहन्ताणं थू (भं)

ह्या लेखातील ' **णायेणं** ' हा शब्द महत्त्वाचा आहे. 'पटिसंभिधामग्गपालि'[१०], [११] या ग्रंथात ज्ञान हे त्र्याहत्तर प्रकारचे असल्याचे सांगितले आहे. सर्वसामान्य श्रावक सदुसष्ट प्रकारचे ज्ञान मिळवू शकतो. उरलेलें सहा प्रकारचे ज्ञान फक्त असामान्य श्रावकांनाच मिळविता येते.

१. **इंद्रियपरोपरिय जाण** – या ज्ञानामुळे श्रावकास दुसऱ्या माणसाच्या मनातील हेतू कळतो. बौद्ध तत्त्वज्ञानानुसार मन, श्रद्धा, वीर्य, स्मृती, समाधी, प्रज्ञा यास इंद्रिय कल्पिलेले आहे.

२. **आशयानुशयजाण** : या ज्ञानामुळे श्रावकास दुसऱ्याच्या मनाचे व्यापार तर कळतातच परंतु भविष्यकाळात दुसऱ्याच्या मनःप्रवृत्तीतील होणारे बदलही त्यास कळतात.

३. **यमकपटिहिरजाण** : या ज्ञानाचा बौद्ध वाङ्मयामध्ये पुनःपुनः उल्लेख आढळून येतो. बुद्धाने हा चमत्कार श्रावस्तीमध्ये केला होता. शरीराच्या एका भागातून

पाण्याचा प्रवाह आणि दुसऱ्या भागातून अग्निज्वाळा काढल्या. हा तो चमत्कार होता.

४. **महाकरुणाञाण :** महायान वाङ्मयामध्ये सर्व प्राणिमात्रांच्या वरील करुणेस '**महाकरुणाञाण**' असे म्हटले आहे..

५. **सब्बञुतञाण** आणि ६. **अनावरणञाण :** सब्बञुतञाण आणि अनावरणञाण यामध्ये फारसा फरक नाही. ज्या श्रावकास सर्व प्रकारचे ज्ञान असते त्यास सर्वज्ञ म्हटले आहे त्यास अतीत (भूतकाळातील ज्ञान), पच्चुपन्न (वर्तमानकाळातील ज्ञान) आणि अनागत (भविष्यकाळातील ज्ञान) ज्ञान झालेले असते. थेरवादामध्ये ज्ञान हा श्रावकाचा सर्वश्रेष्ठ गुण मानला आहे. उपनिषदांतील आत्मन् म्हणजेच ब्रह्मन् या सर्वश्रेष्ठ ज्ञानापेक्षा बौद्धधर्मातील ज्ञान हे भिन्न आहे. उपनिषदांतील गूढता बौद्धधर्मात नाही. सत्य आणि गुणांची सर्वश्रेष्ठ पातळी मिळविण्यासाठी शरीर आणि मन यांच्या नियमाचे काटेकोर पालन करण्याची शिकवण उपनिषदाने दिली आहे. बौद्धधर्माने उपनिषदांची ही शिकवण स्वीकारली, हे कान्हेरीच्या लेखांनी स्पष्ट केले आहे.

शिलालेख ७ : ओळ १ आय्य संघनंदा
ओळ २ णं अरहन्ताणं वसीणं थूभं

आर्य संघनंद हा '**वसी**' होता. '**विशुद्धिमग्गा**'मध्ये ज्या माणसाचा आपल्या भावनांवर ताबा आहे त्यास '**वसी**' म्हटले आहे. हा ताबा पाच प्रकारचा आहे.

१. **आवज्जनावसी :** समाधीचा विचार.
२. **समापज्जनावसी :** समाधीचा निश्चय.
३. **अधिट्ठानवसी :** समाधीस बसल्यानंतर न ढळण्याचा निश्चय.
४. **उट्ठानवसी :** समाधीतून बाहेर येणे.
५. **पच्चवेक्खणावसी :** समाधीनंतरचा विचार.

शिलालेख ८. ओळ १ थेराणं आय्य इ.
ओळ २ न्द सेणाणंपयुतत्ताणं प
ओळ ३ भिणाणं अरहन्ताणं

इंद्रसेनाने योजना केलेला हा भिक्षू वेगळ्या शाखेचा होता.

शिलालेख ९. ओळ १ थेराणं आय्य वहिण्णा
ओळ २ ग्राणं अरहन्ताणं तिल
ओळ ३ पालकाणं थूभं

या सर्व शिलालेखांमुळे कान्हेरीच्या स्मशानगुंफेचा काल ठरविण्यास एक अद्वितीय पुरावा मिळाला आहे. स्मशानगुंफेच्या सुरुवातीस बुद्धांच्या पादुकांशेजारी 'परिगहिता' अशी अक्षरे असलेला दुसऱ्या शतकातील शिलालेख आहे. यावरून मुख्य

चैत्याच्या उभारणीच्या काळातच ही स्मशानगुंफाही अस्तित्वात होती, हे स्पष्ट होते. स्मशानगुंफेच्या मागील भिंतीमध्ये जे दगडात कोरलेले स्तूप आहेत त्यावरून भिक्षूंच्या स्मृत्यर्थ दगडी स्तूप उभारत असत हीही गोष्ट स्पष्ट होते. परंतु विटांच्या स्तूपाची सुरुवात का झाली? स्मशानगुंफेतील मध्यभागी असलेल्या दगडी स्तूपावरील जे खांब आहेत त्यांचे साम्य एलिफंटा येथील खांबांशी असल्याचे वेस्ट यांनी दाखवून दिले आहे. हा मुद्दाही लक्षात घेण्याजोगा आहे.

प्रा. स्पिंक[१२] यांनी कलचुरीकाळाच्या पूर्वार्धातील वास्तुशिल्पाची चर्चा करताना एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. अजिंठा, एलिफंटा, जोगेश्वरी येथील शिल्प, मूर्ती आणि वास्तू यांचा तौलनिक अभ्यास करून त्यांनी असे दाखवून दिले आहे की, वाकाटकांचा ऱ्हास झाल्यानंतर अजंठा येथील शिल्पकार कलचुरींच्या दरबारी राजाश्रयासाठी आले असावेत. उपरिनिर्दिष्ट शिलालेख वाकाटकांच्या पेटिकाशीर्षक लिपीमध्ये लिहिलेले आहेत. त्यांचे अजंठा आणि घटोत्कच गुंफेतील लेखातील लिपीशी साम्य आहे, हेही वर सांगितलेच आहे. स्पिंक यांनी मांडलेल्या सिद्धान्तास हा शिलालेखांचा पुरावा अधिकच सबळ करणारा आहे. कान्हेरी येथील तीन नंबरच्या गुहेतील प्रचंड बुद्धाचे पुतळे, तेथील बुद्धांच्या पुतळ्याखाली असलेले लेख, यांचे अजंठा येथील शिल्प–शैलीशी विलक्षण साम्य आहे हे सर्वश्रुत आहे. कलचुरींच्या राजाश्रयाखाली कान्हेरीस पुन्हा कलेच्या एका नवीन उपक्रमास सुरुवात झाली. कान्हेरीच्या इतिहासामध्ये एका नव्या पर्वाची भर पडली.

भिक्षूंच्या स्मृत्यर्थ विटांचे स्तूप उभारणे ही एक नवीनच कल्पना होती. कान्हेरीच्या शिल्पकारांनी ही कल्पना केव्हा, कशी उचलली? याचे उत्तर आपणास कान्हेरीस सापडलेल्या एका त्रैकूटकालीन ताम्रपटावरून कळते. इ. स. १८३९ मध्ये बर्ड यांना मुख्य चैत्यासमोर असलेल्या विटांच्या स्तूपामध्ये कलचुरी शक (इ. स. ४९४-९५) २४५ या काळातील ताम्रपट सापडला.[१३] या ताम्रपटामध्ये सिंधू देशातील पुष्यवर्म्याचा पुत्र भिक्षू बुद्धरुचि याने 'दशबलि' बुद्धाच्या नावाने दगड आणि विटा यांचा चैत्य बांधला. (घटितपाषाणइष्टिक) या बांधकामास 'चैत्य' म्हटले आहे. यावरून आणखी एक गोष्ट स्पष्ट होते, की बुद्धाच्या नावाने बांधलेल्या स्तूपास चैत्य म्हटले आहे. भिक्षूच्या स्मृत्यर्थ बांधलेल्या स्तूपास स्तूप म्हटले आहे. कान्हेरी येथे राव यांनी केलेल्या उत्खननामध्ये[१४] तीन भट्ट्या सापडल्या आहेत. त्यावरून कान्हेरीच्या स्तूपाच्या विटा तेथेच तयार केल्या ही गोष्ट स्पष्ट होते.

कान्हेरीच्या या नवीन लेखांवरून असे म्हणता येईल की

१. या सर्व लेखांमध्ये स्थविरवादी भिक्षूंची नावे आहेत. बौद्धधर्माची स्थविरवादी ही सर्वांत प्राचीन शाखा आहे. सांची[१५] येथे स्थविरवादी गुरूंची परंपरा होती. त्यांना

'सुत्तातिक', 'विनायक', 'पच्चनेकायिक' अशा उपाधी होत्या. सांची येथे गुरूंच्या नावाने स्तूपही उभारले आहेत. परंतु स्वतंत्र स्मशानगुंफा ही फक्त कान्हेरी येथेच आहे.

२. या सर्व लेखांची भाषा प्राकृत आहे. पाचव्या शतकाच्या[१५] अखेरीस प्राकृत भाषेचा लोप होऊन तिची जागा संस्कृतने घेतली. परंतु कान्हेरी येथे प्राकृत-परंपरा शिल्लक होती ही गोष्ट विशेष आहे.

३. कान्हेरी आणि भाजे या ठिकाणी दगडाचे स्मारक-स्तूप आहेत. स्मारक-स्तूप आणि विटांचा वापर या दोन्ही गोष्टी पाचव्या शतकात काही नवीन नव्हत्या. परंतु गुरूंच्या स्मृत्यर्थ स्मारकगुंफा उभारण्याची कल्पना पश्चिम महाराष्ट्रातील लेण्यांच्या इतिहासात नावीन्यपूर्ण होती ही गोष्ट निश्चित. ही नावीन्यपूर्ण कल्पना सर्वसाधारपणे शंभर वर्षे टिकून होती. त्यानंतर तिचा लोप झाला.

४. या लेखातील गुरूंच्या गुणविशेषावरून कान्हेरी येथे गुरुपरंपरेचा पुरावा पहिल्यांदाच मिळत आहे. कान्हेरी येथे शैक्षणिक केंद्र राष्ट्रकूटांच्या काळामध्येही अस्तित्वात होते. राष्ट्रकूट राजा प्रथम अमोघवर्ष याचा मांडलिक पुल्लशक्ति[१६] याचा कान्हेरी येथे लेख आहे. बौद्धविहाराला दिलेल्या देणगीमध्ये काही रक्कम पुस्तके विकत घेण्यासाठी होती. ही गोष्ट कान्हेरी येथील शैक्षणिक परंपरेचा पाठपुरावा करणारी आहे यात शंका नाही.

५. या सर्व लेखांतील लिपीचे अजंठा आणि घटोत्कच या गुंफांतील लिपीशी साम्य आहे.

६. वाकाटकांचा ऱ्हास झाल्यानंतर तेथील शिल्पकार या ठिकाणी आले असल्याची शक्यता नाकारता येणार नाही. स्मशानगुंफेमधील गिलावा आणि अस्पष्ट रंगाकृती अजिंठ्याची परंपरा येथे आल्याची साक्ष देतात.

७. स्मशानगुंफेच्या पाठीमागील भिंतीमध्ये तीन खोल्या आहेत. यावरून त्रिरत्नाची कल्पना सूचित होते. १. बुद्ध २. धम्म व ३. संघ. तिसऱ्या खोलीमध्ये सिंहनादसूक्त मोठ्या कलापूर्ण रीतीने दर्शविले आहे. बुद्ध सिंहासनावर बसविलेला दाखविला आहे. या सिंहासनाला दोन सिंह दाखविले आहेत. सिंहनादसूक्तामध्ये असे सांगितले आहे की, ज्या वेळी बुद्ध धर्मप्रचारासाठी निघे त्या वेळी तो सिंहगर्जनेसारख्या आवाजाने बोले.—

परिसासु सिंहनादं नदति। **मज्झिमनिकाय १·१२**

८. कान्हेरीच्या मुख्य चैत्यासमोरील विटांच्या स्तूपामध्ये त्रैकूटकालीन ताम्रपट मिळाला. त्यामध्ये विटांचा स्तूप बांधला अशी स्पष्ट नोंद आहे. यावरून विटांचे स्तूप बांधण्याची प्रथम सुरुवात त्रैकुटक कालात झाली आणि कलचुरीकालात ती कल्पना अधिक लोकप्रिय झाली.

९. या लेखावरून चैत्य आणि स्तूप या वास्तुशास्त्रातील संज्ञा भिन्न होत्या हे स्पष्ट होते. बुद्धाच्या नावाने उभारलेल्या स्तूपास चैत्य म्हटले आणि बौद्धभिक्षूच्या नावाने उभारलेल्या स्तूपास ' थूभ ' म्हणजे स्तूप म्हटले आहे.

कान्हेरी येथील शिलालेखपट्टिका

शिलालेख १ : ओळ १ थेराणं आय्य विजय
ओळ २ सेणाणं तेविजाणं
ओळ ३ अरहन्ताणं थूभ

शिलालेख २ : ओळ १ थेराणं भदन्त विज
ओळ २ यमित्ताणं अरह—
ओळ ३ न्ताणं थूभं

शिलालेख ३ : ओळ १ थेराणं आय्य
ओळ २ खेमकाणं थूभं

शिलालेख ४ : ओळ १ ...... राणं ......
ओळ २ ...... रहन्ताणं झायिणं थूभं

शिलालेख ५ : ओळ १ ...... धी
ओळ २ ......लाणं अरह (न्ता) णं
ओळ ३ ......थूभं

शिलालेख ६ : ओळ १ थेराणं भदन्त दामा-
ओळ २ णं अणागामिणं थूभो

शिलालेख ७ : ओळ १ थेराणं आय्य महाणं अर-
ओळ २ हन्ताणं छलभिञाणं पटि-
ओळ ३ संभिधपाताणं थूभं

शिलालेख ८ : ओळ १ थेराणं आय्य इ ......
ओळ २ न्दसेणपयुत्ताणं प
ओळ ३ भिणाणं अरहन्ताणं
ओळ ४ सताणं थूभं।

शिलालेख ९ : ओळ १ आय्य संघनंदा
ओळ २ णं अरहन्ताणं वसिणं थूभं।

शिलालेख १० : ओळ १ थेराणं आय्य सा
ओळ २ मिणं अंधकविरा

शिलालेख ११ : ओळ १ थेराणं आय्य वहिण्णा
ओळ २ ग्राणं अरहन्ताणं तिल
ओळ ३ पालकाणं थूभं ।

शिलालेख १२ : ओळ १ थेराणं (आय्य) णायिणं
ओळ २ अरहन्ताणं थू (भं)

शिलालेख १३ : ओळ १ थेराणं......
ओळ २ अरहस्ताणं थूभं

शिलालेख १४ : ओळ १ थेराणं आय्य खेम
ओळ २ काणं अरहन्ताणं (थूभं)

शिलालेख १५ : ओळ १ थेराणं आय्य......
ओळ २ अरहन्ताणं......

शिलालेख १६ : ओळ १ थेराणं आय्य
ओळ २ अरहन्ताणं
ओळ ३ ......थू (भं)

शिलालेख १७ : ओळ १ (थे) राणं आय्य......
ओळ २ ....
ओळ ३ हन्ता........

शिलालेख १८ : ओळ १ थेरा........
ओळ २ था ....
ओळ ३ हन्ता.........

शिलालेख १९ : ओळ १ थेराणं आय्य......
ओळ २ ......हन्ता......
ओळ ३ ....थूभो

शिलालेख २० : संपूर्णतया अस्पष्ट

संदर्भ ग्रंथ

१. वेस्ट इ. डब्ल्यू : जबॉब्रॅरॉएसो. खं. ६, पृ. ११८.

२. फर्ग्युसन जे. आर. व बर्जेस जे. : दि केव्ह टेम्पल्स ऑफ इंडिया, दिल्ली, १९६९, पुनर्मुद्रित.

३. बर्जेस जे. : दि केव्हज् ऑफ एलोरा ॲण्ड अदर्स ब्राह्मॅनिकल ॲण्ड जैन केव्हज् इन वेस्टर्न इंडिया, वाराणशी, १९७० पुनर्मुद्रित.

४. बर्जेस जे. : **रिपोर्ट ऑफ दि बुद्धिस्ट केव्ह टेम्पल्स ॲण्ड देअर इन्स्क्रिप्शन्स** वाराणशी, १९६४, पुनर्मुद्रित.
५. बर्जेस जे., भगवानलाल इंद्रजी : **इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम दि केव्ह टेम्पल्स ऑफ वेस्टर्न इंडिया**, दिल्ली, १९७६, पुनर्मुद्रित.
६. **अंगुत्तरनिकाय**, पहिली आवृत्ती, नालंदा, १९५८, पृ. १८४.
७. भावे विनोबा : **धम्मपद**, २६·४१·४२३.
८. बापट पी. व्ही , वाडेकर आर. डी. : **अट्ठसालिनी**, १९४२ (३·२८५)
९. बापट पी. व्ही., वाडेकर आर. डी. : **धम्मसंगणि**, १९४० (१३) **चित्तु-पादककंडम्**, पृ. २३
१०. **पटिसंभिदामग्गपालि**, ॲन एन्सायक्लोपिडिया ऑफ दि फिलॉसॉफी ऑफ दि खुद्दकनिकाय ॲण्ड सुत्तकपिटक.
११ टी. डब्ल्यू. र्‍हे डेव्हीड : **दि पाली टेक्स्ट सोसायटीज पाली इंग्लिश डिक्शनरी**, १९२५.
१२. वाल्टर स्पिंक : ' मॉन्युमेन्टस् ऑफ दि अर्लि कलचुरी पीरियड ', **जर्नल ऑफ इंडियन हिस्ट्री**, १९६८, पृ. २६३.
१३. बर्जेस जे. व भगवानलाल इंद्रजी : इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम दि केव्ह टेम्पल्स ऑफ वेस्टर्न इंडिया, १८८१, पृ. ५७.
१४. राव एस. आर. : ' एस्कॅव्हेशन्स ॲट कान्हेरी ', प्रो. पी. बी. देसाई **फेलि-सिटेशन, खं. स्टडीज इन इंडियन हिस्ट्री**, धारवाड, १९७५, पृ. ४५.
१५. मार्शल जे. आणि फुशेर ए. : **' दि मॉन्युमेन्टस् ऑफ सांची '** पृ. ४१, २९८.
१६. बॅशम ए. एल्. : **वन्डर दॅट वॉज इंडिया**, पृ. ३५१
१७. वेस्ट डब्ल्यू. : **जबॉब्रॅएसो** : खं. ६, १८६२, पृ. ८.

५

सातव्या निजामाचे धार्मिक धोरण, विशेषतः मराठवाड्याच्या संदर्भात, १९११–१९४८

डॉ. पी. व्ही. काटे, नूतन महाविद्यालय, सेलू

ऐतिहासिक पार्श्वभूमी

मराठवाडा हा विभाग इ. स. १९४८ पर्यंत हैदराबाद संस्थानात अंतर्भूत होता व निजामी राजवटीचा अविभाज्य घटक होता. हैदराबाद संस्थानचे भारतीय गणराज्यात सप्टेंबर, १९४८ मध्ये विलीनीकरण करण्यात आले आणि १९५६ पासून भाषावार प्रांतरचनेप्रमाणे मराठवाडा हा सध्याच्या महाराष्ट्र राज्यास जोडण्यात आला. हैदराबाद संस्थान हे भारतातील इंग्रजी साम्राज्याचा केंद्रबिंदू म्हणून त्यास फार महत्त्व होते. भारतातील राष्ट्रवादाच्या विकासास आळा घालण्यासाठी या संस्थानचा इंग्रजांनी उपयोग केला. हैदराबाद संस्थानात निजामाची सत्ता असल्यामुळे त्याच्या धार्मिक धोरणाचे मराठवाड्याच्या जीवनावर बरेच आघात झाले. सातव्या निजामाच्या धार्मिक धोरणाचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत निबंधात केलेला आहे.

मोगल साम्राज्याच्या ऱ्हासाच्या काळात चिन कुलीजखान म्हणजेच निझाम-उल् मुल्क आसफजहा पहिला हा सुभेदार म्हणून दक्षिणेत आला. इ. स. १७२४ मध्ये साखरखेड्याच्या लढाईत मुबारीजखान या मोगल सेनापतीचा पराभव करून त्याने स्वतःच्या राज्याची स्थापना केली. तो अत्यंत धूर्त व व्यवहारवादी असल्यामुळे त्याने परधर्मसहिष्णुतेचे धोरण अंगीकारले व सर्व धर्मीयांचा पाठिंबा मिळवून

आपली सत्ता बळकट केली. २१ मे १७४८ रोजी त्याचे निधन झाले. त्याच्या मृत्यू-नंतर साधारण चौदा वर्षे सत्तास्पर्धा चालू होती. इ. स. १७६२ मध्ये निजामअली हा सत्ताधीश झाला. त्याने इ. स. १८०३ पर्यंत राज्य केले. त्यानंतर त्याचा पुत्र सिकंदरजहा (१८०३–१८२९) हा राजा झाला. या काळात राज्यकारभाराची सर्व सूत्रे राजा चंदूलाल या हिंदू मंत्र्याकडेच असल्यामुळे परधर्मसहिष्णुतेच्या धोरणाचा पुरस्कार केला गेला. सिकंदरजहानंतर नासिर-उद्-दौला (१८२९ ते १८५७), अफजल-उद् दौला (१८५७ ते १८६९) व मीर महबूब अलीखान (१८६९ ते १९११) हे राजे होऊन गेले. मीर महबूब अलीखान याच्या काळात सालारजंग (१८५३–१८८३) या पंतप्रधानाने विविध सुधारणा हाती घेऊन लोककल्याणाचे प्रयत्न सुरू केले. प्रशासनाचे आधुनिकीकरण करण्यासाठी उत्तर हिंदुस्थानातील काही विद्वान व तज्ज्ञ लोक हैदराबाद राज्यात आणले. ह्यात बरेच मुस्लिम होते सहाव्या निजामाने (मीर महबूब अलीखान) धार्मिक बाबतीत उदार धोरणाचा अवलंब केला जाईल अशी घोषणा केली. त्यांच्या धार्मिक धोरणाचे सूत्र

"ला इकराह फिंद् दिन लाकुम दिनुकुम वा-लियद्दीन"[१]

हे होते. धार्मिक श्रद्धेच्या बाबतीत कोणतीही सक्ती केली जाणार नाही. तुमच्यासाठी तुमचा धर्म व माझ्यासाठी माझा धर्म हे आदर्श व उदार धोरण राबविले जाणार होते. पण अवघ्या पंधरा वर्षांनंतर जाहीर केलेल्या धोरणापेक्षा भिन्न धोरणाची सुरुवात करण्यात आली.

इ. स. १८८५ मध्ये दसरा व मोहरम हे दोन्ही सण एकाच वेळी आले. हिंदूंनी दसरा कसा साजरा करावा किंबहुना कसा साजरा करू नये यासंबंधी अत्यंत कडक नियम निजाम सरकारने जाहीर केले. त्या नियमांचा ढोबळ मथितार्थ असा होता :

(अ) हिंदूंनी स्वतःच्या घरात पूजा करावी पण वाद्ये वाजवू नयेत, फटाके उडवू नयेत अथवा मौज करू नये.

(ब) हिंदूंनी दसऱ्याची मिरवणूक काढू नये.

(क) मोठ्या मंदिरात पूजा चालू असताना कंपाऊंड वॉलच्या बाहेर वाद्यांचा आवाज येता कामा नये.

या नियमांचे उल्लंघन करणारा विरुद्ध कायदेशीर कार्यवाही केली जाईल असे जाहीर करण्यात आले.[२]

वरील नियमांचे अवलोकन केल्यास हे स्पष्ट दिसते की, हे नियम अत्यंत अन्याय-कारक व एकांगी होते. हिंदूंनी मोहरमच्या सणासाठी स्वतःच्या धर्माचरणांचा त्याग करावा हीच भूमिका वरील नियमांत आढळते. हिंदूंनी त्यांच्या परंपरागत दसरा या सणाचा आनंद उपभोगावयाचा नव्हता. कायदा व शांतता पालन करण्याची सर्व जबाबदारी केवळ हिंदूंवरच लादण्यात आली होती. सहाव्या निजामाच्या काळात

लोककल्याणाची अनेक कामे झाली असली तरी ही इस्लाम धर्म व मुस्लिम समाज यांना विशेष सवलती देण्यास सुरुवात केल्यामुळे सामाजिक असंतोषाची बीजे पेरली गेली व त्याचा परिपाक सातव्या निजामाच्या काळात झाला.

सातव्या निजामाचे धोरण

२९ ऑगस्ट १९११ या दिवशी म्हणजेच वयाच्या २५ व्या वर्षी मीर उस्मान अलिखान बहादूर, सातवा निजाम सत्तेवर आला. तो अत्यंत धनलोभी व चिक्कू असून साध्या राहणीचा पुरस्कर्ता होता. हैदराबादच्या आधुनिकीकरणासाठी त्याने अविश्रांत श्रम केले यात संशय नाही. इतर संस्थानिकांपेक्षा आपले स्वतंत्र अस्तित्व आहे असे मानणारा व हैदराबादची व्यवस्था एखाद्या राष्ट्राप्रमाणे ठेवणारा तो राजा होता. त्याने आपल्या राज्यात स्वतंत्र वाहतूक व्यवस्था, रेल्वे व पोस्ट, चलन व्यवस्था, बँका, लष्कर व सिव्हिल सर्व्हिस या गोष्टींची सुसंबद्ध सोय केली. सत्तेवर आल्यावर त्याने स्वतःचे धार्मिक धोरण जाहीर केले. तो म्हणाला—

" As a ruler I am the follower of another religion as well which may be characterised as " love towards all " because under me live people of different faiths and different communities and the protection of their houses of worship has been for a long time a part of the constitution of my State: "[३]

" ' सर्वांविषयी प्रेम ' व सर्वांच्या पूजास्थानांचा आदर ठेवणे हे सूत्र धार्मिक बाबतीत आवलंबिले जाईल कारण या राज्यात विविध धर्मांचे लोक राहतात व या राज्याची ती वंशपरंपरा आहे म्हणून सर्वांना समानतेने वागविले जाईल ", असे आश्वासन निजामाने दिले होते.

निजाम सरकारच्या धार्मिक धोरणात धर्मांतराची मोहीम कधीच नव्हती. तसेच निजाम सरकारने हिंदूंचे एकही देवस्थान पाडले नाही. मशिदीप्रमाणे हिंदू मंदिरांनाही खिदमतमाश (सेवेबद्दल अनुदान) व मददमाश (अर्थसाह्य) दिले. इतकेच नव्हे तर हैदराबाद संस्थानाबाहेरील हिंदू देवस्थानासाठीदेखील आर्थिक साह्य दिले. याशिवाय हिंदूंच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत म्हणून मुस्लमांना गोहत्येपासून परावृत्त करण्याचाही प्रयत्न केला. या उदार धोरणामुळे श्रीमती सरोजिनी नायडू देखील भारावून गेल्या व त्यांनी खालील काव्य लिहिले.

Beneath whose sway concordant dwell
The peoples whom your laws embrace,
In brotherhood of diverse creeds,
And harmony of diverse race :[४]

धार्मिक निर्बंध

इ. स. १९१६ नंतर निजामाच्या धार्मिक धोरणामध्ये आमूलाग्र बदल झाला व त्याने हिंदूंवर अनेक निर्बंध लादले.

हैदराबाद राज्यात सरकारच्या धार्मिक धोरणाबद्दल जी फर्माने निघत त्याला ('अहकामे उमूरे मजहबी') धार्मिक खात्याचे हुकूम म्हणत असत.

इ. स. १९१७ मध्ये दसरा व मोहरम हे सण एकाच वेळी आले. तेव्हा निजाम सरकारने (१३ अजूर १३२६ फसली) इ. स. १९१७ मध्ये खालील आदेश जाहीर केले. त्यांपैकी काही आदेश पूर्वी सहाव्या निजामाने जाहीर केलेले होतेच. त्यात सातव्या निजामाने आणखी भर घातली, त्यामुळे ते हिंदू समाजाला अधिक जाचक ठरले. त्यांचा सारांश खाली दिला आहे.

आदेश नं. १ (सर्क्युलर)

(अ) हैदराबाद शहरातील व जिल्ह्यातील सर्व हिंदूंनी स्वतःची पूजा कोणतेही वाद्य न वापरता करावी.

(ब) भक्तामा (आंध्रातील देवता) या देवतेची घराबाहेर मिरवणूक काढू नये. हिंदूंनी घरगुती मंदिरातही वाद्य वाजवू नये.

(क) हिंदूंना सीमोल्लंघनासाठी जावयाचे असेल तर त्यांनी अत्यंत शांततेने सुतकी चेहऱ्याने जावे. दसऱ्याच्या दिवशी ध्वज लावता येणार नाही. तो मोहरमच्या पंधराव्या तारखेस लावावा.

आदेश नं. २

कोणताही धार्मिक उत्सव धर्मखात्याच्या पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाही.

आदेश नं. ३

मशिदीसमोर अथवा मशिदीपासून ३०० पावलांच्या आत वाद्य वाजविता येणार नाही. या आदेशात केवळ नमाजाच्या वेळी वाद्य वाजवू नये असे न म्हणता वाद्यच वाजवू नये असे म्हटलेले होते.

आदेश नं. ४

एखाद्या सार्वजनिक ठिकाणी नवीन धार्मिक उत्सव सुरू केला असेल अथवा जुन्या उत्सव प्रथेचे पुनरुज्जीवन केल्यामुळे सामाजिक शांततेचा भंग होण्याची शक्यता वाटल्यास सरकार त्यावर बंदी घालील.

आदेश नं. ५

हैदराबाद शहर अथवा इतर कोणत्याही जिल्ह्यात मुसलमानांची संख्या जर खूप असेल तर तेथील मंदिराचा विस्तार व डागडुजी करता येणार नाही. खाजगी व्यक्ती

देखील स्वखर्चाने अशा मंदिराची डागडुजी करू शकणार नाही.

आदेश नं. ६

हैदराबाद राज्य हे इस्लामी राज्य असल्यामुळे सरकार इस्लाम धर्म व मुसलमान यांच्याबद्दल सहानुभूती बाळगील.

आदेश नं. ७

मिरवणूक काढावयाची असल्यास जिल्ह्यातील तहसीलदाराला व हैदराबाद शहरात कमिशनरला दहा दिवसांची पूर्व सूचना देणे आवश्यक आहे याशिवाय इ. स. १९३२ मध्ये (२४ अमरदाद १३३२ फ.) एक आदेश काढण्यात आला. त्याप्रमाणे धार्मिक प्रवचनांनाही सरकारच्या धर्मखात्याची पूर्व परवानगी सक्तीची करण्यात आली.[५]

निर्बंधांची कारणमीमांसा

सातव्या निजामाने ही धार्मिक बंधने का लादली असावीत याचा विचार करणे आवश्यक आहे. इ. स. १९११ मध्ये तो सत्तेवर आला. आपली सत्ता अधिक बळकट करण्यासाठी स्वतःच्या जातीचा अव्याहत पाठिंबा मिळत राहावा ही कल्पना त्यास सुचली असेल. मुस्लिम समाजाचा असा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांना खूष करणे आवश्यक होते. त्यामुळे जेव्हा इ. स. १९१७ मध्ये दसरा व मोहरम हे सण एकाच वेळी आले तेव्हा हिंदू समाजापेक्षा मुस्लिमांना विशेष सवलती दिल्यामुळे त्यांचा पूर्ण पाठिंबा मिळणे सहज शक्य झाले. शिवाय हिंदू हे शासित आहेत व मुसलमान शासक आहेत, ही भावना स्पष्ट झाली. म्हणजेच हैदराबाद संस्थानातील मुसलमानांचा राजसत्तेस बिनशर्त पाठिंबा मिळण्याची सोय झाली.

दुसरे असे की लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची प्रथा महाराष्ट्रात सुरू केलेली होती. त्याचे लोणही हैदराबादेत येऊ लागले होते. लोकमान्यांच्या गणेशोत्सव प्रथेत सामाजिक संघटन करून इंग्रजांच्या सत्तेस आव्हान देण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे हे ध्येय होते. म्हणजेच राजकीय बीजारोपणाचे गणेशोत्सव हे माध्यम होते. तो प्रवाह हैदराबाद राज्यात आला तर स्वतःच्या सत्तेला धोका आहे असे निजामास वाटले असावे म्हणूनच त्याने धार्मिक उत्सवावर विविध निर्बंध लादले. तसेच हैदराबाद संस्थानात आर्यसमाजाने आपले पाय रोवले होते. मराठवाड्यातील धारूर या ठिकाणी इ. स. १८९१ मध्ये आर्यसमाजाची पहिली शाखा स्थापन झाली होती. आर्यसमाजाने हिंदूमधील मानसिक दौर्बल्य नष्ट करून हिंदू समाज अधिक संघटित करण्याकडे लक्ष दिले. आर्यसमाजाच्या कार्यामुळे हिंदू समाज डोईजड होऊन स्वतःच्या सत्तेस आव्हान देईल ही भीती देखील निजामास वाटली असावी म्हणून त्याने धार्मिक निर्बंध लादले असावेत.

तिसरे असे की धार्मिक प्रश्नावर भिन्न धर्मीय प्रजाजनांमध्ये कलह उद्‌भवू नये यासाठी दक्षतेचा उपाय म्हणूनही हे निर्बंध लादले असावेत. पण याहीपेक्षा अधिक महत्त्वाची कारणे म्हणजे स्वतःच्या सत्तेचे संवर्धन व निजामाचा धार्मिक दृष्टिकोण ही होत. निजामाच्या धार्मिक विचारांची दिशा त्यांच्या खालील कवितेतून दृग्गोचर होते·

" सलातीने सल्फ सब हो गए नजरे अजल उस्माँ।
मुसलमानोंका तेरी सल्तनत से है· निशां बाकी ।। " [६]

पूर्वजांची सर्व साम्राज्ये काळाच्या ओघात नष्ट झाली पण तुझ्या (निजामाच्या) राज्यामुळेच आज मुसलमानांचे अस्तित्व शिल्लक आहे. या ओळीतून निजामाच्या मनात मुसलमानांबद्दल असलेला दुरभिमान स्पष्ट होतो. याहीपेक्षा निजामाचे धर्मवेड त्याच्या खालील काव्यपंक्तींतून अधिक स्पष्ट होते.

" बंद नाकूस हुआ सुन के नारए तकबीर।
जलजला आ ही गया रिश्तए जुन्नार पे भी ।। ।। " [७]

' अल्ला हो अकबर ' या आवाजामुळे शंखाचा आवाज बंद पडला आहे. जानवे धारण करणाऱ्या हिंदू समाजाचे स्थान या भूकंपामुळे डळमळीत झाले आहे. एकूण स्वसत्तेचा मोह व धर्मवेड यामुळेच निजामाने हिंदूंवर निर्बंध लादले हे स्पष्ट आहे.

परिणाम

निजाम सरकारने जाहीर केलेल्या विविध निर्बंधांकडे दृष्टिक्षेप टाकल्यास हे स्पष्ट दिसेल की, सरकारने धर्माच्या बाबतीत भेदभावाचा पुरस्कार केलेला होता. सहाव्या निजामाच्या कारकीर्दीत प्रचिलित असलेल्या नियमापेक्षाही अधिक कडक नियम जाहीर करून आपल्या संस्थानाचे इस्लामीकरण करण्याचा हा डाव होता. मोहरम व व दसरा हे सण एकाच वेळी आल्यानंतर दसरा सण साजरा करताना हिंदूंनी त्यांचे धार्मिक विधी व पूजाअर्चा स्थगित ठेवावी ही अपेक्षा होती. याचाच अर्थ हा की हिंदूंच्या धर्मभावना मुस्लिम बांधवांच्या धर्मभावनेपेक्षा कनिष्ठ आहेत असे लेखले गेले होते. सार्वजनिक मिरवणुकीवर निर्बंध लादून हिंदूंना त्यांच्या मूलभूत हक्कापासून वंचित ठेवण्यात आले होते. याशिवाय शासकीय अधिकाऱ्यांना एका जमातीपेक्षा दुसऱ्या जमातीस अधिक प्राधान्य देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले होते. त्यामुळे हिंदूंचे कोणतेही धार्मिक उत्सव अथवा कार्यक्रम कोणतेतरी निमित्त करून बंद पाडण्याचा हक्क अधिकाऱ्यांना प्राप्त झाला होता. तसेच हैदराबाद राज्य हे ' इस्लामी राज्य ' आहे ही घोषणाही विसाव्या शतकात कालबाह्य होती. कोणतेही शासन निःपक्षपाती व धर्मनिरपेक्ष असावयास हवे कारण उदार धोरणाचा पुरस्कार केल्याशिवाय सर्व समाजघटकांना समान संधी प्रदान केली जाऊ शकत नाही.

एखाद्या समाजास खास प्राधान्य देणे म्हणजे जातीयवादास खतपाणी घालण्यासारखे असून त्यामुळे शासनाच्या अपकीर्तीत भर पडते. निजाम सरकारने स्वतःच जाहीर केलेले समता व प्रेम हे धोरण पायदळी तुडविले होते. मिरवणूक काढण्यासाठी तहसिलदाराची पूर्वपरवानगी घ्यावी लागत असल्यामुळे जनतेस तालुक्याकडे धाव घ्यावी लागू लागली. म्हणजेच धर्मस्वातंत्र्य या मूलभूत हक्काची पायमल्ली करण्यात आली. त्यामुळे कित्येक धार्मिक मिरवणुकी व समारंभ परवानगी अभावी स्थगित करावे लागले. म्हणून जनतेत नैराश्य पसरले. मानवी मूल्यांवर आधारलेला धर्मनिरपेक्ष समाज निर्माण करण्याचा प्रयत्न शासनाने करावयास हवा; पण दुर्दैवाने निजाम सरकारने 'उपासनास्वातंत्र्य' या अधिकारापासून हिंदूंना वंचित ठेवले. म्हणून या दडपशाही विरुद्ध हिंदूंनी उठाव सुरू केला आणि जातीय दंग्यांत त्याची परिणती होऊ लागली.

निजामाचे धार्मिक धोरण व मराठवाडा

मराठवाड्यात या धोरणाचा काय परिणाम झाला याचा अभ्यास करणे उद्बोधक ठरेल. इ. स. १९११ मध्ये मराठवाड्याची लोकसंख्या ३६, १२, ५१८ होती त्यात ८२·७० टक्के हिंदू होते आणि १०·१० टक्के मुसलमान होते. इ. स. १९४१ मध्ये मराठवाड्याची लोकसंख्या ४२, ४९, २७२ झाली. त्यात हिंदूंची टक्केवारी ८०·३० होती तर मुसलमानांचे प्रमाण १० टक्के होते. थोडक्यात हैदराबाद संस्थानाप्रमाणे मराठवाड्यातही एकूण लोकसंख्येपैकी हिंदू ८० टक्के व मुसलमान फक्त १० टक्के होते. मुस्लिम समाजाला आपण सत्तेचे वाटेकरी आहोत असे वाटत असे. मुस्लिम असणे हेच विशेषाधिकाराचे प्रतीक होते. मुस्लिमेतर म्हणजे कुणीतरी पददलित – मुस्लिम हा धनी तर हिन्दू हा गुलाम ही भावना हळूहळू वाढू लागली.[८]

जातीय दंगली

इ. स. १८९६-९७ च्या पुढे मराठवाड्यात सार्वजनिक गणेशोत्सव प्रथा सुरू झाली. अशा उत्सवांना मुसलमानांकडून अडथळे सुरू झाले. त्यामुळे हिंदूच्या मनात असंतोष धुमसत राहिला. त्याचे पर्यवसान हिंदु-मुस्लिम दंगलीत झाले. यामुळे सामाजिक तणाव वाढला. याची काही उदाहरणे खालील होत.

(१) २ ऑक्टोबर १९२८ नांदेड येथील अनंत चतुर्दशीनिमित्त निघालेल्या मिरवणुकीवर झालेल्या आक्रमणामुळे दंगा झाला.[९]

(२) १६ ऑक्टोबर १९२८ रोजी अष्टी (जि. बीड) येथील गणपतीची मूर्ती भंग केल्यामुळे दंगा झाला.[१०]

(३) २० मे १९२९ रोजी नांदेड येथील काही मुसलमान बकरी-इदचा नमाज

पढून परत येत होते. ते घोड्यावर व उंटावर आरूढ झालेले होते. गुरुद्वारासमोरून जाताना शिखांनी त्यांना खाली उतरण्याची विनंती केली, पण त्यांनी नकार दिला त्यामुळे उभयतांत दंगल झाली. [11]

(४) पैठण येथील उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. पैठणच्या हिंदूंनी गणपती उत्सवाची व गणपतीच्या मिरवणुकीची रीतसर परवानगी १३ ऑगस्ट १९२९ ला मागितली. पैठणच्या मामलेदारांनी २६ ऑगस्ट १९२९ च्या पत्रान्वये मिरवणुकीची परवानगी दिली, पण तेथील स्थानिक मुस्लिम अधिकाऱ्यांनी गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीस अडथाळा आणला. "मिरवणुकीच्या रस्त्यावर दोन मशिदी आहेत म्हणून ४० यार्ड अलीकडे व ४० यार्ड पलीकडे वाद्यं बंद ठेवावीत." असा हुकूम चालकांना देण्यात आला.

येथे हे नमूद केले पाहिजे की, यापूर्वीही पैठण येथील धार्मिक मिरवणुकीत मशिदीवरून वाद्य वाजवीत जाण्यासंबंधी हिंदु-मुस्लिमात तंटा झाला होता. त्या वेळी सरकारने स्वखर्चाने हिंदूंच्या मिरवणुकीसाठी मशिदी नसलेला रस्ता तयार करून दिला व नव्या रस्त्यावर मशिदी बांधू नयेत असा आदेश काढला होता. पैठणच्या धर्मवेड्या मुसलमानांनी पुढे त्या नवीन रस्त्यावर मशिदी बांधल्या. हिंदूंनी दुर्लक्ष केले. तसेच मुसलमानांनीही वाद्य वाजविण्यात अडथळे आणले नाहीत. म्हणून पुढील काही मिरवणुकी शांततेने पार पडल्या. पैठणच्या मुसलमानांनी त्याच रस्त्यावर मशिदी बांधताना निजाम सरकारने त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही का केली नाही ? सरकारने निःपक्षपातीपणाचे धोरण सचोटीने राबविले नाही हे स्पष्ट आहे. इ. स. १९३१ पासून पैठण येथील मिरवणूक बंद पडली. याचा अर्थ हा की निजाम सरकारने मुसलमानांची बाजू उचलून धरली. न्याय-अन्यायाचा फारसा विचार केला नाही. [12]

इ. स. १९३१ मध्ये परभणी येथे तर १९३२ मध्ये पूर्णा (जि. परभणी) या ठिकाणी गणपतीच्या मिरवणुकीस अडथाळे करण्यात आल्यामुळे जातीय दंगली झाल्या. [13]

इ. स. १९३६ ते ३७ या काळात नांदेड येथे हिंदू आणि मुस्लिम यांच्यात जातीय दंगल सुरू झाली, कारण शिखांच्या मालकीच्या एका टेकडीवर मुसलमानांनी एक प्रेत पुरले. ती टेकडी ताब्यात घेण्यासाठी शिखांनी अभूतपूर्व आंदोलन केले. नांदेड हे गुरु गोविंदसिंगाच्या समाधीचे स्थान असल्यामुळे पंजाबमधील अनेक शिख टेकडीच्या संरक्षणासाठी नांदेडला आले. शेवटी निजाम सरकारने हे प्रकरण एका युरोपियन न्यायाधीशाकडे चौकशीसाठी सोपविले. त्याने शिखांच्या बाजूने निकाल दिला. त्यामुळे मुसलमानांना टेकडीवरून प्रेत हलवावे लागले. या प्रकरणामुळे हिंदु-मुस्लिम संबंध बिघडले. [14]

याशिवाय काही मुस्लिमांनी हिंदू मंदिराची मोडतोड केली व तेथील देवतांचीही नासधूस केली, पण निजाम सरकारने गुन्हेगारांचा शोध लावून त्यांना कडक शिक्षा करण्याचा प्रभावी प्रयत्न केला नाही. या संदर्भात बीड, औंढा, उद्‌गीर, आष्टी, देवनी व गंगाखेड ही ठिकाणे उदाहरणे म्हणून देता येतील.

धर्मान्तर

इ. स. १९२६ मध्ये 'इतेहादूल मुसलमीन' या संघटनेची स्थापना महम्मद नवाजखान याने केली. निजामी सत्तेस पाठिंबा देणे, सर्व मुस्लिमांचे ऐक्य करणे आणि धर्मांतर, ही या संघटनेची उद्दिष्टे होती. या संघटनेस निजामाचा वरदहस्त होता.[१५] लवकरच बहादूर यारजंग हा या संघटनेचा नेता झाला. त्याने धर्मांतराची मोहीम हाती घेतली.

मराठवाड्यात फार मोठ्या प्रमाणात धर्मांतर झाले नाही. धर्मांतराची किरकोळ उदाहरणे खालील होत. बहादूर यारजंग यांनी बीड जिल्ह्यातील धोंडराई व गेवराई या खेड्यास भेटी देऊन पाचशे हरिजनांना बळजबरीने इस्लाम धर्माची दीक्षा दिली. तसेच पैठण येथील काही हरिजनांना इस्लाम करण्यात आले.[१६]

उद्‌गीर तालुक्यातील (जि. उस्मानाबाद) राजाबाई या स्त्रीस बळजबरीने मुसलमान करण्यात आले. अल्पावधीतच आर्यसमाजातील लोकांनी तिला शुद्ध करून हिंदू धर्मात घेतले.[१७]

औरंगाबाद जिल्ह्यातील जालना तालुक्याच्या हिवरा या खेड्यातील मधू कुटे यास देखील मुसलमान केले.[१८]

बीड जिल्ह्यातील गोविंद आणि त्याची आई यांना सक्तीने इस्लाम धर्माची दीक्षा दिली. याच जिल्ह्यातील इंदिराबाई नावाच्या स्त्रीस मुसाबेग या पोलिसाने पळवून नेऊन तिला इस्लाम धर्म स्वीकारण्यास भाग पाडले. तसेच दुध्या, बापू व मशा यांना मुसलमान करून अब्दुल रहीम, बहादूरखा व अब्दुलसलीम ही नावे देण्यात आली.[१९]

कनिष्ठ जातीतील (अस्पृश्य समाजात) लोकांनाच इस्लाम धर्माकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न मुसलमानांनी केला. तरीही या इस्लामीकरणाच्या चळवळीस मराठवाड्यात फारसे यश मिळाले नाही.

परिणाम

निजामाच्या धार्मिक धोरणामुळे मराठवाड्यातील सामाजिक जीवनात ढवळा-ढवळ सुरू झाली हे सत्य असले तरीही मराठवाड्यातील सर्वच समाज द्वेषाने भारावून गेला असे म्हणणे चुकीचे आहे. ज्या ठिकाणी जातीय दंगली उद्‌भवल्या तेथे सामाजिक तणाव निर्माण झाला; पण जेथे स्थानिक अधिकारी निःस्पृह, शांतताप्रिय व कर्तव्यदक्ष

पढून परत येत होते. ते घोड्यावर व उंटावर आरूढ झालेले होते. गुरुद्वारासमोरून जाताना शिखांनी त्यांना खाली उतरण्याची विनंती केली, पण त्यांनी नकार दिला त्यामुळे उभयतांत दंगल झाली. [११]

(४) पैठण येथील उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. पैठणच्या हिंदूंनी गणपती उत्सवाची व गणपतीच्या मिरवणुकीची रीतसर परवानगी १३ ऑगस्ट १९२९ ला मागितली. पैठणच्या मामलेदारांनी २६ ऑगस्ट १९२९ च्या पत्रान्वये मिरवणुकीची परवानगी दिली, पण तेथील स्थानिक मुस्लिम अधिकाऱ्यांनी गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीस अडथाळा आणला. "मिरवणुकीच्या रस्त्यावर दोन मशिदी आहेत म्हणून ४० यार्ड अलीकडे व ४० यार्ड पलीकडे वाद्यं बंद ठेवावीत." असा हुकूम चालकांना देण्यात आला.

येथे हे नमूद केले पाहिजे की, यापूर्वीही पैठण येथील धार्मिक मिरवणुकीत मशिदीवरून वाद्य वाजवीत जाण्यासंबंधी हिंदु-मुस्लिमात तंटा झाला होता. त्या वेळी सरकारने स्वखर्चाने हिंदूंच्या मिरवणुकीसाठी मशिदी नसलेला रस्ता तयार करून दिला व नव्या रस्त्यावर मशिदी बांधू नयेत असा आदेश काढला होता. पैठणच्या धर्मवेड्या मुसलमानांनी पुढे त्या नवीन रस्त्यावर मशिदी बांधल्या. हिंदूंनी दुर्लक्ष केले. तसेच मुसलमानांनीही वाद्य वाजविण्यात अडथळे आणले नाहीत. म्हणून पुढील काही मिरवणुकी शांततेने पार पडल्या. पैठणच्या मुसलमानांनी त्याच रस्त्यावर मशिदी बांधताना निजाम सरकारने त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही का केली नाही? सरकारने निःपक्षपातीपणाचे धोरण सचोटीने राबविले नाही हे स्पष्ट आहे. इ. स. १९३१ पासून पैठण येथील मिरवणूक बंद पडली. याचा अर्थ हा की निजाम सरकारने मुसलमानांची बाजू उचलून धरली. न्याय-अन्यायाचा फारसा विचार केला नाही. [१२]

इ. स. १९३१ मध्ये परभणी येथे तर १९३२ मध्ये पूर्णा (जि. परभणी) या ठिकाणी गणपतीच्या मिरवणुकीस अडथाळे करण्यात आल्यामुळे जातीय दंगली झाल्या. [१३]

इ. स. १९३६ ते ३७ या काळात नांदेड येथे हिंदू आणि मुस्लिम यांच्यात जातीय दंगल सुरू झाली, कारण शिखांच्या मालकीच्या एका टेकडीवर मुसलमानांनी एक प्रेत पुरले. ती टेकडी ताब्यात घेण्यासाठी शिखांनी अभूतपूर्व आंदोलन केले. नांदेड हे गुरु गोविंदसिंगाच्या समाधीचे स्थान असल्यामुळे पंजाबमधील अनेक शिख टेकडीच्या संरक्षणासाठी नांदेडला आले. शेवटी निजाम सरकारने हे प्रकरण एका युरोपियन न्यायाधीशाकडे चौकशीसाठी सोपविले. त्याने शिखांच्या बाजूने निकाल दिला. त्यामुळे मुसलमानांना टेकडीवरून प्रेत हलवावे लागले. या प्रकरणामुळे हिंदु-मुस्लिम संबंध बिघडले. [१४]

याशिवाय काही मुस्लिमांनी हिंदू मंदिराची मोडतोड केली व तेथील देवतांचीही नासधूस केली, पण निजाम सरकारने गुन्हेगारांचा शोध लावून त्यांना कडक शिक्षा करण्याचा प्रभावी प्रयत्न केला नाही. या संदर्भात बीड, औंढा, उद्गीर, आष्टी, देवनी व गंगाखेड ही ठिकाणे उदाहरणे म्हणून देता येतील.

धर्मान्तर

इ. स. १९२६ मध्ये 'इतेहादूल मुसलमीन' या संघटनेची स्थापना महम्मद नवाजखान याने केली. निजामी सत्तेस पाठिंबा देणे, सर्व मुस्लिमांचे ऐक्य करणे आणि धर्मांतर, ही या संघटनेची उद्दिष्टे होती. या संघटनेस निजामाचा वरदहस्त होता. [१५] लवकरच बहादूर यारजंग हा या संघटनेचा नेता झाला. त्याने धर्मांतराची मोहीम हाती घेतली.

मराठवाड्यात फार मोठ्या प्रमाणात धर्मांतर झाले नाही. धर्मांतराची किरकोळ उदाहरणे खालील होत. बहादूर यारजंग यांनी बीड जिल्ह्यातील धोंडराई व गेवराई या खेड्यास भेटी देऊन पाचशे हरिजनांना बळजबरीने इस्लाम धर्माची दीक्षा दिली. तसेच पैठण येथील काही हरिजनांना इस्लाम करण्यात आले. [१६]

उद्गीर तालुक्यातील (जि. उस्मानाबाद) राजाबाई या स्त्रीस बळजबरीने मुसलमान करण्यात आले. अल्पावधीतच आर्यसमाजातील लोकांनी तिला शुद्ध करून हिंदू धर्मात घेतले. [१७]

औरंगाबाद जिल्ह्यातील जालना तालुक्याच्या हिवरा या खेड्यातील मधू कुटे यास देखील मुसलमान केले. [१८]

बीड जिल्ह्यातील गोविंद आणि त्याची आई यांना सक्तीने इस्लाम धर्माची दीक्षा दिली. याच जिल्ह्यातील इंदिराबाई नावाच्या स्त्रीस मुसाबेग या पोलिसाने पळवून नेऊन तिला इस्लाम धर्म स्वीकारण्यास भाग पाडले. तसेच दुध्या, बापू व मशा यांना मुसलमान करून अब्दुल रहीम, बहादूरखा व अब्दुलसलीम ही नावे देण्यात आली. [१९]

कनिष्ठ जातीतील (अस्पृश्य समाजात) लोकांनाच इस्लाम धर्माकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न मुसलमानांनी केला. तरीही या इस्लामीकरणाच्या चळवळीस मराठवाड्यात फारसे यश मिळाले नाही.

परिणाम

निजामाच्या धार्मिक धोरणामुळे मराठवाड्यातील सामाजिक जीवनात ढवळा-ढवळ सुरू झाली हे सत्य असले तरीही मराठवाड्यातील सर्वच समाज द्वेषाने भारावून गेला असे म्हणणे चुकीचे आहे. ज्या ठिकाणी जातीय दंगली उद्भवल्या तेथे सामाजिक तणाव निर्माण झाला; पण जेथे स्थानिक अधिकारी निःस्पृह, शांतताप्रिय व कर्तव्यदक्ष

होते तेथे त्यांनी सामाजिक ऐक्य जोपासले. धर्मवेड्या मुसलमानांना समज दिला व हिंदूंच्या धार्मिक जीवनात ढवळाढवळ होऊ दिली नाही. हिंदुमुस्लिमांनी परस्परांना समजावून घेतले. हिंदूंच्या परंपरागत मिरवणुकीत अडथळे न आणता सहकार्य केले व परस्परांविषयी प्रेम, सद्भाव व स्नेह टिकविण्याचा प्रयत्न केला. उभयतांच्या सणानंतर परस्परांच्या भेटी घेऊन शुभेच्छा व्यक्त करण्याची पद्धत चालू ठेवली याचे श्रेय सुजाण मुस्लिम अधिकाऱ्यांकडे आहे. तरीपण मराठवाड्यातील काही ठिकाणी जातीय दंगली व धर्मान्तराचे प्रयत्न सुरू झाल्यामुळे जातीय वैमनस्याची बीजे पेरली जाऊ लागली. याशिवाय समाजात भीती, संशय व अविश्वास, या भावनांचे अंकुर वाढू लागले.

थोडक्यात मराठवाड्यातील समाजात शांततेऐवजी अशांतता, प्रेमाऐवजी द्वेष व सहकार्याऐवजी सूड या भावना रुजू लागल्या. जातीय वैमनस्यातून काही ठिकाणी जाळपोळीचे व अत्याचाराचे प्रकार उद्भवले. म्हणून सामाजिक व आर्थिक हानी झाली. जातीय दंग्यामुळे, मराठवाड्यातील जुनी परंपरा, धर्मभावना व समाजव्यवस्था यांस धक्का पोहोचला. तसेच सर्वत्र बजबजपुरी, भीती व असंतोष पसरला.

इ. स. १९३७ मध्ये सर अकबर हैदरी हे हैदराबाद संस्थानचे पंतप्रधान झाले. त्यांनी हिंदूंवरील निर्बंध रद्द केले जातील असे आश्वासन दिले, पण दुर्दैवाने त्यांना ते पाळता आले नाही. इ. स. १९३८ मध्ये आर्यसमाज व हिंदू महासभा यांनी निजाम सरकारच्या जाचक धार्मिक धोरणाविरुद्ध सत्याग्रह सुरू केला. आर्य समाजाचा हा लढा प्रामुख्याने धार्मिक स्वातंत्र्यासाठीच होता. हे आंदोलन ऑगस्ट १९३९ पर्यंत चालले.

इ. स. १९४६ मध्ये 'इत्तेहादूल मुसलमीन' या संघटनेचा कासिम रझवी हा अध्यक्ष झाला. या संघटनेचे एक स्वयंसेवक दल होते. त्यास सुरुवातीस खाकसर म्हणत असत. पुढे या दलास रझाकार संघटना म्हटले जाऊ लागले. कासिम रझवी अध्यक्ष झाल्यानंतर रझाकारांचे अत्याचार वाढू लागले. त्यामुळे जातीय वैमनस्यात भर पडू लागली. रझाकारांनी राज्यभर हैदोस घालण्यास सुरुवात केली, त्यामुळे परिस्थिती फारच असह्य झाली, म्हणून एरवी अत्यंत शांत व सोशिक असलेला हिंदू समाज जागृत झाला.

निष्कर्ष

सातव्या निजामाने इस्लाम धर्मास प्राधान्य देऊन हिंदूंवर अनेक निर्बंध लादल्यामुळे संस्थानात दंगेधोपे सुरू झाले. तेथील हिंदू समाज संतप्त झाला व स्वतःच्या धार्मिक हक्कासाठी लढण्यास सुसज्ज झाला. त्यातच आर्यसमाजाची साथ मिळाली. त्यामुळे जहाल व मवाळ कार्यकर्ते एकत्र आले. त्यांनी निजाम व त्याचे इस्लामी

धोरण याविरुद्ध आंदोलन सुरू केले. या आंदोलनात हैदराबाद स्टेट काँग्रेसचे आंदोलन केवळ राजकीय स्वरूपाचे होते. स्टेट काँग्रेसच्या नेत्यांनी त्यास धार्मिक कलंक लागू दिला नाही. हैदराबाद संस्थानात रझाकारांविरुद्ध हिंदू समाज यांच्या चकमकी होत राहिल्या. त्यात प्रचंड मानहानी व वित्तहानी झाली.

निजामाने, स्वतंत्र व इस्लामी राष्ट्राच्या कल्पनेमुळे भारतीय संघराज्यापासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न केला पण तो फसला. कासिम रझवी व इत्तेहादूल मुसलमीन या संघटनेच्या जोरावर आपले स्वतंत्र अस्तित्व टिकेल असे निजामाला वाटले होते पण ते साकार झाले नाही. ' जैसे थे ' करारानंतर अत्याचाराचे प्रमाण वाढले व हैदराबाद संस्थानात सर्वत्र अराजक व अशांतता पसरली. त्यामुळे शेवटी भारत सरकारने १३ सप्टें. १९४८ ला पोलिस ॲक्शन सुरू केले व १६ सप्टें. १९४८ पर्यंत पूर्ण केले. १७ सप्टें. १९४८ ला निजामाने शरणागती पत्करली.

याप्रमाणे धर्म व राजकारण यांची युती निजामास फार महाग पडली. जर निजामाने धर्मनिरपेक्ष धोरणांचा पुरस्कार केला असता तर कदाचित हैदराबादचे स्वतंत्र अस्तित्व टिकले असते. शिवाय पोलिस ॲक्शननंतर झालेला अनर्थ टाळता आला असता. तसेच मुस्लिमांचे दारिद्र्य कमी झाले असते व निराश्रितपणाही टाळला गेला असता. याशिवाय हिंदू व मुस्लिम यांच्यात समन्वय व प्रेमाची भावना वृद्धिंगत झाली असती.

संदर्भग्रंथ व नियतकालिके

1. Translation of Review on the addresses presented to H. H. Asifjah Nawab Mir Sir Mahbub Alikhan Babadur By Syed Murtaza, Kadiri, page 4
2. Hyderabad Affairs, Vol. III, p. 449 Moulvi Syeed Mahadi Ali.
3. Prominent Houses of Worship, Shrines and Religious Buildings in Hyderabad. By Information Bureau, p. 8
4. The End of an Era-Hyderabad Memories–K.M. Munshi, p.17
5. A pamphlet–" Religious Disabilities of Hindus of Hyderabad State " By. Pathak L. B., p. 9–13.
६. हैदराबाद का मुक्तिसंग्राम–कुछ अज्ञात पृष्ठ. आचार्य खंडेराव कुलकर्णी, पृ.५
7. Sardar Patel's Correspondence 1945–50, Vol. VII, Durgadas, page 248.

८. हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी : स्वामी रामानंदतीर्थ-अनुवादक वि. पा. देऊळगांवकर, पृ. ६४.
९. निजाम विजय साप्ताहिक हैदराबाद— १ आक्टो. १९२८, पृ. ३
१०. निजाम विजय साप्ताहिक हैदराबाद ,, ,, ,, , पृ. २
११. निजाम विजय साप्ताहिक हैदराबाद—२८ मे १९२९
१२. महाराष्ट्र-सुदर्शन—३ मे १९३०
१३. निजाम विजय साप्ताहिक हैदराबाद—२९ सप्टें. १९३१
१४. जीवन सेतु, सेतुमाधवराव पगडी, पृ. २६२.
15. The End of an Era.—K. M. Munshi, p. 19
१६. काळ साप्ताहिक, पुणे १९ मे १९७५.
१७. स्वराज्य—१६ जुलै १९३७.
१८. मराठवाडा—१९३८
१९. मराठवाडा—१९३८

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.

मंडळाची निवडक प्रकाशने

ग्रंथ	किंमत रु.
१. राजवाडे मराठी धातुकोश—वि. का. राजवाडे	३०
२. राजवाडे नामादि शब्दव्युत्पत्ती कोश—वि. का. राजवाडे	३०
३. समर्थ शिवाजी अन्योन्य संबंध—भा. वा. भट	५
४. राजस्थान-महाराष्ट्र संघर्ष—शं. पु. जोशी	१२
५. राजवाडे चरित्र—भा. वा. भट	५०
६. संस्कृत भाषेचा उलगडा—वि. का. राजवाडे	१०
७. जानकी सैंवर—सं. द. रा. भट	५
८. ज्ञानेश्वरी पदकोश—शि. न. भावे	१००
9. A descriptive catalogue of the Sculptures and Paintings in the Rajwade Mandal—	50
१०. आज्ञापत्र–(मूळ प्रत-ऑफसेट छपाई)	१५
११. अनुभवामृत– (मूळ प्रत–ऑफसेट छपाई)	२०
१२. योगचिंतामणी (मूळ प्रत–ऑफसेट छपाई)—सं. श्री. भा. भट	४१
१३. **संशोधक** (सुवर्णमहोत्सवी अंक)	४०
१४. १०९ कलमी बखर—सं. डॉ. प्र. न. देशपांडे	१०
१५. वेडिया नागेशकृत भावार्थग्रंथ— सं. डॉ. मु. ब. शहा	१०

…पमावर …त्याया …कारवर …तावर नाहि	धाळमेळ आलेप्रमाणे नवागल्या मुळे २ सीवाजीमाहाराज व संभाजी व राजाराम १ जीराजीरावजी १ बाळाजीसोनदेव २ २/२	२ शाहुमा… १ हेनाजी… १ कासी… २ १ रामराजे… ३
…र्णमुप्रामुख्खी …पमावरसंमत पंडितरावबवार बरवाडपमायर नाहि	धाळमेळ आलेप्रमाणे न गल्या मुळे १ सीवाजीमाहाराजकारकीर्द १ रघुनाथरावउपाधे १ संभाजीमाहाराजकारकीर्दकवी कलूकबजी २ २ राजारामकारकीर्द १ केशवपंडीत पुरोहीत १ श्रीकराचार्य कालगावकर २ १ शाहुमाहाराजकारकीर्द १ रघुनाथरावउपाधेआईसाहेबानी धाळमेळकेली १ आईसाहेबकारकीर्द हैबतराव धोंडदेव ४ २/६	पं… १ शाहुमा… गळमय… १ आईसाहे… १ धोंड… २
०	धाळमेळ आलेप्रमाणेनवागल्या मुळे ५ सिवाजीमाहाराजकारकीर्द १ तुकोजीचोर १ मानकोजी दाहातोंडे १ नेतोजीपालकर १ प्रतापरावगुजर १ हसाजी मोहीते हंबीरराव संभाजी माहाराज पर्यंत ५ २ राजारामकारकीर्द माहादजी पानसबाळ १ संताजी घोरपडे २ शाहुमाहाराजकारकीर्द १ जैसींगजाधवराव १ मानसींगरावकर २ ४ २/९	१ राजाराम… ५ शाहुमाह… १ चंद्रसे… १ संता… १ खंडे… १ यश… १ श्रीब… का…
राजपमावरसी काकोनाडयात होतो हातरोखा वराजकारण आरबेरीज	धाळमेळ आलेप्रमाणे नवागल्या मुळे २ राजारामकारकीर्द १ प्रल्हादनीराजी १ तीमाजीरघुनाथ हणमंते २ ३ शाहुमाहाराजकारकीर्द १ परशरामश्रीवकडील आईसाहेबी दिल्हे होते १ गदाधरप्रल्हाद १ जगजीवनपरशराम बंधु श्रीपतराव याचे ५ ५ रामराजेकारकीर्द १ श्रीनीवासगंगाधर १ पुन्हा जगजीवन परशराम १ पुन्हा श्रीनीवासगंगाधर १ नारोशंकर १ भागवंतरावश्रीवच ५ २/१०	२ शा… १ पुन… १ श्री… ० ८… २
	धाळमेळ आलेप्रमाणे नवागल्यामुळे	

परंपराचाळे ...राज ...आनंत ...ानंत ...ंडेरावकासी १ धाकटेशाहुमाहाराज आपाजीखंडेराव	न्यायाधीशान्चे बंधुरामराव	
...परा चालते ...राजकारकीर्दमुद ...उपाधे ...वरामराजेक.रकीर्द ...मठ.उपाधे 2 धाकटेशाहुमाहाराज १ रामचंद्रराव १ रघुनाथराव — 2 ५४	रघुनाथपंडीत राव	७
परंपराचालते ...कारकीर्दधनाजीजाधवराव ...राजकारकीर्द ...जाधवराव ...जीजाधवराव ...रावदाभाडे ...तरावदाभाडे ...रावदाभाडेरामराजे ...कीर्दपर्यंत १ धाकटेशाहुमाहाराज कारकीर्दयशवंतराव त्रिंबकराभाडे दत्तक ५७	येशवंतरावदा भाडे सेनापती	८
परंपराचालते ...महाराजकारकीर्द ...परशरामत्रींबक ...पतराव ...ज १ रामराजेकारकीर्द १ पुन्हा श्रीनीवासगंगाधर भवानरावयासपजाले १ धाकटेशाहुमाहाराजपरशा — 2 रामश्रीनीवास. ५८	परशराम श्रीनी वासप्रतीनीधी	१
परंपराचालते	हैबतरावदवानी	2

६

मराठेशाहीतील प्रधानांच्या परंपरा, त्यांचे मानपान आणि अधिकार

(एक महत्त्वपूर्ण हस्तलिखित)

सौ. विजया देशपांडे, कु. सुनंदा अहिरे

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाच्या संग्रही असलेल्या कागदपत्रांमध्ये एक नमुनेदार तक्ता आहे. साताऱ्याचे छत्रपती प्रतापसिंह यांच्या कागदपत्रांचे एक दप्तर मंडळाचे संग्रही आहे. त्या दप्तरात प्रस्तुत तक्ता उपलब्ध झाला. हा तक्ता अद्यापपावेतो अप्रकाशित असून तो या लेखाबरोबर प्रकाशित करण्याचे योजले आहे. हा तक्ता ७८×८० सें. मी. आकाराचा असून त्यामध्ये एकूण १९ उभे व ११ आडवे कॉलम आहे. तक्त्यासाठी चिवट व हॅण्डमेड कागद वापरलेला असून रंगाने किंचित पिवळसर आहेत. तक्त्यामधील मजकूर काळ्या शाईमध्ये मोडी लिपीत लिहिलेला असून सुवाच्य आहे. कॉलमची लांबीरुंदी मजकुराप्रमाणे घेतलेली आहे. उदा. पहिला कॉलम २½ सें. मी. आहे, तर चौथा कॉलम १२½ सें. मी. आहे. आठवा कॉलम १½ सें. मी. असून सतरावा १६½ सें. मी. आहे. रुंदीमध्ये आडवे कॉलम सुमारे ८ सें. मी लांबीचे असून ते १० आहेत. शिवाय मथळ्याचा पहिला कॉलम २½ सें. मी. आहे. तक्त्याच्या दोन्ही बाजूला सुमारे १ सें. मी. समास सोडलेला आहे. त्याचप्रमाणे शिरोभागी सुमारे १½ सें. मी. समास सोडलेला आहे.

१९ कॉलम पुढीलप्रमाणे—

(१) ... (अनुक्रम नंबर)
(२) अष्टप्रधान नामे
(३) उपनामे
(४) हुदादरख

(५) वस्त्रे पदाचे समई
(६) सीकेकटार
(७) शस्त्रे
(८) जरीपट्या
(९) चौघडा
(१०) हाती
(११) घोडे
(१२) चवरी
(१३) जवाहीर
(१४) कलमदाने
(१५) राजपत्रावर निशाण
(१६, १७) पदे प्राप्त जाली त्यास कारकिर्द व पदाधिकारी याची नावे पदाची वस्त्रें कारकिर्दीस जाली.
(१८) हाली आहे त्याची नावे प्रताप शाहू माहाराज छत्रपती स्वामी कारकिर्द.
(१९) ......अनुक्रम

मथळ्याचा कॉलम वगळता आडवे कॉलम १० असून १ ते ८ कॉलममध्ये प्रधान, अमात्य, सचिव, मंत्री, सुमंत, न्यायाधीश, पंडितराव आणि सेनापती ही पदे लिहिलेली आहेत. शिवाय ' खेरीज ' हा शब्द लिहून त्यापुढे एक आणि दोन असे अनुक्रम देऊन प्रतिनिधी आणि राजआज्ञा अशी दोन पदे लिहिलेली आहेत.

तक्त्याची वैशिष्ट्ये

प्रस्तुत तक्त्यामध्ये आठ प्रधानांचे आणि प्रतिनिधी व राजआज्ञा या दोन जादा प्रधानांचे अधिकार शस्त्रे, वस्त्रे, अलंकार, सरंजाम, हत्यारे याविषयी तपशील दिलेला आहे. अशा प्रकारचा तपशील देणारा हा कागद अपूर्व असून ऐतिहासिक साधनांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण ठरेल. या तक्त्याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक प्रधानाच्या कार्याचा तपशील सविस्तरपणे दिलेला आहे. परंतु त्याचबरोबर कोणत्याही प्रधानाने राजाच्या आज्ञेचे उल्लंघन केल्यास तो शिक्षेस किंवा राजाच्या गैरमर्जीस प्राप्त होईल असा इशारा त्यामध्ये करण्यात आला आहे. राज्याभिषेक शक १ आनंदनाम संवत्सर ज्येष्ठ वद्य त्रयोदशीच्या जाबत्यामध्ये [1] अष्टप्रधानांच्या कार्याचा जो तपशील दिलेला आहे, तो आणि प्रस्तुत तक्त्यामधील प्रधानांच्या कार्याचा तपशील यामध्ये काही साम्य व भेद आढळतात. प्रतिनिधी आणि राजआज्ञा या दोन प्रधानांचा उल्लेख जाबत्यामध्ये नाही. अर्थात शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी आणि राजाराम यांच्या कारकीर्दीत उपरिनिर्दिष्ट दोन पदे निर्माण करण्यात आलेली असल्यामुळे त्यांचा उल्लेख जाबत्यामध्ये आलेला नाही. प्रतिनिधी आणि राजआज्ञा यांच्या कार्याचा जो तपशील तक्त्यामध्ये दिलेला आहे, तो विशेष लक्षात घेण्यासारखा आहे. ही दोन पदे का निर्माण झाली त्याची चर्चा पुढे येईलच. या तक्त्याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे वस्त्रे, शस्त्रे, अलंकार, हत्ती, घोडे या संदर्भात प्रधानांना कोणकोणत्या सवलती व अधिकार होते, याची माहिती या तक्त्यामध्ये समाविष्ट केलेली आढळते. या तक्त्याचे

सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे छत्रपती शिवाजीमहाराजांच्या काळापासून ते मराठेशाहीच्या अखेरपर्यंतच्या काळापर्यंत प्रधानांची परंपरा नावानिशी देण्यात आली आहे. त्यामुळे इतिहासाच्या दृष्टीने मराठेशाहीतील प्रधानमंडळाची परंपरा या तक्त्याच्या आधारे मांडता येणे शक्य होईल. रियासतकार सरदेसाई यांनी मराठी रियासत मध्यविभाग ३ यामध्ये प्रधानांच्या परंपरा किंवा वंशावेली दिलेल्या आहेत.[२] प्रस्तुत तक्त्यामधील प्रधानांची नावे व रियासतकारांनी दिलेल्या प्रधानांच्या परंपरा यामध्ये बहुतांशी साम्य आढळते.

लेखनकाल

प्रस्तुत तक्त्यामध्ये लेखनकाल दिलेला नाही. तक्त्यातील शेवटच्या कॉलममध्ये 'हाली आहे त्याची नावे प्रतापशाहू महाराज छत्रपती स्वामी कारकिर्द' असा सुरुवातीला मथळा आलेला आहे. त्यावरून प्रतापसिंह महाराज यांच्या कारकीर्दीत हा तक्ता तयार झाला असे सिद्ध होते. धाकटे शाहू महाराज यांची कारकीर्द इ. स. १७७७ ते १८०८ एवढी झाली. त्यानंतर १६ मे १८०८ रोजी प्रतापसिंहास राज्याभिषेक झाला. त्या समयी त्याचे वय १६ वर्षांचे होते.[३] मल्हार रामराव चिटणीस यांनी 'शककर्ते श्रीशिवछत्रपती महाराज यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र' या नावाची बखर राज्याभिषेक शक १३७ म्हणजे इ. स. १८१० या वर्षी लिहिण्यास प्रारंभ केला. ही बखर मल्हार रामराव यांनी प्रतापी शाहू छत्रपती स्वामी यांच्या आज्ञेने तयार केली. का. ना. साने यांच्या मताप्रमाणे 'धाकटे शाहू महाराज चौथे १८०८ रोजी मृत्यू पावले. तेव्हा बखर लिहिण्याची आज्ञा धाकटे शाहू महाराजांनी मल्हार रामराव चिटणिसांना १८०८ मध्ये किंवा त्यापूर्वी केली हे निश्चित. मात्र बखर चिटणिसांनी १८१० मध्ये लिहिण्यास प्रारंभ केला असे दिसते.'[४] साने यांचा निष्कर्ष समाधानकारक वाटत नाही. मराठी साम्राज्याची छोटी बखर या साधन ग्रंथात, 'शके १७२८ त शाहू राजे सातारकर कैलासवासी झाले. त्यास पुत्र तीन, पैकी एक वडील यास शके १७३० या साली बाजीराव साहेब सातान्यास जाऊन सिंहासनावर बसवून त्यांस शाहूराजे याचे नाव चालले.'[५] असा मजकूर आलेला आहे.

मराठी साम्राज्याची छोटी बखर शके १७३९ म्हणजेच इ. स. १८१७ या वर्षी तयार झाली. त्याचा अर्थ प्रतापसिंह महाराज गादीवर बसल्यानंतर नऊ वर्षांनी ही बखर लिहिण्यात आली. हे लक्षात घेतल्यास प्रतापसिंहासंबंधी लिहिलेली माहिती विश्वसनीय असली पाहिजे. शं. ना. जोशी यांनी मल्हारराव रामराव चिटणीस यांच्या मुद्रेचे विश्लेषण करताना 'शाहू हेच प्रतापसिंहाचे अपर नाव मानावयाचे का?' अशी शंका व्यक्त केली आहे.[६] प्रतापसिंहाच्या मुद्रेचे वैशिष्ट्य सांगताना शं. ना. जोशी यांनी 'प्रतापसिंहास राज्याभिषेक झाला तेव्हा मुद्रा त्यांच्या नावाची व्हावयाची

ती होईपर्यंत नाव शाहूच म्हटले जात होते. ' असे स्पष्ट केले आहे.[७] वास्तविक पाहता प्रतापसिंहाचे नामकरण प्रताप शाहू महाराज असे झाले असावे. प्रस्तुत तक्त्यामुळे ही गोष्ट अधिक स्पष्ट होते. कारण तक्त्यातील कॉलम १८ मध्ये ' हाली आहे त्याची नावे प्रताप शाहू महाराज छत्रपती स्वामी कारकिर्द ' असा मथळा आलेला आहे. त्यावरून प्रतापसिंह म्हणजेच प्रताप शाहू महाराज ही गोष्ट होते. मल्हार रामराव चिटणिसांनी राज्याभिषेक शके १३७ मध्ये (इ. स. १८१०) शिवछत्रपतींची जी बखर लिहिली ती प्रतापसिंहाच्या आज्ञेनेच लिहिली असावी असा निष्कर्ष निघू शकतो. रियासतकारांनी प्रतापसिंहास शाहूचे म्हणजे पित्याचे–नाव-कसे जोडले गेले याचा खुलासा करताना विशद केले आहे की, ' १६–५–१८०८ रोजी प्रतापसिंहास वयाचे सोळाव्या वर्षी राज्याभिषेक झाला. त्या वेळी बाजीरावाने आपला शिक्का फिरेल सबब त्यास शाहू हेच तीर्थरूपाचे नाव ठेविले.'[८] ह्या सर्व तपशिलावरून प्रतापसिंह महाराज म्हणजेच प्रताप शाहू महाराज हे सिद्ध होते. मल्हार रामराव चिटणिसांनी आपल्या बखरी सातार्‍याच्या छत्रपतीकडे असलेल्या कागदपत्रांचा उपयोग करून लिहिल्या असे बहुतेक इतिहासकार मान्य करतात. चिटणिसांनी शिवाजी महाराजांचे ' सप्त प्रकरणात्मक चरित्र ' लिहिताना प्रस्तुत तक्त्याचा उपयोग केला असे वाटते. अष्ट प्रधानांच्या संदर्भात वस्त्रे, अलंकार, सरंजाम इ. विषयी चिटणिसांनी आपल्या बखरीत जो तपशील दिलेला आहे,[९] तो या तक्त्यातील मजकुराशी बराच मिळता-जुळता आहे. प्रस्तुत तक्ता कोणत्या प्रयोजनासाठी तयार करण्यात आला असावा, हे निश्चितपणे सांगणे अवघड आहे. परंतु तक्त्यातील काही उल्लेखांवरून हा तक्ता १८१० नंतर किंवा त्या सुमारास तयार केला असावा, असे दिसते. तक्त्यामधील पाचव्या कॉलममध्ये आणि उभ्या सतराव्या कॉलममध्ये ' प्रताप शाहू महाराज जीवनराव याचे पुत्रास पद झाले तो मुल वारला नकल जाले. ' असा मजकूर आलेला आहे. रियासतकारांनी दिलेल्या सुमंत घराण्याच्या वंशवेलीवरून १८०९ मध्ये जीवनरावाचा मुलगा महिपतराव मरण पावला असे स्पष्ट होते.[१०] याचाच अर्थ हा तक्ता १८०९ नंतर केला असावा. रियासतकारांनी दिलेल्या सुमंताच्या वंशावळीमध्ये जीवनराव नंतर गोपाळराव यांची कारकीर्द १८१० ते १८२१ अशी दाखवली आहे.[११] गोपाळरावाचे नाव प्रस्तुत तक्त्यामध्ये नाही. त्यावरून असे वाटते की प्रस्तुत तक्ता १८०९ ते १८१० या काळातच तयार करण्यात आला असावा.

तक्त्यामध्ये प्रधानांच्या कार्याचा तपशील कॉलम तीनमध्ये दिलेला आहे.

अष्टप्रधान :

छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची संकल्पना प्रत्यक्ष राज्याभिषेक प्रसंगी स्वराज्यासाठी स्वीकारलेली असावी, असे दिसते. राज्याभिषेकापूर्वी शिवाजी

महाराजांनी शासनाच्या सोईसाठी काही प्रधान नेमले होते. परंतु त्यांची संख्या आठ नव्हती. राज्याभिषेकसमयी शिवाजी महाराजांनी जे आठ प्रधान नेमले, त्यांचा तपशील सभासदाने आपल्या बखरीत दिलेला आहे.[१२]

ही अष्टप्रधानांची संकल्पना शिवाजी महाराजांनी नेमकी कोणापासून घेतली, याविषयी अभ्यासकांमध्ये मतांतरे आहेत. त्याच्या तपशिलात शिरण्याचे येथे प्रयोजन नाही. सभासद बखरीमध्ये एक वाक्य सूचक असून त्यावरून असे वाटते की, प्रधानांची ही आठपदे शिवपूर्व कालात, शाही राजवटीत बहुधा प्रचारात असावीत. आठ प्रधानांच्या पदांचा उल्लेख करून सभासदाने म्हटले आहे की, 'येणेप्रमाणे संस्कृत नावे ठेवली.'[१३] इ. राजवाडे यांच्या मताप्रमाणे, 'शिवाजीने ही राज्यपद्धती मुसलमानांपासून घेतली. पेशवा, मुजुमदार, वाकनीस, सुरनीस, डबीर वगैरे अधिकाऱ्यांची नावे मुसलमानांच्या दरबारातील आहेत. त्यांना मुख्यप्रधान, अमात्य, मंत्री, सचिव, सुमंत वगैरे संस्कृत नावे शिवाजीने दिली. बाकी शिवाजीची पद्धती मुसलमानांच्या पद्धतीचेच हुबेहुब अनुकरण होते.'[१४]

प्रस्तुत तक्त्यातील कॉलम तीनमध्ये 'उपनामे' या सदरात पहिल्या चार प्रधानांची पदे फारसी भाषेतील दिलेली आहेत. (१) पेशवे (२) मुजुमदार (३) सुरुनीस (४) वाकनीस. ही चार फारसी पदे अनुक्रमे प्रधान, अमात्य, सचिव, आणि मंत्री या प्रधानांना समांतर आहेत. तक्त्यामध्ये पाच ते आठ प्रधानांची फारसी नावे दिलेली नाहीत. राज्यव्यवहार कोशामध्ये पहिल्या अध्यायात प्रधान, अमात्य, सेनाध्यक्ष, सुमंत (युक्तभिज्ञ), सचिव, मंत्री, न्यायाधीश या सात प्रधानांची फारसी नावे दिलेली आहेत.[१५] फक्त पंडितराव या पदाचा फारसी प्रतिशब्द कोशात दिलेला आढळत नाही.

प्रतिनिधी व राजाज्ञा

तक्त्यामध्ये आठ प्रधानांची नावे दुसऱ्या कॉलममध्ये दिल्यानंतर 'याखेरीज' असा शब्द लिहून 'प्रतिनिधी' व 'राजाज्ञा' अशी दोन अधिक पदे दिलेली आहेत. त्यांपैकी प्रतिनिधी हे पद राजारामाच्या कारकीर्दीत निर्माण करण्यात आले होते. या पदाची निर्मिती कशी झाली त्याचे विवेचन रियासतकार सरदेसाई यांनी केले आहे.[१६]

राजाज्ञा

हे पद संभाजीच्या कारकीर्दीत निर्माण करण्यात आले असावे असे रियासतकारांचे मत आहे. राजाज्ञा हे पद शिवाजीच्या वेळेस नव्हते. औरंगजेबाने रायगड काबीज करून स. १६९० त येसूबाई व शाहू वगैरे मंडळींस पकडून नेले. तेव्हा त्याचेबरोबर उद्धव योगदेव राजाज्ञा हा गृहस्थ होता, असा उल्लेख बखरीतून आला आहे.

यावरून राजाज्ञा हे पद संभाजीच्या वेळेस उत्पन्न झाले असावे. पुढे याचा समावेश प्रधान मंडळात होऊन इतर आठ प्रधानांप्रमाणे सरकारी कागदावर राजाज्ञाचे ' संमत सरकार ' अशी अक्षरे लिहावी लागत. शाहूच्या वेळेस राजाज्ञाची बरीच महती होती.[१८]

प्रधानांचे अधिकार

तक्त्यात दिलेले ' अष्टप्रधानांचे अधिकार ' आणि ' प्रतिनिधी ' व ' राजाज्ञा ' या प्रधानांचे अधिकार शिवकालात जे होते, ते शिवकालोत्तर कालखंडात लुप्तप्राय झाले. छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दीत (१७०८–१७४९) पेशव्यांच्या अधिकारात क्रमाक्रमाने वाढ होत गेली व शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर पेशवे हेच मराठेशाहीचे सूत्रधार झाले. इतर प्रधानांची पदे परंपरेने नाममात्र राहिली. त्यांचे अधिकार बदलले. छत्रपती शाहूच्या कारकीर्दीत बाळाजी विश्वनाथाच्या योजनेप्रमाणे ' मराठा मंडळाची ' स्थापना झाली. अष्टप्रधान व्यवस्थेचा बोजवारा उडाला. प्रधानांची पदे कायम राहिली, परंतु त्यांच्या अधिकारात आमूलाग्र बदल होऊन ते मराठामंडळाचे सदस्य बनले. हा तक्ता ज्या सुमारास तयार झाला, त्या वेळी तर दुसऱ्या बाजीराव पेशव्याने तैनाती फौज स्वीकारून आपले स्वातंत्र्य इंग्रजांच्या हवाली केले होते व तो मराठेशाहीचा केवळ नामधारी सूत्रधार होता. पुढे ७–८ वर्षांतच त्याची सत्ता बुडाली व इंग्रजांनी मराठेशाहीचा शेवट केला.

हा इतिहास लक्षात घेतल्यास प्रस्तुत तक्त्यामधील प्रधानांच्या कार्याचा व सरंजामाचा तपशील केवळ ' इतिहासजमा ' या सदरात मोडण्यासारखा मानला पाहिजे; किंबहुना मराठेशाहीचा वैभवाचा अस्त होत असताना आपल्या राजवटीचा गौरवशाली इतिहास अक्षरबद्ध करावा या हेतूने प्रतापसिंहाने काही प्रयत्न केले असे म्हणावे लागेल. मल्हार रामराव चिटणीस यांच्या बखरी व प्रस्तुत तक्ता अशा प्रयत्नांची साक्ष होय.

तक्त्यातील काही विशेष

(१) उपनामे : १ ते ४ प्रधानांना उपनामे दिलेली असून (फार्सी) पुढील ४, प्रधानांना मात्र नाहीत. तसेच प्रतिनिधी व राजआज्ञा या दोन पदांनाही नाहीत.

(२) हुद्दादरख : १ ते ८ प्रधानांना विशेष सूचना अशी : – ' आज्ञेप्रमाणे न वागल्यास पदाची चालमेल होईल. याकरिता आज्ञेप्रमाणे वागून सेवा करावी. '

पेशवे व प्रतिनिधी या दोघांना विशेष सूचना दिलेली दिसते ती अशी : – ' आज्ञेप्रमाणे न वागल्यास सरकार मर्जी तिकडे होईल........ '

१ ते ८ प्रधान व प्रतिनिधी व राजआज्ञा यांना ' आज्ञेप्रमाणे वर्तन करण्यास

आज्ञामर्जी पसंद वर्तुन सरकार मर्जी पसंद वागून सेवा करावी, मर्जीपसंद वागावे, सेवा आज्ञेप्रमाणे करावी, मर्जी वर्तुन सेवा करावी ' अशी एक विशेष सूचना आढळते. या सर्व मजकुराचा शेवटी एकच निष्कर्ष असा असावा की, सर्वांनी आज्ञेचे पालन करावे किंवा आज्ञेप्रमाणे वागावे.

मुलुक ताबीनात होईल तो जतन करावा : ही सूचना किंवा आज्ञा पेशवे, सचिव, सुमंत, सेनापती आणि प्रतिनिधी या ५ प्रधानांना फक्त दिलेली आहे.

(३) **शस्त्रे :** तलवार व ढाल ही दोन शस्त्रे १ ते ५ प्रधानांना दिलेली असून न्यायाधीश व पंडितराव यांना शस्त्रे नाहीत. सेनापती व प्रतिनिधी यांना आहेत.

(४) **जरीच्या पट्ट्या :** मुख्यप्रधान ते सचिव (१ ते ३. प्रधान) या प्रधानांना जरीपट्ट्या दिल्या असून मंत्री, सुमंत, न्यायाधीश व पंडितराव यांना दिलेल्या नाहीत. पुन्हा प्रतिनिधी या प्रधानाला जरीच्या पट्ट्या दिल्या असून राजाज्ञाला मात्र नाही

(५) **चौघडा :** चौघडा मुख्य प्रधानाला असून पुढील ६ प्रधानांना म्हणजे अमात्य ते पंडितराव यांना दिलेला नाही. सेनापती व प्रतिनिधीला दिला आहे व राजआज्ञेला नाही.

(६) **हाती :** मुख्य प्रधान, सेनापती व प्रतिनिधी यांना प्रत्येकी ३ हाती (हत्ती) दिले असून इतर सर्व प्रधानांना १।१ हाती (हत्ती) आहे.

(७) **जवाहीर :** १ ते ७ प्रधानांना जवाहीर सारखे (चौकडा, कंठी मोत्याची, सीरपेच तुरा मोत्याचा–४ अलंकार) सेनापती व प्रतिनिधी यांना 'जेहगा' हा जास्तीचा अलंकार दिलेला आढळतो. पुन्हा राजआज्ञा या प्रधानाला ४ अलंकार आहेत.

(८) **कलमदान :** कलमदान हे अमात्य, सचिव व सुमंत या तीन प्रधानांना दिले असून ते ताडीचे आहे. इतर ७ प्रधानांना नाही.

(९) **राजपत्रावर निशाण :** राजपत्रावर निशाण करण्याचा अधिकार बहुतेक प्रधानांना दिलेला असून सेनापतीला राजपत्रावर निशाण हक्क नाही.

पत्रावर (फडणीसाची) तारीख टाकण्याचा अधिकार फक्त अमात्य या प्रधानाला आहे. ' राजपत्रावरी सीका कोनाडे राखीतात तेथे होतो व जोडबंदीवर पाठीमागे मोर्तब ' हा अधिकार मुख्य प्रधान व प्रतिनिधी या दोन प्रधानांना आहे. राजकारण पत्रावर निशाण करण्याचा अधिकार सचिव ऊर्फ सुरनीस या प्रधानाला दिलेला नाही. इतर सर्वांना हा अधिकार आहे.

विशेष शब्द :

कलमदान : दौत व लेखण्या ठेवण्याचे लाकडी पात्र. स्वारीत हे कलमदान अंगावरील कमरपट्ट्यात बांधीत असत. खंडो बल्लाळाने स्वारीत धावत असता संभाजी राजाने सांगितलेली पत्रे लगेच लिहून दिली ती हकीकत संभाजीच्या बखरीत आहे.

चौकडा : कर्णभूषणे.

चादर : शरण आल्याबद्दल फिरवावयाचा पांढरा बावटा किंवा कापड.

ताडी : दारू (?) ताडीचे झाडाचे लाकूड.

मस्लत, मस्लहत, मसलत : (१) सल्ला, योग्यविचार, उपदेश (२) अंगीकृत कार्य, मोहीम (३) योग्य.

वाका होईल : घडलेली हकीकत.

वाका : (१) वर्तमान हकीकत.

ताबीनात : हुकमी, खडी.

वाल्मेल : गैरकारभार, गैरव्यवस्था.

संदर्भ

(१) सनदापत्रे–पृ. १२२
(२) मराठी रियासत-मध्यविभाग ३ प्रकरण ३२
(३) मराठी रियासत–उत्तर विभाग ३. पृ. ५१९.
(४) चिटणीस बखर–सं. साने. पृ. ३३
(५) मराठी साम्राज्याची छोटी बखर–सं. ज. बा. मोडक पृ. १०९
(६) अर्वाचीन महाराष्ट्रेतिहासकालातील राज्यकारभाराचा अभ्यास भाग १ ला पृ. २२६.
(७) तत्रैव-पृ. २२३.
(८) मराठी रियासत, उत्तर विभाग ३. पृ. ५१९.
(९) चिटणीस बखर–सं. हेरवाडकर, पृ. ३३.
(१०) मराठी रियासत–मध्य विभाग ३, पृ. ३२०.
(११) तत्रैव-पृ. ३२०
(१२) सभासद बखर–सं. साने, पृ. ६९.
(१३) तत्रैव–पृ. ६९.
(१४) ऐतिहासिक प्रस्तावना–राजवाडे, पृ. १०४.
(१५) राज्यव्यवहार कोश–अध्याय १, २–४ शिवचरित्र प्रदीप– पृ. १४४.
(१६) मराठी रियासत–खं. ४, पृ. ४१.
(१७) मराठी रियासत–मध्यविभाग ३, पृ. ३०१.

७

Throne of Shivaji Maharaj At Rayagad Fort: An Archaeological Reappraisal

By : **Amarendra Nath**

At Rayagad Fort, in the Year 1980-81, excavations were carried out to ascertain the possible remains of superstructure on or adjoining throne platform in the coronation hall where Shivaji Maharaj was coronated in June, 1674. An area admeasuring 10 X 5 metre was taken up by further dividing it into two trenches of equal size. Trench A helped in ascertaining the deposit of throne plinth in relation to adjoining floor over which it rested. Whereas trench B exposed more floor area of the coronation hall (Pl I.). Of course, the primary objective was to find out the basal remains to support Meghadambari, if ever existed, over the throne plinth of Shivaji Maharaj. However, the excavation did not provide any break through.[1] Nevertheless, photograph of trench A is quite interesting to note (Pl. II). It shows to distinct patches of lime in the north-eastern corner

1. The foregoing observations have been made on the basis of available unpublished report with Shri R. C. Agrawal, Dy. Superintending Archaeologist, Archaeological Survey of India. The report shall appear in the *Indian Archaeology 1980-81 Review*.

of the throne plinth. To consider these lime patches as floor of the coronation hall or base for the pillars will be an exaggeration of the fact. Because if it is a floor its traces should be found in adjoining trench B, which is not there. Besides this, the nature and extant of floor patches do not provide any trace for holding pillar-posts. These patches could have been remains of lime apron abutting the throne plinth. It is quite likely that the outer face of the throne plinth had lime plaster with mouldings and these remains of lime patches are the extant of that plaster.[1]

The rectangular rubble enclosure of the renovated throne, facing east, towards the nagarkhana, has a very imposing central place in the coronation hall (Pl. I). It rests abutting the west wall of the coronation hall over an height of 2.85 mts. approximately from the ground level of nagarkhana. The elevated throne platform measures approximately 2.80 x 2.60 x 0.96 mts.; its elevation, devoid of mouldings, shows plain right angled off-sets on the exterior of plinth both at the ground level and at the top.

Since the matter of erection of meghadambari was on the anvil, removal of deposits from the existing plinth enclosure for laying R. C. C. raft base foundation and columns to support the copper canopy was initiated. While doing so the exposed plinth revealed most exciting evidence of an earlier throne about which no one knew earlier. The present discovery is of immense archaeological importance as it provides sufficient clue for the reconstruction of an earlier throne within the renovated throne.

The deposit within the throne platform is of mixed nature, i. e., loose earth and coarse rubbles; filling of uneven and loose nature has given scope for voids and cavities (Pl. III). Consequently it is observed that in the exposed platform a heavy block of stone, dressed from three sides, has tilted approximately to 30° from its original right angled position. (Pl. V & Fig. 2). As a matter of fact this block of stone forms the part of older throne which we shall discuss in the following paragraph. However, such loose packing of rubble will invariably have sinking tendency.

1. At Hampi Shri R. C. Agrawal exposed a throne-plinth which revealed similar features in lime plaster, personal communication.

Of foremost interest is the tantalizing discovery of an L–shaped, two coarsed, rubble–in–lime masonry of an older structure facing east. What it could be other than an earlier ruin of a throne ? Whether or not it is the same throne on which coronation of Chhatrapati Shivaji Maharaj was solemnised is a matter open to discussion. When one turns to the actual description of this ruin one finds that both the courses are of local trap stones, however, the lower course is of three dressed stone slabs of equal size and shape admeasuring 106×43×19 cm. Two of the slabs placed in North-South alignment, form the upper part of the letter L, whereas the third slab takes a right angled turn with the former alignment forming the lower part of the letter L. There is a proper breakage of joints in the masonry. At the other end (Pl. VII) there is a thick encrustation of lime extended over an area of approximately 43×19 cm. which suggests the other right angled turn facing north. Both these right angled turns–one facing to north and the other facing south-terminate against the thick rubble masonry wall abutting the back passage for the Royal entry. Further it is noticed that at both these termination points there are definite vertical chiselled lines on the said thick rubble masonry, so as to hold the alignment on either side (Pl. Nos. V and VI, Fig. No. 2) In addition to these, it could also be visualised that the massive block of stone abutting the west wall falls in alignment of north wall. It is amply clear that if one brings the tilted stone block in its vertical position then it will be noticed that the northern face of the block would be along the chiselled line on the west wall (Pl. V). Thus a complete picture of an earlier Royal throne emerges out.

Technically speaking the construction of the older throne has ingeniously been thought of. Since the architect had to construct the throne over a loose and coarse filling of the floor to avoid sinking rectangular dressed slabs were laid as a basal course. The other basal slabs supposed to be in the juxtaposed position of the older throne plinth are missing. The basal slabs have foundation of coarse stone pitching added with stone chips. Besides this, in the lime mortar masonry stone chips have also been used so as to maintain the plumb lines and also to give strength to joints.

Of equal interest are other finds from the throne plinth deposit. For example the two stone slabs with chiselled off-sets (one seen in Pl. III) are parts of a door-step-slab. It is quite likely that the slabs might form part of the step slab of the door to the left hand side of the throne, as it (step-slab) is missing from there. A door slab of like nature is seen *in situ* at the right hand side door (Pl. VIII). Besides these, burnt grains of rice and "*nachani*" have also been unearthed within the older throne alignment. In addition to these finds, red ware fragments, a soft stone decorative pottery rim, tiles, pieces of copper, and interlocked iron rings have also been recorded.

Thus an enigma of the exact nature of the throne is over. Coming back to the issue of locating archaeological remains for meghadambari nothing substantial was found. There is a need of more scientific investigation of the remaining southern side floor of the coronation hall abutting the throne plinth. Further, it is quite likely that the basal remains might be hidden in the enlarged base of throne plinth. In this search attention is also drawn to an octagonal fluted and flared pillar-base of trap stone with a mortise hole in the centre of top. It is positioned on the south-east corner of the throne (Pl. I). Its position is in close proximity of the throne proper. It is speculated that it was used to hold the wooden post of meghadambari. The heavy stone base for wooden posts with a mortise and tenon joint is a tradition in Maratha architecture. Had there been a meghadambari of square or rectangular shape then there would have been three more such stone bases placed at the remaining three corners of the throne to hold the posts. Now the question arises as to why at all one should consider a square or rectangular meghadambari ? Why not an octagonal one ? In this context it is observed that the coronation hall complex at Rayagad is rectangular on plan and various enclosures in this complex are also rectangular. It has further been observed that the Maratha architectural unit has either square or rectangular ground plan. Structures at Shivaneri Fort, Pachad, Sindhakhed Raja, Ellora etc., may be examined in this connection. Even the ground plan of Maratha temples is either square or rectangular. So to conceive an octagonal meghadambari is not in tune with Maratha architectural conventions. However, if one looks into the rem-

Name of the article :
Throne of Shivaji Maharaj at Rayagad
Fort : An Archaeological Reappraisal



Plate I : A general view of the excavations carried out in the coronation hall at Rayagad




Plate II : Patches of line seen in the trench 'A'




Plate III : Uneven loose packing of throne plinth; also seen a fragment of door, step, slab. Compare Pl. No. VIII and Fig. 1.




Plate IV : A general view of the exposed throne-plinth. A man is indicating the chiselled line in the back wall. Details may be seen in the Plate Nos. V & VI; also compare Fig. 2.




Plate V : The chiselled line on the right side of the west wall of throne-plinth.




Plate VI : The chiselled line on the left side of the west wall of throne-plinth.



Plate VII : The L-shaped throne-ruin hitherto exposed within the existing throne-plinth.




Plate VIII : A door step slab seen *in situ* at the right hand side door; compare Fig. 1.




FIG.3
CONJECTURAL MEGHADAMBARI
DRAWN ON THE PESHWAI PROTOTYPE




FIG. 2

ELEVATION OF THE WEST WALL FACING EAST
THE DOTTED LINES ON EITHER SIDES INDICATE
THE CHISELLED MARKS IN DRESSED RUBBLE
MASONRY FACE




FIG. 1
GROUND PLAN OF AN OLDER STRUCTURE
WITHIN A RENOVATED THRONE

nants of wadas constructed by Peshwa especially the one at Pune known as Vishram Bag Wada one may get an answer to the possible type of a rectangular meghadambari. The Vishrambag Wada has a rectangular meghadambari overlooking the road. It has open pillared pavilion surmounted by a domical roof with curved cornices, the corners of which hang lower than what is usually found in the Bengali prototype.[1] No matter what would be the moulding or designs over the meghadambari it is apparent that instead of an octagonal meghadambari a rectangular or square one would be more appertenant to the Maratha traditions. A congectural drawing of a Maratha meghadambari prepared for the purpose of understanding the views of the author has been reproduced for scruitiny (Fig. 3).

---

1. Dr. A. P. Jamkhedkar has observed similar features in the " Religious and Funerary Monuments of Nagpur." Please refer Marg Publication of *Shivaji and Facts of Maratha Culture*, Bombay, 1982, pp. 123-130.

इ. वि. का. राजवाडे
संशोधन मंडळ

धुळे ४२४००१

प्र का श ना च्या वा टे व र

(१) १०९ कलमी बखर
डॉ. प्र. न. देशपांडे
(प्रस्तावना व टीपांसह)

(२) अप्रकाशित वेडिया नागेश
डॉ. मु. ब. शहा
(काव्य व प्रस्तावनेसह)

८

' सनातन पंथ आणि ब्रिटिशांची जमीन महसूल पद्धती '

प्रा. मनोहर कुलकर्णी

आर्थिक विचारांचा विकास आणि शासनाची आर्थिक ध्येयधोरणे ह्यांचा विकास हा परस्परावलंबी असा अत्यंत गुंतागुंतीचा विषय आहे. अर्थशास्त्रज्ञांच्या वैचारिक संकल्पना अमलामध्ये आणण्याचा शासन प्रयत्न करते. शासनही दैनंदिन व्यवहारातील महत्त्वाचे, किचकट प्रश्न सोडविण्यासाठी अर्थशास्त्रज्ञांचा सल्ला घेत असते.[१] विशिष्ट संकल्पना व्यवहारात राबविल्याने जर काही अनपेक्षित परिणाम अथवा प्रतिक्रिया निर्माण झाल्या तर त्यामधून मार्ग काढण्यासाठी वैचारिक संकल्पनेला व्यावहारिक मोड द्यावा लागतो. कधी–कधी तर संकल्पनेच्या अगदी विरुद्ध टोकाची कार्यवाही करणे भाग पडते. असे होणे म्हणजे वैचारिक संकल्पनांची अव्यवहार्यता सिद्ध होणे असे म्हणण्यापेक्षा वैचारिक संकल्पनांचा/चळवळीच्या विकासाचाच तो एक भाग आहे असेच म्हणणे योग्य ठरते. ह्या सर्व संदर्भात जी बौद्धिक कसरत पाहावयास मिळते ती खरोखरच विलोभनीय आहे. असेच एक विलोभनीय दृश्य भारताच्या इतिहासातील संक्रमण कालखंडात म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पाहावयास मिळते.[२]

सनातन पंथाचा व आधुनिक अर्थशास्त्राचा जनक ॲडॅम स्मिथ हा आपला सुप्रसिद्ध ग्रंथ ' राष्ट्राची संपत्ती '[३] ज्या वेळी लिहीत होता त्या वेळी त्याचा दुसरा एक देशबांधव रॉबर्ट क्लाइव्ह भारतामध्ये ब्रिटिश साम्राज्याची भक्कम इमारत उभारण्याच्या कार्यात गुंतला होता. त्याने बंगाल मिळविला व तेथील महसुली अधिकारच प्रथम

आपल्या हातात घेतले. वॉरेन हेस्टिंग्जने ब्रिटिशांची सत्ता भारतभर पसरविण्यासाठी मोहिमा काढल्या. ह्याच सुमारास आपला ग्रंथ पूर्ण करून ॲडॅम स्मिथने तो प्रकाशित केला (इ. स. १७७६). त्याच्या पाठोपाठ जेम्स स्टुअर्ट, माल्थस, रिकार्डो, जॉन स्टुअर्ट इत्यादींनी आपल्या लेख/लिखाणाद्वारा सनातन पंथाची आर्थिक तत्त्व-विचारांची चौकट तयार केली. ह्याच चौकटीला सर्वसामान्यपणे ' सनातन पंथीय राज्य-प्रणित अर्थव्यवस्था ' (Classical Political Economy) म्हणण्यात येऊ लागले. ह्याच तत्त्वांना व्यवहारामध्ये आणण्याची, तपासण्याची व त्यांत आवश्यकता वाटल्यास दुरुस्त्या सुचविण्याची कामगिरी ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाने व त्यांच्या भारतातील सेवकांनी स्वीकारली. म्हणजे सनातन पंथीय वैचारिक व तात्त्विक चौकटीच्या प्रयोगक्षमतेचा पडताळा पाहण्यासाठी भारताचा प्रयोगशाळा म्हणून वापर करण्यात येऊ लागला.[४] भारत आणि भारतीय समाज व अर्थव्यवस्था ह्यांची परिस्थिती प्रयोगशाळेमधील प्रयोगासाठी आणलेल्या प्राण्यांची जी होते तीच झाली. ह्यालाच तांत्रिक परिभाषेत ' अविकसित अथवा विकसनशील अर्थव्यवस्थेचा विकास ' असे म्हणण्यात येते (development of under developments).

ॲडॅम स्मिथच्या लिखाणाद्वारे सनातन पंथीय विचारांची सर्वसाधारण चौकट (Grand model) आकारास येऊ लागली. माल्थस व रिकार्डो ह्यांनी त्या चौकटीत जाणवणारे काही उणेपण व त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केला तसे करताना त्यांनी त्या चौकटीला निश्चित आकारही देण्याची शिकस्त केली. आपला प्रयत्नाला सनातन पंथाच्या विचारात जे बदल/दुरुस्त्या झाल्या त्या सर्वांचा विचार करून त्याचा गोषवारा आटोपशीरपणे मांडण्याचा प्रयत्न जॉन स्टुअर्टने आपल्या ' Elements of Political Economy ' ह्या ग्रंथात केला. जेम्स स्टुअर्ट (चीफ एक्झामिनर), माल्थस (हेलबरी येथील कंपनीच्या प्रशिक्षण महाविद्यालयातील एक प्राध्यापक) व जॉन स्टुअर्ट (कंपनीचा कैवारी व संसदेच्या विशेष (चौकशी) समितीपुढे कंपनीची कैफियत मांडणारा) हे सनातन पंथीय अर्थशास्त्रज्ञ ईस्ट इंडिया कंपनीशी संबंधित होते. माल्थस व रिकार्डो ह्यांच्यामध्ये जो पत्रव्यवहार झाला त्यातून भारतासंबंधीच्या अनेक प्रश्नांचा उल्लेख आढळतो. जेम्स स्टुअर्ट-प्रमाणेच थॉमस माल्थसचेही असेच मत होते की, भारतातील दारिद्र्य पूर्वीच्या राज्यकर्त्यांच्या चुकीच्या जमीन महसूल धोरणातून उद्भवलेले आहे. तो एके ठिकाणी स्पष्टपणेच म्हणतो की, ' जमिनीची मालकी मक्तेदारीने राजपदाकडे असणे म्हणजे मक्तेदारीचा एक अपरिपक्व असा प्रकार आहे. ह्यातूनच भारतातील शेतीविषयक सर्व प्रश्न उद्भवलेले आहेत. '[५] भारतातील आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी योग्य असे करविषयक धोरण आखून त्याद्वारा प्रयत्न व्हावेत असे कंपनीला सुचविण्यात जेम्स स्टुअर्ट ह्यांचा पुढाकार होता. असे धोरण राबविण्यासाठी भारतात येणाऱ्या

कंपनीच्या अधिकाऱ्यांची मनोभूमिका (orientation) तयार करण्याचे काम थॉमस माल्थस हेलबरी कॉलेजमध्ये आपल्या व्याख्यानाद्वारा करीत होता.

सनातन पंथाच्या एकंदर वैचारिक व तात्त्विक चौकटीमधील विभाजन (distribution) ह्या एका क्षेत्राखेरीज इतर मुद्द्यांवर स्पष्टता व जवळजवळ एकवाक्यता आढळते. 'विभाजना'न्तर्गत निरनिराळ्या विषयांवर त्यांच्यामध्ये मतभिन्नता व परस्पर विरोध दिसून येतो.[६] विशेषतः खंडाच्या बाबतीत ही जाणीव फारच तीव्रपणे होते. खुद्द ॲडॅम स्मिथ खंडासंबंधी निरनिराळी मते आपल्या लेखनात मांडतो.[७] त्याने एके ठिकाणी म्हटले आहे की 'कष्ट न करता मिळविलेले उत्पन्न म्हणजे खंड.' (Love to reap where they have not sowed.)[८] सनातन पंथाच्या ॲडॅम स्मिथ, थॉमस माल्थस व डेव्हीड रिकार्डो ह्या तीन प्रमुख प्रवक्त्यांनी खंड म्हणजे 'भेदजन्य/तौलनिक वाढावा' (differential surplus) आणि तो धान्याच्या किंमतीतून निर्माण होतो व त्याचा धान्य किंमत ठरविताना विचार होत नाही असे स्पष्ट विचार मांडले आहेत. (Rent is determined by the corn-price and it never determines the corn-price किंवा Corn is high not because the rent is paid but rent is paid because the corn is high).

सनातन पंथीयांचे खंडविषयक विचार हे तत्कालीन इंग्लिश समाजामधील उच्च वर्णीयांचे प्रातिनिधिक स्वरूपाचे होते. ह्याच वर्गातून भारतातील अधिकारी वर्ग प्रामुख्याने धोरणात्मक निर्णय घेणारा निवडण्यात येत असे. त्यामुळे समकालीन खंड-विषयक संकल्पनेचे प्रभाव भारतातील जमीन महसूल धोरणावर असणे नैसर्गिकच आहे. जमीन महसूल गोळा करण्यासाठी जमिनीची मालकी निश्चित झाली पाहिजे. मालकी निश्चित झाली व एकदा जमीन महसुलाचा अंदाज आला की जमिनीतील उत्पादनवाढीला चालना मिळेल व इंग्लिश उद्योगधंद्यांची वाढती कच्च्या मालाची मागणी पुरवता येईल. उत्पादनवाढीने भारतीयांची आर्थिक परिस्थिती सुधारत जाईल व त्यामुळे इंग्लिश मालाची मागणी वाढत जाईल असा कल्पनाविस्तार भारतातील अधिकाऱ्यांनी केला. जमिनीच्या मालकांना 'निश्चित जमीन महसूल' सांगितला व ते आणून देण्यावर भर दिला की स्मिथने मांडलेल्या दोन करकसोट्या (canons of taxation) पाळणे शक्य होणार आहे. (अनुक्रमे 'निश्चितता' (certainty) व 'काटकसर' (economy) ह्याचेही भान ह्या अधिकाऱ्यांना होतेच.)

जमिनीचे मालक हेच जमीन महसूल देणारे हे निश्चित केल्याने 'जमीनदारांचा एक स्वतंत्र वर्ग' (Landed aristocracy) निर्माण होईल. इंग्लिश जमीन-दाराप्रमाणे हाही वर्ग समाजोपयोगी व समाजोद्धारक ह्या जबाबदाऱ्या पार पाडू शकेल,

अशी सनातन पंथीय विचारवंतांची खाजगी मालमत्तेच्या हक्कासंबंधी भूमिका होती. खाजगी मालमत्तेचे रक्षण करणे हे प्रत्येक सरकारचे महत्त्वाचे काम आहे व त्यांनी तेवढेच कर्तव्य पार पाडावे ह्या अॅडम स्मिथ ह्यांच्या शिकवणुकीप्रमाणे वागणेही सरकारला शक्य होईल. जमीन महसूल रोखीने भरावयाचा असल्यामुळे कंपनीच्या खजिन्यात निश्चित भर पडत जाणार आहे व त्यामुळे भाग भांडवलधारकांच्या लाभांशाची काळजी घेणेही शक्य होणार आहे, हे व्यावहारिक तत्त्वही ह्या धोरणामागे प्रभावी होते.

लॉर्ड कॉर्नवॉलीसने प्रामुख्याने जमिनीची मालकी निश्चित करण्यासाठी 'जमीनदारांचा' एक स्वतंत्र वर्ग निर्माण केला. त्यांच्याकडे जमीन महसूल गोळा करण्याचे काम दिले. जमिनीचा महसूल करार पद्धतीने प्रत्यक्ष जमीनदारांशी निश्चित केला. महसुलीचा दरही दीर्घ मुदतीसाठी ठरवून टाकला. ह्यालाच 'कायमधारा पद्धती' म्हणतात. हीच जमीन महसुलाची पद्धती कॉर्नवॉलीसला सर्व देशभर लागू करायची होती. परंतु त्याला सर जॉन शोअर, माल्थस, माऊंट स्टुअर्ट एलिफीस्टन इत्यादींनी कडक विरोध केला. विरोधकांच्या मते प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी जमीन महसूल ठरवावा व तो दीर्घ मुदतीसाठी निश्चित न करता वेळोवेळी बदलता येण्याजोगा असावा. दीर्घ अथवा कायम स्वरूपाचा जमीन महसूल निश्चित करण्याने जमिनीच्या उत्पादनाच्या भरभराटीचा फायदा शासनाला घेता येणार नाही. भावी काळातील परिस्थिती, शासनाची आर्थिक गरज व त्यांची उत्पन्न उभे करण्याची शक्यता आपणच का म्हणून निश्चित करावी ? हाही एक विचार कायमधारा पद्धतीला विरोध करणाऱ्यांचा होता. ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालक मंडळातही कॉर्नवॉलीस पद्धतीला विरोध होऊ लागला होता.

जमीन महसुलाच्या कॉर्नवॉलीस पद्धतीस बंगालपुरतेच मर्यादित ठेवून कंपनी सरकारने उर्वरित उत्तर हिंदुस्थानात 'महालवारी' (Group village system) व दक्षिण भारतामध्ये 'रयतवारी' पद्धती आणली. इ. स. १८१३ च्या सनदेने कंपनी केवळ शासनकर्त्रीच राहिली होती आता कंपनीला शासनाकडे पूर्ण वेळ लक्ष देणे शक्य होते. कॉर्नवॉलीस पद्धतीस विरोध करणारांचा कंपनीतील प्रभाव वाढत चालला होता. त्यामुळे संपूर्ण भारतासाठी एक जमीन महसूल पद्धती आणण्याची शक्यता थंडावली व अनेक पद्धती असे वैचित्र्य निर्माण झाले.

भारतातील जमीन महसूल धोरणामागे अशा प्रकारच्या तात्त्विक, राजकीय, व्यापारी व व्यवहार्य शक्ती कार्य करीत होत्या. प्रत्यक्ष जमीन महसूल धोरणाच्या अम्मलबजावणीने मात्र भारतातील ग्रामीण भागात शेतीच्या क्षेत्रात नवेच संबंध उदयास येऊ लागले. शासन–जमीनदार (महसूल गोळा करणारा) प्रत्यक्ष शेतकरी, महसूल देणारी रयत—ग्राम व्यवस्थेतील अन्य पदाधिकारी, शेतकरी–सावकार, शेतकरी—ग्रामीण भागातील अन्य घटक (बलुतेदार) ह्या निरनिराळ्या घटकांतील

परस्पर संबंधांनी सामाजिक, आर्थिक तणाव निर्माण होऊ लागले. तणावांचे काही ठिकाणी दंगलीमध्ये रूपांतर होऊन कायदा–सुवस्था अडचणीत येण्याचे प्रकार निर्माण होऊ लागले.

संदर्भ

1. इंग्लंडमधील नाणे–टंचाईचा प्रश्न 'ग्रेशम' ह्या अर्थशास्त्रज्ञाकडे सोपविल्याचे उत्तम उदाहरण सर्व परिचितच आहे. त्यामधूनच सुप्रसिद्ध 'ग्रेशमचा नियम' तयार झाला.
2. विल्यम बेंटिंकच्या सामाजिक सुधारणा व त्यामागील बेंथमची विचारप्रणाली हाही एक असाच प्रकार ह्याच काळात पाहावयास मिळतो.
3. ॲडम स्मिथच्या ग्रंथाचे संपूर्ण नाव— 'An enquiry into the causes and nature of the Wealth of Nations' असे आहे. (Published with notes by Dr. Cannan Methuen in 1904)
4. S. Ambirajan— 'Classical Political Economy and Indian Economic Policy'— Vikas, 1978.
5. Thomas Malthus,— 'Principles of Political Economy' London, 1820, p. 156.
6. Gide and Rist— 'A History of Economic Doctrines' (George G. Harrap & Co. Ltd., London, Rep. 1953)
7. Eric Roll— 'A History of Economic Thoughts'— (Faber and Faber Ltd., London, Rev. & enlarged, Ed. 1953)
8. Adam Smith, 'Wealth of Nations'— Vol. I. p 356.

९

मराठे-टिपू यांच्यातील दुसऱ्या मोहिमेसंबंधी काही नवी माहिती

एम. आर कुलकर्णी, डेक्कन कॉलेज, पुणे.

प्रस्तुतच्या ह्या छोट्या निबंधात मराठ्यांच्या टिपूवरील दुसऱ्या मोहिमेतील एका छोट्या पण आजपर्यंत कुणास फारशी माहिती नसलेल्या शिकारपूर स्वारीसंबंधीची माहिती डेक्कन कॉलेजमधील पारसनीस संग्रहातील ४२ व्या रुमालातील ८ व्या फायलीतील काही पत्रांच्या साहाय्याने देण्याचा प्रयत्न करीत आहे.

मराठ्यांची टिपूवरील ही मोहिम श्रीरंगपट्टणची स्वारी म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. परशरामभाऊ फौजेसह श्रीरंगपट्टणाकडे जात असता पिछाडी सुरक्षित राहून दळणवळण कायम राहण्यासाठी वाटेतील शत्रूची लहान-मोठी ठाणी, किल्ले आपल्या ताब्यात ठेवणे त्यांना जरूर होते. त्यासाठी त्यांनी गणपतराव (बापू) मेहेंदळे, काशीपंत मामा रानडे, विनायकपंत परांजपे ह्यांच्या हाताखाली गारदी, पायदळ, तोफा वगैरे सरंजाम देऊन त्यांना हल्लीच्या शिवमोघे जिल्ह्यातील अनवटी, जुंडी, उडगणी, शिकारपूर, अनंतपूर, येकेरी होनेहाली इ. किल्ले जिंकण्याची कामगिरी सांगितली.[1] तिलाच मराठी पत्रांतून शिकारपूरची स्वारी असे म्हटले आहे. स्वतः भाऊ सप्टेंबर १७९० च्या प्रारंभी धारवाडच्या किल्ल्यास वेढा घालण्यास गेले.[2] कै. खरेशास्त्री यांनी आपल्या लेखसंग्रहात धारवाडच्या वेढ्यासंबंधीची पत्रे छापताना उपरोक्त किल्ल्याचा केवळ नामोल्लेख केला आहे. शिकारपूर संबंधीची स्वतंत्र पत्रे यांना पाहायला न मिळाल्यामुळेच ते म्हणतात की...! परशरामभाऊंनी धारवाड,

१. पत्र, १०, ११. २. कै. खरे ऐ. ले. सं. ९/४४७८.

जिंकल्यानंतर गणपतराव मेहेंदळे, काशीपंतमामा, विनायकपंत इ. ना टिपूची ठाणी, किल्ले जिंकण्याची कामगिरी सांगितली.[3] पण प्रत्यक्षात मात्र शिकारपूरची स्वारी व धारवाडचा वेढा दोन्ही घटना एकाच वेळी घडत होत्या असे ही पत्रे वाचल्यावरून निश्चितपणे वाटते.

शिकारपूर स्वारीसंबंधी माहिती देणारी सुमारे २० पत्रे व ४/५ पत्रे धारवाडच्या वेढ्यासंबंधी आहेत. ही सर्व पत्रे बापू मेहेंदळे यांनी शिकारपूरच्या स्वारीतून पुण्यास नाना फडणीसास सप्टेंबर १७९० ते एप्रिल १७९१ ह्या ६।७ महिन्यांच्या काळात पाठवलेली आहेत. टिपूचे किल्ले जिंकताना कोणत्या अडचणी आल्या, उभय पक्षाचे बलाबल, कोणत्या परिस्थितीत ही मंडळी परमुलखात लढत होती याची स्पष्ट कल्पना ह्या पत्रांवरून येते.

ह्या स्वारीची सुरुवात १७९०च्या सप्टेंबरात दसऱ्यानंतर झाली. आणि १७९१च्या एप्रिलमध्ये परशरामभाऊंनी धारवाड जिंकल्यानंतर ही मोहीम संपली.[4] पहिल्या प्रथम बिदनूरच्या मार्गावरील बादनगोडचा किल्ला काशीपंत, बापू मेहेंदळे यांनी फारसे श्रम न करावे लागता जिंकला. आणि बिदनूर अलीकडे १६ कोसांवरील अनवटी व जुंडी ह्या किल्ल्यांना एकाच वेळी मोर्चे दिले. हे दोन्ही किल्ले मोठे, बळकट सभोवती खोल खंदक असून बिदनूरचे नाकच मानले जात. त्यामुळे बंदोबस्तही चांगला होता. तरीही अनवटी ९ दिवसांत व जुंडी २८ दिवसांत ताब्यात घेतले.[5] त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढून बिदनूर अलीकडे ८ कोसांवरील तवनंदी व उडगणी ह्या महत्त्वाच्या किल्ल्यास मोर्चे लावले. भाऊंनी दोन महिन्यांपूर्वी रघुनाथ देवजी सावनूरकर यास उडगणी घेण्याची कामगिरी दिली होती.[6] पण त्याला ३००० लोकांसह तेथून पळून यावे लागले होते. त्याने येऊन बापू मेहेंदळ्यांस विनंती केली की, केलेले काम वाया जाते, आपण आल्यावाचून किला येणार नाही व आमचाही निभाव होणार नाही...! त्यावरून मेहेंदळ्यांनी तवनंदी जिंकून सौंद्याकडे न जाता उडगणीचे काम हाती घेतले.

उडगणीभोवती शिक्रापूर, अनंतपूर, होनेहाली, शिवमीचे इ. शत्रूचीच ठाणी असल्याने त्यांना कुमक सतत होई. त्या वेळी धीट बनून रात्री गडबड करून मोर्चे उठवण्याचा ते प्रयत्न करीत. म्हणून मेहेंदळ्यांनी भाऊंस ४६ पायदळ त्वरीत पाठवून द्यावेत म्हणून विनंती केली पण १॥ महिना वाट पाहूनही भाऊंकडून कुमक येईना त्यामुळे उडगणीचे काम बरेच दिवस रेंगाळले. शत्रूचा जोर वाढून तो मोर्चे उठवी तेव्हा मराठे मागे सरकून झाडीचा आश्रय घेत आणि संधी साधून पुन्हा आपले मोर्चे

३. कै. खरे, ऐ. ले. सं. ९/४४७८. ४. पत्र ५, ४.
५. पत्र ५, ८. ६. पत्र ८.

कायम करीत.[७] तोपर्यंत शत्रूने तवनंदीचा किल्ला पुन्हा जिंकल्याची बातमी आल्याने काही काळ उडगणीचे मोर्चे उठवून ६ कोस मागे येऊन तवनंदीस वेढा देणे मराठ्यांना भाग पडले. ४ दिवसांत किल्ला घेऊन पुन्हा त्यांनी उडगणीचे मोर्चे कायम केले.

बापू मेहेंदळ्यांनी भाऊंस निर्वाणीचे कळविले की, 'इथे झाडी फार. पायदळाचे लोकांखेरीज काम होत नाही. उडगणी घेतल्याखेरिज आमचे येणे होणार नाही.' तेव्हा मात्र भाऊंनी ३००० गाडदी २००० पायदळ व दोन तोफा पाठवून दिल्या.[८] आता काशीपंतमामा व विनायकपंतास जोर येऊन त्यांनी थेट किल्ल्यावर चालून घेतले. हे पाहून किल्लेदारही बाहेर आला. दोन घटका उभयतांची लढाई होऊन किल्लेदार मागे हटला. मराठ्यांनी खंदकापर्यंत मजल मारली आणि भोवती तोफा चालू केल्या. तेव्हा मात्र किल्लेदाराचा धीर सुटून एके रात्री त्याने पलायन केले आणि सहा महिने लढल्यानंतर ६ जून १७९१ रोजी उडगणीवर मराठी निशाण चढले.[९]

उडगणी जिंकून बापू मेहेंदळे, विनायकपंत इ. नी आता शिकारपुरास मोर्चे दिले. एका पत्रात बापू मेहेंदळे लिहितो...'आता बिदनूर सोडले तर सर्वत्र आपलाच दाब आहे. शिकारपूरचा किल्ला चांगला थोर असला तरी आपल्या आवाक्यात आहे. पावसाचा सुमार पाहोन नवी हालचाल सुरू करू...'

शिकारपुरापासून इसूर ६ कोस, कुमसी ४ कोस, येकेरी ८ कोस, अनंतपूर ८ कोस, होनेहाली ६ कोस, शिवमोघे ८ कोस, हरपनहली ५ कोस अशी सभोवार शत्रूची ठाणी असल्याने[१०] शिकारपूर येथे आपली मुख्य छावणी ठेवून आजूबाजूचे किल्ले जिंकणे मराठ्यांना सोयीचे होते म्हणून निकडीने प्रयत्न करून१५ दिवसांतच त्यांनी शिकारपूरचा किल्ला जिंकला.

टिपूने ह्या भागातील मराठ्यांच्या हालचालीस आळा घालण्यासाठी रोशनखान बक्षीस रवाना केले.[११] त्याने येऊन अनंतपूरचा किल्ला बळकावला. तेव्हा बाळोजी जगताप व विनायकपंत यांस त्यांच्या तोंडावर उभे केल्याने त्याची हालचाल बंद पडली. त्यावर टिपूने रजा अलीखानास नबाब असा किताब देऊन रोशनखानाच्या मदतीस पाठवले.[१२] रजा अलीने तुंगभद्रा पार करून शिवमोघे घेऊन कुमसीस तळ दिला. तिथेच रोशनखान त्याला येऊन मिळाला. आता दोघांचा मिळून सरंजाम ४६ बार ५ ह. पायदळ, हजार स्वार, ७ तोफा व ३ हत्ती एवढा झाल्याने त्यांनी पूर्वी कुरुंदवाडकरांनी जिंकलेला अनवटीचा किल्ला जिंकला. इतकेच नव्हे तर कुमसीपासून अवघ्या ४ कोसांवरील शिकारपूरच्या छावणीवर छापा घालण्याचे २।३ वेळा प्रयत्न केले. पण मराठे सतत सावध असल्याने त्यांना पराभूत होऊन मागे फिरावे

---

७. प. ९, ८. ८. प. १०, १५. ९. प. १०
१०. प. ११. ११. प. १५, १७. १२. प. १५, १७.

लागले. मराठ्यांकडेही ह्या वेळी १०ह. पायदळ, २ ह. फौज, ४।५ शे सरंजामी व तीन तोफा एवढा सरंजाम होता.[१३] बापू मेहेंदळे एका पत्रात लिहितो...' श्रीमंताचे प्रतापे मैदानात गाठ पडल्यास चिंता नाही. परंतु झाडी किल्याचे आश्रयाने राहिले आणि मयदानातनं आले तर आमचा उपाय काय...'

टिपूने रजाबेग, रोशनखान यांना मराठ्यांवर पाठवल्याचे भाऊंना समजताच त्यांनीही आपला मुलगा रामचंद्र आपा यास थोडी फौज देऊन बापू मेहेंदळे यांच्या मदतीस पाठवले.[१४] पण वाटेत चित्रदुर्गकर प्यादे, बेदडे, यांची वाटमारी जोरात असल्याने त्यांचा नाइलाज झाला. मेहेंदळे नानास लिहितो...' वाटेस दंगा फार. हजार स्वार आले गेले तरी वाटेस निभाव न होई. दीड महिना पावेतो कोणाचे जासूद वगैरे बंदीच जाली होती. हाली आठ दिवस वाट चालती जाली आहे—'

बिदनूर अलीकडे ८ कोसांवर असलेल्या येकेरीच्या किल्ल्यास टिपूच्या लोकांनी अचानक येऊन मोर्चे दिले. तेथे भाऊंच्या विश्वासाचा चांगला लढवय्या किल्लेदार होता. त्याला शिकारपुराहून २।३ हजार गाडदी यांची कुमक झाल्याने त्याने बाहेर येऊन लढाई दिली व टिपूच्या लोकांस पिटाळून दिले.[१५]

शिकारपुराखाली ४ कोसांवर इसूर म्हणून छोटा आहे तेथे पाटलाची एक लहानशी चौकर्जी गढी मराठ्यांच्या ताब्यात होती. रजा अलि बेगचा मुक्काम एका कोसावर आलेला पाहून आतल्या ५० लोकांचा धीर सुटला व ते माघारी आले. रजा अलीने ४००।५०० लोक गढीत ठेवून स्वतः हजार बाराशे स्वार घेऊन झाडीच्या तोंडावर उभा राहिला. इसूर पुन्हा घ्यावे म्हणून शिकारपुराहून मराठे येताच गढीतील लोकांशी त्यांची झटापट झाली. मराठ्यांनी गाव लुटून गढीस तोफा लावल्या. पण शत्रू झाडीतून रात्री येऊन मोर्चे उधळून लावील म्हणून त्यांना परत मुक्कामास शिकारपुरास यावे लागले.[१६] त्याची माहिती पुण्यास कळवताना बापू मेहेंदळे लिहितो. "गढीचे वरकड पारिपत्य जाले आहे. वेढा घालावयासी येत नाही हला करून घेवू म्हटल्यास त्याचे (रजाअलि) संधान जवळ यास्तव जलदी करता येत नाही. तो पुढे आल्यास मैदानात लढाई देवू पण पुढे न आल्यास मात्र उपाय नाही. गढी येक दिवसाचे काम परतू त्याचा मुकाम नजीक यास्तव गढीस मोठेपण आले आहे. त्याचा (रजा अलि) मुकाम अलीकडे पलीकडे झाल्यावर दोन घटकेत गढी घेऊ..."

शिकारपूर स्वारीसंबंधीची ही पत्रे वाचताना एक गोष्ट लक्षात येते, की बापू मेहेंदळे, काशीपंत इ. लोक शत्रूला तोंड देत किल्ले पुन्हा जिंकत होते. पण त्यांना पैशाचा पुरवठा मात्र कुठूनही होत नव्हता.[१७] पुण्यास नानांस सारखी पत्रे जात

---

१३. प. १५. १४. प. १५. १५. प १६.
१६. प १८ व १९. १७. प. ११, १७, २६ व २७.

पण नाना उत्तर पाठवीत नसत. भाऊंनी मदत करावी तर त्यांचीही स्थिती याच्या सारखीच. [18] तेव्हा त्यांनी नाइलाज होऊन सावनूर प्रांती वराता केल्या. त्यावर 'तो तालुका सरकारचा आहे असे करणे योग्य नाही' एवढेच उत्तर नानांनी पाठवले. तेव्हा लेखक लिहितो..." पुढील विचार पोटाचा तो काहीच सुचविला नाही. शत्रू जवळ, फौजेत पोटाची रड. त्यात पायचे माणसास तो शेर पीठ पाहिजे. लढाई करावी स्वारीस जावे तर घरोघर दंगे....शत्रूचा व पोटाचा दोन्ही पेच सोसवणार नाहीत...भाऊंकडून काही आणावे तर चित्रदुर्गकराचा जमाव कानेड पेंढार वाटा मारीतात. हा प्रकार पटणापर्यंत आहे. कहीस जावे तर फौजेची तयारी करून तोफा न्याव्या लढाई करावी तेव्हा गावची कही करावी अशी इकडील अवस्था आहे." दुसऱ्या एका पत्रात तो लिहितो, "सारे फौजेबरोबर ही फौज धरल्यास आमचा निभाव कसा होतो. सरकारात मोठमोठे सरदार आहेत त्याचे घरी अगर सरंजाम अगर सावकारीत पत आहे येथे कर्जही कुणी देत नाही...' अशी सर्व बाजूंनी कोंडी झालेली असूनसुद्धा मोहीम अर्धवट सोडून येण्याचा त्यांचा विचार नव्हता हे विशेष. [19]

नाना फडणीसांनी त्यांना पैशाची तरतूद तर केली नाहीच; पण त्यांनी मिळवलेल्या विजयाबद्दल कौतुकही त्यांना नव्हते. [20] बापू मेहेंदळे आदी लोक शिकारपुरापासून दूर आहेत असे पाहून रजाअलीने मोठ्या जमावानिशी शिकारपूरला वेढा दिला. हे समजताच त्यांनी तातडीने येऊन त्याच्याशी लढाई दिली. ९ दिवस त्याच्या गोटावर तोफांचा भडिमार केला. अखेर रजा अलि शिकारपुर सोडून पळून गेला. ही बातमी नानांस कळूनही त्याने प्रोत्साहनपर चार शब्द लिहिण्याची तसदी घेतली नाही. तेव्हा खट्टू होऊन लेखक लिहितो...'जासूद जबाबाची वाट पाहून परत आला हे मोठे अपूर्व वाटले (चितास). लोकांनी केले त्याचे कोणापासी बोलावे. शत्रूच्या कनाता कापून मारामारी केली तेव्हा शत्रू कच खाऊन माघारी हटला ही गोष्ट आम्ही आपले मते मात्र केली. परंतु आपले मुखे लिहिणे येते म्हणजे सर्वांस संतोष होतो. चांगले वेळेस वडिलास कामेच. निकडीने फावले नाही हे दैवयोग...!'

स्वतः परशरामभाऊ ह्या वेळी धारवाडचा वेढा लढवीत असल्याने ह्या मंडळींस पैसा पुरवठा करणे त्यांना अशक्यच होते. पण नाना फडणिसांनी ह्या साऱ्या साऱ्या घडामोडीकडे अधिक सहानुभूतीने पाहायला हवे होते असे वाटते.

---

१८. प. १६ व २१. १९. प. १९ व २१. २०. प. २१

१०

कविकलश

प्रा. विद्या वळसंगकर

कविकलश हे मराठ्यांच्या इतिहासातील झंझावती प्रकरण. संभाजी राजांची कारकीर्द आणि कविकलश असे विभाजन आपणाला करताच येत नाही. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संभाजी राजांचा विश्वासू सेवक म्हणून त्यांनी अखेरपर्यंत काम पाहिले.

पूर्वचरित्र :

कविकलश हा मूळचा उत्तरेतला कनोजी ब्राह्मण होता. तो अष्टपैलू विद्वान आणि श्रेष्ठ दर्जाचा हिंदी कवी होता. त्याचे मूळचे नाव केशवभट्ट असावे. भोसले घराण्याशी त्याचा फार जुना परिचय असल्याचे खाफीखान सांगतो. कविकलशाचे दक्षिणेतील नातेवाईक आणि शहाजीराजे यांचे संबंध होते.[1] खाफीखान लिहितो की, भोसले घराण्याचा हा अनुवंशीक कुलोपाध्याय होता. तो त्या वेळेस बनारसला होता.[2] म्हणजे कविकलश भोसले घराण्याला नवखा नव्हता. त्याच्या पूर्वचरित्राविषयी यापेक्षा जास्त माहिती अद्याप प्रकाशात आली नाही.

युवराज संभाजी आणि कलश :

या दोघांचा प्रथम संबंध शिवाजी महाराजांच्या आग्र्याहून सुटकेच्या प्रसंगी आला. २१ ऑगस्ट १६६६ ला शिवाजीने आग्र्याहून पलायन केले. वाटेत संभाजीला

1. Muhammad Hashim Khafi Khan Mackenzie Collection, p. 80-83
2. ,, ,, ,,

बराच त्रास होऊ लागल्यामुळे अलाहाबाद येते कवकलशकडे खर्चासाठी रत्ने व होन देऊन संभाजीला त्याच्या स्वाधीन केले. बादशहाला भूल पडावी म्हणून संभाजीच्या मृत्यूची बातमी उठवली. नंतर दोन महिन्यांनी कलश त्याला रायगडावर घेऊन आल्याचे खाफीखान लिहितो.[१] परंतु यानंतर या तिघांच्या संबंधाविषयीची माहिती नाही. नंतर कविकलशाचा मराठ्यांशी संबंध संभाजीच्या काळात आल्याचे दिसून येते.

संभाजीराजांचे राज्यारोहण :

शिवाजीच्या मृत्यूनंतर संभाजीला राज्यपद न देता ते राजारामाला द्यावे असा कट सोयराबाई, बाळाजी आवजी चिटणीस, आनाजीपंत सुरनीस यांनी केला. तेव्हा संभाजी पन्हाळ्यावर होता. शिवाजीच्या मृत्यूची बातमी त्याला न कळवता २१ एप्रिल १६८०ला राजारामाला मंचकावर बसविले, व संभाजीला कैद करण्याचा कट केला. याचा सुगावा संभाजीला लागला. रायगडावर येऊन त्याने सर्वांना कैद करून कामावरून कमी केले.[२] आणि स्वतःस १६ जानेवारी १६८१ ला राज्याभिषेक करून घेतला.

मे १६८१ शाहजादा अकबर महाराष्ट्रात संभाजीच्या आश्रयाला आला. कटकर्त्यांनी संभाजीवर विषप्रयोग करून त्याचा काटा काढण्याचा आणि राजारामाला राज्याभिषेक करण्याचा कट केला. या कटात अकबराला सामील करून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु अकबराला वडिलांच्या विरुद्ध संभाजीची मदत हवी होती. म्हणून दुर्गादास राठोडच्या मदतीने अकबराने ही बातमी संभाजीला सांगितली.[३] संभाजीने या वेळेस त्यांना क्षमा न करता ठार मारले ही माहिती जेधे शकावलीशी बरीच मिळतीजुळती वाटते. मात्र सोयराबाईला ठार मारल्याचे उल्लेख बखरीव्यतिरिक्त इतरत्र आढळत नाहीत. या काळात कलश संभाजीबरोबर होता.

छंदोगामात्य :

राज्याभिषेकानंतर पूर्वीची अष्टप्रधानांची पद्धत संभाजीने तशीच चालू ठेवली. छंदोगामात्य ही पदवी कविकलशाला दिली. छंदोगामात्य म्हणजे पंडित. ही पदवी नवीन नव्हती. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी 'उत्तरेस छंदोगामात्य प्रधान रघुनाथ पंडितराव सुवर्णकलश मधुपूर्ण घेऊन उभे होते.'[४] ग्रँट डफ त्याला छंद गौमात्य

१. Muhammad Hashim Khafi Khan, Mackenzie Collection, p.80-83

२. English records on Shivaji No. 503 p. 311.

३. Nicholas Manucci, Storia Da Manor (Indian Texts Series) VoI. II.

४. इतिहास संग्रह मासिक, पारसनीस संग्रह सन १९०९.

म्हणतो. आणि याचा अर्थ Expounder of Vedas असे लिहितो. परंतु शुद्ध शब्द छंदोगामात्य असून त्याचा अर्थ 'सामवेदाध्यायी प्रधान'[1] असा होतो. परंतु छंदोगामात्य हा अष्टप्रधान किंवा सरकारकून होत नसे. त्यामुळे त्याला वाकेनिवीस पद देऊन मंत्रिमंडळात घेतले.[2] वाकेनिवीस म्हणजे सचिव आणि त्यामुळे संभाजीच्या प्रत्येक हालचाली त्याला माहीत असणे सहज शक्य होते. १६७८ पर्यंत हे पद दत्ताजी सोनदेवाकडे होते. नंतर त्याचा पुत्र रामचंद्राकडे आणि त्याजकडून काढून कलशाला देण्यात आले आणि त्याला दाभोळचा सुभा देण्यात आला.

कविकलश आणि तत्कालीन राजकारण :

१६८३ त कलशाला 'कारभाराचे अध्यक्ष किंवा कुलयेख्तीयार'[3] म्हणून नेमलेले दिसते. कलशाचा शिक्का

'विधिरार्थिमनीषाणामवधिर्नयवर्त्मना
शेवधिः कार्यसिद्धीनां मुद्रा कलश हस्तगा।

याचा अर्थ याचक लोकांची इच्छा पूर्ण करणारी, राज्यव्यवहाराचे नियंत्रण करणारी मुद्रा कलशाच्या हातात होती.

पोर्तुगीज अहवालानुसार मराठे पोर्तुगीज संबंधात कलशाने बरीच महत्त्वाची भूमिका पार पाडल्याचे दिसून येते. मराठ्यांविरुद्ध मोगलांनी पोर्तुगीजांना मदत दिली. पोर्तुगीजांचा कोकण जिंकण्याचा प्रयत्न संभाजीने हाणून पाडला व दोन्ही शत्रूंवर चांगला वचक बसवला. पोर्तुगीजांशी तहाची बोलणी करण्याचे काम त्याने कलशावर सोपविले. फेब्रुआरी १६८४ ते डिसेंबर १६८४ या काळातील काही पत्रे उपलब्ध आहेत. त्यांत कलशाने फिरंग्यांशी झालेल्या लढाईत महत्त्वाची कामगिरी बजावल्याचे स्पष्ट होते. ३० आक्टोबर १६८३ त अकबराने संभाजी महाराजांना लिहिलेल्या पत्रात कलशाच्या पराक्रमाचे उघड कौतुक केले आहे. 'माझी सम्राटाच्या मेहेरबानीची इच्छा धरून जाणावे की, महमद जान व खिदमद परस्तखानाच्या पत्रावरून मोगलांनी घातलेल्या छाप्याबद्दल व त्याचा कविकलशाने निर्धाराने केलेल्या प्रतिकाराबद्दल सर्व मजकूर विदीत झाला. कविकलश हा तुमचा फार चांगला व विश्वासू असा सेवक आहे. दरबारीयांच्या हेव्यादाव्याने त्याचा कोणाकडून नाश ईश्वर होवू न देवो.'

पोर्तुगीजांच्या हालचालींचे निरीक्षण करण्यासाठी कलश जैतपुरास राहात होता. तहाच्या संदर्भात रायगडावर पोर्तुगीजांची जी शिष्टमंडळं गेली, जी खलिते गेली त्या सर्वांचा केंद्रबिंदू कलश असल्याचे दिसून येते. पोर्तुगीज व्हॉइसरॉय कौंट द आल्व्होरानी

१. शिवपुत्र संभाजी, कमल गोखले, पृ. ३५४.
२. संभाजीकालीन पत्रसारसंग्रह, भारत इतिहास संशोधन मंडळ, ग्रंथ ७५, १९४९.
३. शिवचरित्र प्रस्तावना, पृ. ३२ ते ३३

आपल्या सहकाऱ्यांना ज्या सूचना दिल्या त्यातल्या काही उपलब्ध आहेत. दो मिगेल द आल्मेदा यांना लिहितात 'ज्या वेळी आपण कविकलश यांच्याकडे जाल तेव्हा त्यांच्या कानांवर ज्या गोष्टी घालाल, त्यात संभाजीराजे छत्रपती ह्यांच्या अधिकाऱ्याकडून आम्हाला केवढा उपद्रव होतो तेही विदीत करावे.'[1]

कारण मराठे त्यांची जहाजे लुटत होते. पुढे ते लिहितात, 'आपण संभाजीराजे छत्रपती आणि कविकलश यांना असेही कळवावे की कौंट व्हॉइसरॉय त्यांची मैत्री टिकविण्यासाठी आणि कराराची कलमे पाळण्यासाठी फार उत्सुक आहेत.'[2] 'कविकलश ह्यांच्याशी आपली मुलाखत होईल तेव्हा आपण त्यांना स्पष्ट सांगावे की हा तह घडवून आणण्यामागे त्यांचा हात असल्यामुळे तो अमलात यावा म्हणून त्यांनी प्रयत्न केला पाहिजे. व्हॉइसरॉय यांची त्यांच्याविषयीची कल्पना फार मोठी असून त्यांची मैत्री टिकविण्याची त्यांची इच्छा आहे.'[3] थोडक्यात या सर्व उपलब्ध पुराव्यावरून पोर्तुगीज मराठे संबंधात कलशाची महत्त्वपूर्ण भूमिका होती हे नाकारता येत नाही.

शाहजादा अकबर आणि कविकलश :

१० डिसेंबर १६७८ ला रजपुतांविरुद्ध औरंगजेबाने अकबराची नियुक्ती केली. यात यश येत नाही असे दिसल्यावर युद्ध बंद करावे असे त्यांनी आपल्या पित्याला सांगितले. योग्य ते मार्गदर्शन मिळूनही तो यशस्वी होऊ शकला नाही. त्यामुळे औरंगजेब रागावला. यातून पितापुत्रात वितुष्ट निर्माण झाले. अकबराने रजपुतांशी मैत्री करून दुर्गादास राठोड आणि राजारामसिंगाच्या मदतीने पित्याविरुद्ध बंड पुकारले. त्याचे मन वळवण्याचा औरंगजेबाने प्रयत्न केला. परंतु तो असाध्य झाला. त्याच्या मागावर शाहजादा मुअज्जमला ठेवले. उत्तरेत सुरक्षित वाटेना म्हणून अकबर महाराष्ट्रात संभाजीच्या आश्रयाला आला. संभाजी त्याला आश्रय देण्यास तयार नव्हता (१६८१) परंतु कलशाने सल्ला दिला की औरंगजेबाचा मुलगा आपल्याकडे आला आहे त्याचा फायदा आपण घ्यावा. संभाजीला हा सल्ला मान्य नव्हता. परंतु अकबर प्रत्यक्ष राज्यात आल्यामुळे पालीजवळ सुधागड किल्ल्यावर संभाजीने त्याची व्यवस्था केली. पोर्तुगीज आणि मराठे यांच्यामध्ये मध्यस्थाची भूमिका अकबराने कलशाच्या बरोबरीने पार पाडली.

कलश व अकबरात बरेच जवळचे संबंध होते. दोघेही उत्तरेकडचे असल्याने

१. मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोतदार खंड दुसरा, पृष्ठ १५८
२. मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोतदार दप्तर, पृ. १५८–१५९.
३. " " " " पृ. १७१ ते ७२.

त्यांच्यात पूर्वीचे संबंध असावेत. परंतु याला निश्चित पुरावा नाही. १६८४ त कलश आजारी असताना त्याच्या प्रकृतीची चौकशी त्याने पत्रातून केली.[1] संभाजी व अकबर कलह याच काळात निर्माण झाला. कंठाप्रकरणावरून अकबर व संभाजीमध्ये दुरावा निर्माण झाला. संभाजीने त्याच्या सेवेला असलेले सैन्य काढून घेतले. अकबराने महाराष्ट्राबाहेर जाण्याची परवानगी मागितली. ती संभाजीने दिली नाही म्हणून अकबर गोव्याकडे निघून गेला. अकबराचा उपयोग पोर्तुगीजांविरुद्ध लढताना संभाजीला करून घ्यायचा होता म्हणून कविकलश व दुर्गादास राठोड यांनी त्याचे मन वळवून त्याला परत मराठ्यांच्या बाजूला वळवले. (२३ नोव्हेंबर १६८३) त्या वेळचा पोर्तुगीज व्हॉइसरॉय फ्रान्सिको द ताहोरा होता.[२]

राज्यकारभारातील सहभाग :

कलश राज्यव्यवस्थेत जातीने लक्ष घालत असे. न्यायनिवाडा, रयतेची काळजी दर्शविणारी अनेक पत्रे उपलब्ध आहेत. सैतवडेचा देशमुख सोमनाथ सरनायके यांनी सरकारी वसूल बरोबर भरला नाही म्हणून तक्रार होती. त्याविषयी पूर्ण चौकशी करून त्यात काही अफरातफर नाही हे शोधून काढले आणि त्याला लिहिले की ' तुझ्याकडे काही चोरीमारीची लिगाड नाही. कोणे गोष्टीची चिंता न करता आपले गावात येऊन राहणे.'[३]

१६८४ त पाटगावचे पितांबर शेणवी चिटणीसाचा मुलगा जिवाजीराव चिटणीसाने कलशाकडे दाद मागितली. शिवाजीच्या काळापासून त्याला चिटणीसीबद्दल सालीना चारशे होनाची सनद दिली होती. पित्याच्या माघारी जिवाजी ते काम पाहात होता ती सनद नंतर पाच होनांची केली. पालखी बंद केली. एवढ्यात त्याचे भागेना म्हणून दाद मागितली. कलशाने त्याला १०० होनाची सनद देवून त्याजकडून चिटणिसाचे काम घेत जावे असे सांगितले.[४]

राज्यात कलह नसावेत म्हणून तो प्रयत्नशील होता. राज्यात कुणी नाराज असेल त्याची व छत्रपतींची भेट घडवून आणत असे. उदा. १६८३ त बकाजी नावडकर यास कानन खोऱ्याच्या देशमुखाकडे काही मुद्याची चर्चा करण्यास पाठविले. यात देशमुख नाराज झाले म्हणून छत्रपतींना विनंती करून देशमुखांना भेटीस बोलावले. ३-८-१६८४ त कलश देशमुखांना लिहितो, ' छत्रपती स्वामीस विनंती करून तुम्हास

1. House of Shivaji, J. Sarkar, p. 211.
2. Factory records Bombay to Surat, 28-11-1683
३. मावळकर सरदेसाई घराण्याचा इतिहास, ले. ७, पृ. १४
४. संभाजीकालीन पत्रसारसंग्रह, भारत इतिहास संशोधन मंडळ, ग्रंथ क्र. ७५, लेख १२१.

भेटीस यावयाची आज्ञा केली आहे. येणे मुदा मनास आणून तदनुसार पारिपत्य करून देवू.'[1] हुकूम, कायदे याची अंमलबजावणी व्यवस्थित होते की नाही पाहात असे. म्हणूनच छत्रपतींची त्याच्यावर मर्जी बसली. परंतु संभाजी कलशाच्या बुद्धीने चालत नव्हता.

२१ मार्च १६८५ त कलश पुणे प्रांताचे सुभेदार बाळाजी तानदेऊ यांना कळवतात की, 'देशमुख व कुलकर्णी यांना शहाजी व शिवाजीच्या काळात काही गावं इनाम होती व त्यांजकडून ठरावीक खंडणी वसूल केली जाई. परंतु हाली खराबी पडले आहे. तर दस्तमाफीक खंडणी घ्यावी.'[2] म्हणजे दुष्काळ वगैरे पडल्यास रयतेस त्रास देऊन खंडणी वसूल करण्याच्या तो विरुद्ध होता.

धार्मिक दृष्टी :

कलश कनोजी ब्राह्मण होता तरी परधर्माविषयी त्याला आस्था होती. २ जानेवारी १६८४ मधील एक पत्र उपलब्ध आहे. फौंडा पोर्तुगीजांच्या वेढ्यातून घेण्यासाठी मराठ्यांचा सरनौबत (हवालदार) सबनीस यांनी फौंडेजवळील पिरास नवस केला. कलश फौंड्याचा सुभेदार धर्माजी नागनाथाला नवस फेडण्याविषयी लिहितो.

'रा. स्वामी जये आले फते जाहाली. दोसी पिराची करामती म्हणौनी तुम्ही व कोटकरी याही छत्रपती स्वामीस विनंती केली. त्यावरून नियत केला धर्मादाय देवीला. दरसाल नव होन ५० रास उदफूल दिवा देखील उरूस टाकून नव होन २६ मुजावर नफर सालिना होन नव २४ येण सुबे मजकुरी ऐवज दिला.'[3] म्हणजे इतर धर्माविषयी आस्था होती. किंवा राज्यातील मुस्लिमांना खूष करण्याचा हा प्रयत्न असावा.

गंगाधर रंगनाथ कुलकर्णी कसबे याला शुद्धिपत्र देऊन कलशानेच हिन्दू करवून घेतले. यात कलशाच्या उदारमनाची आणि शिवकालीन व्यवहार पुढे चालू ठेवण्याची साक्ष पटते. कुलकर्णीला मोगलांनी जबरदस्तीने बाटविले. ५ वर्षे त्याने मोगलांचे अत्याचार सहन केले. इतर सरकारकुनांना शुद्धीकरणाची विनंती केली. शेवटी कलशाने त्याला शुद्ध करून आपल्या पंक्तीस भोजनास घेतले व इतर मंत्र्यांचीही मान्यता मिळवून दिली.[4]

१. शिवचरित्र साहित्य, खंड ५ वा, लेखांक ८७२.

२. संभाजीकालीन पत्रसारग्रंथ, भारत इतिहास संशोधन मंडळ, ग्रंथ क्र. ७५, लेखांक १४३.

३. संभाजीकालीन पत्रसारसंग्रह, भारत इतिहास संशोधन मंडळ, ग्रंथ क्र. ७५, लेखांक १११.

४. " " " " " " " " लेखांक—१८९

कलश आणि शाक्तपंथ :

शाक्तपंथाची सुरुवात बंगालमध्ये झाली. निश्चलपुरी गोसावी शाक्तपंथीय होता. त्यानेच शिवाजीला दुसरा राज्याभिषेक करून घेण्यास उद्युक्त केले. हीच महाराष्ट्रातील तांत्रिक पंथाची सुरुवात असावी.[1]

या पंथामध्ये मनावर, देहावर स्वामित्व ठेवण्यास फार महत्त्व आहे. अज्ञात शक्तीला आपले दास बनवून मोक्ष मिळवता येतो अशी त्यांची श्रद्धा होती. वशीकरणाच्या प्रयोगाला यात महत्त्व होते. कलश याच पंथाचा होता. त्यामुळे या पंथाचे महत्त्व हळूहळू वाढायला लागले. शाक्तपंथ व राजसत्ता एकमेकींशी निगडित झाली. संभाजीचे शाक्तपंथीय गुरू शिवयोगिनी यांनी शृंगारपुराला मठ बांधला. त्यांनी सांगितलेल्या कालीच्या उपासनेमुळे शाहूचा जन्म झाला. त्यामुळे या पंथावरचा संभाजीचा विश्वास वाढला.[2]

या पंथातील पूजाविधी मद्यप्राशन यामुळे हा पंथ, संभाजी आणि कलश महाराष्ट्रात अप्रिय झाले असे आवळसकर रायगडाच्या जीवनकथेत म्हणतात.

संभाजीवरील कलशाची निष्ठा :

वरील विवेचनावरून कलशाचे स्थान लक्षात येते. एक गोष्ट नाकारता येत नाही की, पहिल्यापासून संभाजीचा त्याच्यावर विश्वास होता. आणि कलशानेही त्याला शेवटपर्यंत साथ दिली. युद्धजन्य परिस्थिती निर्माण करून औरंगजेबाने संभाजीला रायगडावर राहणे अशक्य करून सोडले. कलश आणि संभाजी सैन्याची टेहळणी करत असताना संगमेश्वराजवळ अलकनंदा व वरुणा नद्यांच्या संगमाजवळ पकडले. संभाजीइतकेच कलशाचेही हाल करून औरंगजेबाने ठार मारले.[3] आपल्या स्वामीसाठी एक सेवक बळी गेला. यात त्याचा अपूर्व त्याग, स्वामिनिष्ठा व राजनिष्ठा दिसते. मित्राने मित्रासाठी बळी जाण्याचा हा प्रकार होता.

समालोचन :

एकंदरीत पुराव्याचा विचार करता मल्हारराव रामराव चिटणीसाची बखर 'संभाजीमहाराज यांचे चरित्र' यातून रंगवलेला कलुशा, खलपुरुष हे पटत नाही. कलशानेच फितुरीने संभाजीला कैद करण्यास मदत केली, आणि शेवटी विश्वासघातकी सेवक म्हणून औरंगजेबानी त्यालाही ठार केले. चिटणीसानी असे लिहिण्याचे कारण संभाजीवर त्यांचा राग असावा. कारण त्याचा पूर्वज बाळाजी आवजी चिटणीस हा संभाजीविरुद्ध कटात होता. त्याला संभाजीने ठार मारले म्हणून हा राग असावा. कारण त्याला इतरत्र पुरावे नाहीत.

१. रायगडाची जीवनकथा, कै. शां. वि. आवळसकर, पृ. ८४
२. " " " " " ", पृ. ८५
३. शिवचरित्र प्रस्तावना, पृ. ३४-३५.

प्रकाशक : श्री. भा. भट, संपादक, वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय ४६१/४ सदाशिव, पुणे ४११ ०३०